६० चित्र आश्वासक विकासाचे, हीरकमहोत्सवी महाराष्ट्राचे

# लोकराज्य

मे २०२१/पाने ६०/किंमत ₹१०



# ब्रेक दि चेन

## कोविड - १९ शी लढा

**महाराष्ट्र लसीकरण मोहिमेत अव्वल**



# ज्ञानसूर्याला अभिवादन

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल २०२१ रोजी चैत्यभूमी येथे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, मुंबई शहरचे पालकमंत्री अस्लम शेख, खासदार राहुल शेवाळे, मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त संजीव जयस्वाल, समन्वय समितीचे नागसेन कांबळे यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.





भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी चैत्यभूमी येथे अभिवादन केले. या वेळी बुद्धवंदना घेण्यात आली. तसेच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी चैत्यभूमीवरील भीमज्योतीस पुष्प अर्पण केले. या वेळी मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, महापालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल व इतर मान्यवरांनीदेखील अभिवादन केले.

# अंतरंग

## ६ लढा कोरोनामुक्तीचा

नुकताच आपण महाराष्ट्र दिन साजरा केला. राज्याला ६१ वर्ष झाली. एका ऐतिहासिक अशा संघर्षातून महाराष्ट्र घडला. आज सुद्धा अशाच एका भूतो न भविष्यती संकटाशी सगळे जग आणि अर्थातच आपलं राज्यही लढतं आहे. फेब्रुवारीनंतर राज्यात जी दुसरी लाट आली तिने खऱ्या अर्थाने आपले आव्हान आणखी वाढविले. त्यासाठी राज्याने तातडीने 'मिशन ऑक्सिजन' सुरू केले आहे. राज्याने कोविड-१९च्या तिसऱ्या लाटेला सामोरे जाण्याची तयारीही सुरू केली आहे.

## १० राज्य कोरोनामुक्त करू या

महाराष्ट्र माझे कुटुंब आहे. कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा जीव आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. हीच भावना मनात ठेवून सन्माननीय मुख्यमंत्र्यांपासून गावोगावच्या ग्रामपंचायत सदस्यांपर्यंत प्रत्येक लोकप्रतिनिधी कोरोनाविरुद्धच्या लढ्यात योगदान देत आहेत.

## १२ कर्तव्यातून माणुसकीचे दर्शन

आजच्या कोरोना संकटातही पोलिसांनी आपल्या कर्तव्यदक्षतेत कुठलीही तडजोड केलेली नाही. कोविड-१९ विषाणूच्या प्रतिबंधासाठी डॉक्टरांप्रमाणेच पोलीसही कोविडयोद्धा बनून कायदा व सुवस्था राखण्यासोबतच माणुसकीचे दर्शन घडवत आहेत.

## १४ कोरोनाला करू या हद्दपार

राज्यात आलेल्या कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत दिवसाला किमान ६० हजार रुग्णांचे निदान होत आहे. आजमितीस सात लाखांहून अधिक सक्रिय रुग्ण आहेत. समाधानाची बाब ही की, एवढ्या संख्येने रुग्ण आढळत असले तरी त्यातील सुमारे ८० टक्के रुग्णांना रुग्णालयीन उपचाराची आवश्यकता भासत नाही.

## ३९ महाराष्ट्र देशा

**प्रदीर्घ लढ्यानंतर अनेकांच्या हौतात्म्यानंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. गेल्या सहा दशकांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत सर्वच क्षेत्रात प्रगती करत राज्य आघाडीवर राहिले आहे. देशाच्या राजकारणाला, समाजकारणाला, विकासचक्राला गती देण्याचे काम महाराष्ट्राने केले. दिशा देण्याचे काम केले. राज्याने २०२०-२१ हे वर्ष हीरकमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले. 'लोकराज्य'चा हा 'हीरकमहोत्सवी सांगता वर्ष' विशेष विभाग..**

## ४२ स्वप्नपूर्तीचा ऐतिहासिक क्षण

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचे उद्घाटन तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते झाले. त्या दिवशी राजभवन येथे उद्घाटनप्रसंगी तसेच त्याच दिवशी महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या शपथविधीनंतर त्या वेळचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी केलेले भाषण आम्ही येथे देत आहोत.

## ४५ देश महाराष्ट्र पुण्यशील भारता...

एकसष्ठी साजरी करणाऱ्या महाराष्ट्राने नेहमीच देशाला अभिमानास्पद वाटेल अशी कामगिरी केली आहे. कोणत्याही क्षेत्रामध्ये देशाला जगाच्या पातळीवर कर्तृत्व गाजवायचे असते तेव्हा त्यासाठी महाराष्ट्रच सर्वात पुढे असतो. अशा या महाराष्ट्राची सहा दशकांची वाटचाल नजरेत भरणारी आहे.

## ४९ संयुक्त महाराष्ट्र लढा : एकजुटीचा सुवर्णअध्याय

महाराष्ट्राचा लढा १९५५ ते १९६० याकाळात लढला गेला असला तरी या लढ्याचा इतिहास त्यापेक्षा खूप मोठा आहे. एका अर्थाने संयुक्त महाराष्ट्राचा लढा अद्याप संपलेला नाही. जोवर सीमाभाग महाराष्ट्रात येत नाही, तोवर या लढ्याला पूर्णत्व येणार नाही.


| | |
|---|---|
| लढा कोरोनामुक्तीचा | ६ |
| राज्य कोरोनामुक्त करू या | १० |
| कर्तव्यातून माणुसकीचे दर्शन | १२ |
| कोरोनाला करू या हद्दपार | १४ |
| संकटातून संधी | १६ |
| नियम पाळू या, सुरक्षित राहू या... | १८ |
| तत्पर प्रशासन | २० |
| पाऊल पडते पुढे | २५ |
| मंत्रिमंडळात ठरले ! | ३६ |
| उत्तम आहार, उत्तम आरोग्य | ३७ |
| महाराष्ट्र देशा | ३९ |
| पुन्हा घेऊ भरारी... | ४० |
| संकट, संघर्षातून नवनिर्मिती | ४१ |
| विकासाची परंपरा कायम | ४१ |
| स्वप्नपूर्तीचा ऐतिहासिक क्षण | ४२ |
| देश महाराष्ट्र पुण्यशील भारता... | ४५ |
| संयुक्त महाराष्ट्र लढा : एकजुटीचा सुवर्णअध्याय | ४९ |
| महाराष्ट्र धर्म | ५२ |
| अष्टपैलू चिरतरुण स्वराशा | ५५ |

वर्ष ७२ वे | अंक ९ | मे २०२१

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य


- मुख्य संपादक — डॉ. दिलीप पांढरपट्टे
- प्रबंध संपादक — गणेश रामदासी, गोविंद अहंकारी
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- साहाय्य — भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. प्रिंट प्लस प्रा.लि., पिंपळस, ता. भिवंडी, जि. ठाणे


माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# प्रगतीचा आलेख उंचावला

**गेल्या** सुमारे सव्वावर्षाहून अधिक काळ आपण कोविड संसर्गाविरोधात एकजुटीने लढत आहोत. महाराष्ट्र शासनाने या साथीला आटोक्यात आणण्यासाठी विविध उपाय योजले आहेत. कोविड-१९च्या संकटावर मात करत असताना राज्याची अर्थव्यवस्था सांभाळत वंचित-उपेक्षित, शेतकरी, महिलांना न्याय देतानाच राज्याच्या प्रगतीचा आलेख उंचावला जाईल, यासाठी महाराष्ट्र शासन कार्य करत आहे, असे प्रतिपादन राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी केले. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६१व्या वर्धापन दिनानिमित्त दूरदर्शन आणि आकाशवाणीवरून राज्यपाल श्री. कोश्यारी यांनी जनतेशी संवाद साधला, त्या वेळी ते बोलत होते. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाने जाहीर केलेल्या कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन करून कोविड-१९ संकटावर मात करण्यासाठी सर्वांनी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

## लसीकरणात अग्रस्थानी

कोरोनाची साथ आटोक्यात आणण्यासाठी लसीकरणाचा वेग वाढवण्यात आला आहे. २२ एप्रिलपर्यंत सुमारे १ कोटी ३७ लाख लोकांचे लसीकरण करून महाराष्ट्र राज्य देशात अग्रस्थानी आहे. राज्याच्या विनंतीवरून केंद्र शासनामार्फत हाफकिन संस्थेस नुकतीच लस उत्पादनासाठी परवानगी देण्यात आली आहे. अतिरिक्त प्राणवायूची उपलब्धता करण्यासाठी राज्य शासनाच्या पुढाकाराने रेल्वेची विशेष 'ऑक्सिजन एक्सप्रेस' रवाना करण्यात आली. देशातील हा पहिलाच प्रयोग ठरला आहे.

## मोफत शिवभोजन थाळी

शासनाने 'ब्रेक दि चेन' अंतर्गत प्रतिबंधाच्या काळात आर्थिक दुर्बल घटकांना त्रास होऊ नये म्हणून त्यांना दिलासा देण्यासाठी ५ हजार ४७६ कोटी रुपयांच्या मदतीचे पॅकेज जाहीर केले आहे. प्रतिबंधाच्या कालावधीत गोरगरिबांना शिवभोजन थाळी मोफत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यातील सुमारे ७ कोटी लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती तीन किलो गहू, दोन किलो तांदूळ याप्रमाणे एक महिना मोफत अन्नधान्य देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

शेतकरी थकबाकीदार होऊ नये, यासाठी ३ लाख रुपये मर्यादेपर्यंत पीक कर्ज घेणाऱ्या व त्याची वेळेवर परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२१ पासून शून्य टक्के व्याजाने कर्जपुरवठा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. विविध सुविधा नागरिकांना त्यांच्या घरानजीक प्राप्त व्हाव्या, या हेतूने माझ्या शासनाने सुमारे ३२ हजार ०७५ 'आपले सरकार सेवा केंद्रे' स्थापन केली आहेत. महिलेच्या नावे घर खरेदी केल्यास मुद्रांक शुल्कात सवलत देणारी राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजना, असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांसाठी संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याण योजना, राज्य राखीव महिला पोलिसांची स्वतंत्र तुकडी यांसारख्या महत्त्वपूर्ण निर्णयांमधून महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया गतिमान पद्धतीने पुढे जाईल. कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत महास्वयंम वेबपोर्टल, ऑनलाइन रोजगार मेळावे आदी विविध उपक्रमांद्वारे चालू वर्षात जानेवारी ते मार्च अखेर ४३ हजार ९१० बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यात आला आहे. राज्याच्या पर्यटनाला चालना देण्यासाठी शासनाने कृषी पर्यटन धोरण, कॅराव्हॅन पर्यटन धोरण, बीच शॅक धोरण जाहीर केले आहे. यामुळे राज्यातील पर्यटनाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास राज्यपाल श्री. कोश्यारी यांनी व्यक्त केला.

# लढवय्या महाराष्ट्र

महाराष्ट्र आपल्या स्थापनेचे हीरकमहोत्सवी वर्ष साजरे करत असताना कोविड-१९ च्या साथरोगाने निर्माण झालेल्या परिस्थितीशीही लढतो आहे. लढाई हा महाराष्ट्राचा स्थायिभाव आहे. अन्यायी मोगली राजवटीविरोधात निर्णायकी लढा छत्रपती शिवाजी महाराज यांनी उभा केला. वसाहतवादी इंग्रजी राजवटीविरोधातील लढ्याला सर्वात प्रथम महाराष्ट्राने नेतृत्व दिले. सामाजिक सुधारणांबाबतही महाराष्ट्राने देशाला दिशा देण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीसाठीही महाराष्ट्राला एक लढा उभा करावा लागला. त्यामुळे प्रश्नाला सामोरे जाण्यास आणि उत्तर मिळेपर्यंत लढा देणे हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्यच बनले आहे. आज जेव्हा संपूर्ण जगाबरोबर महाराष्ट्र कोविड-१९ विरोधातील लढाई देत आहे, त्या वेळीही राज्य करत असलेल्या कार्याची दखल देश आणि जागतिक पातळीवर घेतली जात आहे. कोविड-१९ विरोधातील हा लढा महाराष्ट्र मार्च २०२० पासून लढत आहे. कोरोनाच्या पहिल्या लाटेच्या वेळी महाराष्ट्राने अपुऱ्या संसाधनांसह दिलेला लढा अभूतपूर्व आणि इतरांसाठी आदर्शवत होता. कोरोनाची दुसरी लाट अधिक तीव्र आहे. ऑक्सिजन, रेमडेसिवीरची कमतरता आणि वैद्यकीय मनुष्यबळाची कमी अशा संकटातही महाराष्ट्राने धीराने आणि संयमाने कोविडविरोधात लढा दिला आहे तो वाखाणण्यासारखा आहे.



***करू नका एवढ्यात चर्चा पराभवाची,***
***रणात आहेत झुंजणारे अजून काही***

- हा सुरेश भट यांचा शेर या प्रसंगी उद्‌धृत करावासा वाटतो.

कोरोनाची रुग्णसंख्या वाढत असताना चाचणी, उपचार आणि कोविड पसरू नये, यासाठी विविध निर्बंधांच्या माध्यमातून महाराष्ट्र पुढे जात आहे. आज 'ब्रेक दि चेन'च्या माध्यमातून राज्याने उभारलेल्या लढ्यामुळे अनेक जिल्ह्यांतील रुग्णसंख्या कमी होण्यास सुरुवात झाली आहे. याबरोबरच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील गोरगरीब जनतेला शासनाच्या निर्बंधांचा फटका बसू नये, यासाठी ५४०० कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. शिवभोजन थाळी मोफत देण्याच्या निर्णयामुळे लाखो गरजुंना पोटभर अन्न मिळत आहे.

कोविडविरोधातील ही लढाई कोविडयोद्ध्यांच्या माध्यमातून महाराष्ट्र जिंकेल, यात शंका नाही. महाराष्ट्र उभा आहे तो अशा कर्तृत्ववान माणसांच्या पाठबळावर. संत, सुधारक आणि दूरदृष्टीच्या विचारवंत राजकीय नेतृत्वामुळे महाराष्ट्र आज एक संपन्न आणि प्रगतशील राज्य म्हणून मिरवत आहे. छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे यांसारख्या सुधारकांनी केवळ महाराष्ट्रालाच दिशा दिली नाही, तर संपूर्ण देशाला दिशा दिली. महाराष्ट्राला तर्कवाद देणाऱ्या विचारवंतांमुळे महाराष्ट्र उभा आहे. महाराष्ट्र राज्य प्रगतीची नवनवी शिखरे गाठतांना दिसत आहे. शिक्षण, उद्योग, पायाभूत सुविधा अशा अनेक बाबतीत महाराष्ट्र अन्य राज्यांच्या कितीतरी पुढे आहे. महाराष्ट्राची तुलना युरोपातील प्रगत राष्ट्रांसोबत होते हे महाराष्ट्राचे कर्तृत्व आहे.

महाराष्ट्र स्थापनेला ६० वर्षे पूर्ण झाली आहेत. जग झपाट्याने बदलत आहे. नवी ४.० औद्योगिक क्रांती आता दार ठोठावत आहे. तिला प्रतिसाद देण्यासाठी महाराष्ट्र सज्ज आहे. महाराष्ट्र सदैव पुढे होता, आहे आणि राहील, याबाबत कोणाच्याही मनात शंका नाही.

'ब्रेक दि चेन'अंतर्गत महाराष्ट्रात राबवण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांसोबतच, महाराष्ट्राच्या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त विविध लेख या अंकात अंतर्भूत करण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्याने १ मे रोजी ६१व्या वर्षात पदार्पण केले आहे, त्यानिमित्त सर्वांना शुभेच्छा.

**डॉ. दिलीप पांढरपट्टे**
(मुख्य संपादक)



पालघर जिल्ह्यातील जव्हार येथील जामसर प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी करताना मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे.

# लढा कोरोनामुक्तीचा

नुकताच आपण महाराष्ट्र दिन साजरा केला. राज्याला ६१ वर्षे झाली. एका ऐतिहासिक अशा संघर्षातून महाराष्ट्र घडला. आजसुद्धा अशाच एका भूतो न भविष्यती संकटाशी सगळे जग आणि अर्थातच आपलं राज्यही लढत आहे. गेल्या वर्षी जेव्हा या संसर्गास सुरुवात झाली तेव्हा आपल्या हातात साधनं नव्हती, सोयी नव्हत्या, उपकरणं नव्हती मात्र या सव्वावर्षात बऱ्याच साधनसामग्रीची उपलब्धता करून घेणं शक्य झालं. कोविड केअर सेंटर्स असोत, बेड्स, आयसीयू सुविधा, व्हेंटिलेटर्स, औषधी, मास्क, ऑक्सिजन उपकरणे अशा अनेक बाबी आपण जमवल्या. या सुविधा वाढवताना टाळेबंदीसह काही निर्बंधही लादावे लागले, याचाच चांगला परिणाम म्हणजे रुग्णसंख्या आटोक्यात येण्यास सुरुवात झाली. पण फेब्रुवारीनंतर राज्यात जी दुसरी लाट आली तिने खऱ्या अर्थाने आपले आव्हान आणखी वाढवले. विशेषतः ऑक्सिजनची गरज. राज्यासह देश या प्राणवायूसाठी धडपडू लागला. मात्र राज्याने तातडीने 'मिशन ऑक्सिजन' सुरू करून दररोज १२७० मेट्रिक टन ऑक्सिजन निर्मितीसह ३ हजार मेट्रिक टन ऑक्सिजन निर्मितीचे उद्दिष्ट ठेवले आहे. राज्य कोविडची लढाई जोमाने लढत राहणार असून तिसऱ्या लाटेला सामोरे जाण्याची तयारीही आपण सुरू केली आहे.

**उद्धव बाळासाहेब ठाकरे,** मुख्यमंत्री



कोविडची आपली लढाई जीवनमृत्यूची आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. शत्रू समोर दिसत असेल तर त्याच्या पराभवासाठी आखणी काही करता येते, त्याच्यावर हल्ला करणे सोपे असते. पण हा विषाणू जगासाठी मोठे आव्हान ठरले आहे. याचे सगळ्यात मोठं कारण आहे ते म्हणजे या विषाणूमध्ये होणारे उत्परिवर्तन, थोडक्यात म्हणजे बदलते अवतार. देशागणिक हा विषाणू नव्या रूपात येत असल्याने तो सध्याच्या लसींना देखील जुमानत आहे किंवा नाही, याविषयी अद्याप संशोधन सुरू असल्याने काळजी आहे हे खरं. मात्र, आजच्या तारखेस तरी लसीकरण हे

## महाराष्ट्र थांबणार नाही

आमचे दोन अर्थसंकल्प हे कोविडच्या दाट छायेत सादर झाले. मात्र या अर्थसंकल्पात महाराष्ट्राला उज्ज्वल भविष्याकडे नेण्याची ताकद आहे एवढंच सांगतो. कोविडची दहशत होती पण महाराष्ट्र थांबला नाही. मग तो उद्योग-गुंतवणूक असो, पायाभूत सुविधांची कामे असो, शेतकऱ्यांना कर्जमुक्त करणे असो किंवा नैसर्गिक आपत्तींना समर्थपणे तोंड देणे असो. आम्ही आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण हे प्राधान्य ठेवले तरी इतरही क्षेत्रात आम्ही धडाडीने नवनव्या संकल्पना आणून काम सुरूच ठेवले. त्याचबरोबर वेळोवेळी लोकप्रतिनिधी, डॉक्टर्स, सामाजिक संस्था, उद्योजक आदींशी संवाद साधून विविध नावीन्यपूर्ण उपक्रम रावबले जात आहेत.

मी कोविडयोद्ध्यांचा खूप ऋणी आहे. एखाद्या सैनिकाप्रमाणे ते लढत आहे. यात लहानथोर आले, डॉक्टर, नर्सेस, आरोग्य कर्मचारी, पोलीस यांच्यासारखे कोविडयोद्धे आले, तर प्रशासकीय आणि सामाजिक पातळीवर मदतीचा हात देणारे असंख्य संस्था, व्यक्ती व दानशूरही आले... अवघा महाराष्ट्र या सगळ्या मंडळींचा ऋणी आहे. ही ताकदच आम्हाला कोविड-१९ च्या तिसऱ्या लाटेचा मुकाबला करण्यासाठी ताकद देईल, यात काही शंकाच नाही.

अत्यावश्यक आहे.

गेल्या वर्षी जेव्हा या संसर्गास सुरुवात झाली तेव्हा आपल्या हातात साधनं नव्हती, सोयी नव्हत्या, उपकरणं नव्हती, उपचारपद्धतीविषयी निश्चित माहिती नव्हती. मात्र या सव्वावर्षात कोविडची जी काही ओळख आपल्याला झाली, त्यातून बऱ्याच साधन सामुग्रीची उपलब्धता करून घेणं शक्य झालं. मी इथं त्याची आकडेवारी सांगत बसत नाही पण अगदी कोविड केअर सेंटर्स असोत, बेड्स, आयसीयू सुविधा, व्हेंटिलेटर्स, औषधी, मास्क, ऑक्सिजन उपकरणे अशा अनेक बाबी आपण जमवल्या. साधनसामग्री गोळा केली. या सुविधा वाढवताना टाळेबंदी लावावी लागली, वेगवेगळे निर्बंध लावावे लागले. याचाच चांगला परिणाम म्हणजे रुग्णसंख्या आटोक्यात येण्यास सुरुवात झाली. पण हा कोविडवरचा विजय नव्हता. फेब्रुवारीनंतर राज्यात जी दुसरी लाट आली तिने खऱ्या अर्थाने आपले आव्हान आणखी वाढवले. विशेषतः ऑक्सिजनची गरज आपण कल्पना केली नाही इतकी वाढली आणि केवळ आपणच नव्हे, तर अख्खा देश या प्राणवायूसाठी धडपडू लागला.

## आत्मसंतुष्ट मुळीच नाही

आपण दुसऱ्या लाटेतून बाहेर येऊ आणि सध्याची वाढती रुग्णसंख्याही कमी करू, असा मला विश्वास आहे, पण मी आत्मसंतुष्ट मुळीच नाही किंवा स्वतः:चे समाधानही करून घेणार नाही कारण विषाणू फसवा आहे. तो निरनिराळी आव्हाने निर्माण करू शकतो हे जगभरातल्या संशोधकांना कळून चुकले आहे. आणि त्यामुळे आपल्याला या कोविडबरोबरच आयुष्य काढायचे आहे असे गृहीत धरून एक सुसंगत अशी वर्तणूक (कोविड ॲप्रोप्रिएट बिहेव्हिअर) आत्मसात करायला पाहिजे. किंबहुना आपण आता येणाऱ्या लाटा मोजत बसण्यापेक्षा एका कायमस्वरूपी नव्या जीवन पद्धतीवर गांभीर्याने काम केलं पाहिजे असं माझं मत आहे. या दृष्टीने राज्यापुरतं बोलायचं तर आपण तयारी सुरू केली आहे.

मध्यंतरी मी दोन-तीन वेळेस राज्यातील प्रमुख उद्योगपतींशी बोलून या विषयाला सुरुवात केली आहे, नव्हे त्यावर आमचे कामही सुरू केलं आहे. कोणत्याही परिस्थितीत लॉकडाऊन हा कोरोनावरचा इलाज आहे, असं मी देखील मानत नाही. यामुळे रोजीरोटीवर परिणाम होतो, अर्थव्यवस्था मंदावते, त्याचे अनेक दुष्परिणाम असतात. आणि म्हणूनच कोणतेही निर्बंध लावताना आनंद होत नसतो. विशेषतः उद्योग व्यवसायांची चाकं थांबली नाही पाहिजेत अशी एक नवी कार्यपद्धती तयार व्हावी अशी अपेक्षा मी उद्योग संघटनांशी बोलताना व्यक्त केली आणि त्याला त्यांनी प्रतिसादही दिला.

## नवी कार्यसंस्कृती अंगीकारावी

कोणत्या मुद्द्यांवर आपल्याला भर द्यावा लागेल? एकतर पुढील काळात राज्यातील आरोग्य व्यवस्था आणखी बळकट करणे आणि विशेषतः तंत्रज्ञांची अधिकाधिक मदत घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्रे सुसज्ज करणे यावर आपल्याला भर द्यावा लागेल. याशिवाय उद्योग विश्वाने पुढील आव्हान ओळखून कार्यपद्धती बदलणे, वर्क फ्रॉम होम, कामांच्या वेळात बदल, औद्योगिक परिसरांत कायमस्वरूपी चाचणी केंद्रे उभारणे / लसीकरण सुविधा, ऑक्सिजन निर्मितीवर भर, मजूर व श्रमिकांची व्यवस्थित नोंद व आरोग्य व्यवस्थापन अशी नवी व्यवस्था उभारावी लागणार आहे. हे केवळ उद्योगांसाठीच नव्हे, तर सार्वजनिक आणि शासकीय तसेच खासगी कार्यालये आणि व्यावसायिकांनादेखील आता ही नवी कार्यसंस्कृती अंगीकारावी लागणार आहे.

येणाऱ्या काळात आपल्याला साधने व सामग्री भलेही खूप उभी करता येईल, पण साथरोगात काम करू शकेल, असे वैद्यकीय मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर तयार ठेवावे लागणार आहे. सध्या आपण निवृत्त वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, वैद्यकीय विद्यार्थी सर्वांचीच मदत घेत आहोत, आणखीही घ्यावी लागणार आहे. त्या दृष्टीने देखील राज्य शासन ठोस पावले उचलत आहे.

## मिशन ऑक्सिजन



ऑक्सिजन हा सध्याचा सर्वात मोठा प्रश्न बनला आहे म्हणून सांगतो की, महाराष्ट्रानेदेखील 'मिशन ऑक्सिजन' राबवण्यास सुरुवात केली आहे. कमी कालावधी, दीर्घ कालावधीसाठी ऑक्सिजन उत्पदनाचे नियोजन

तयार केले आहे. सध्या आपण दररोज १२७० मेट्रिक टन ऑक्सिजन राज्यात उत्पादित करत आहोत. तो आपल्याला ३ हजार मेट्रिक टन इतका न्यायचे उद्दिष्ट आहे. यात प्रामुख्याने आपण ऑक्सिजन निर्मितीसाठी ३०० पीएसए प्लान्ट्स उभारतो आहोत. यातून २५० ते ३०० मेट्रिक टन ऑक्सिजन मिळेल. काही उद्योग वायुरूपात गॅस उत्पादित करतात. त्यांना द्रवरूप म्हणजे लिक्विड ऑक्सिजनसाठी सिलेंडर भरण्याची व्यवस्था करण्यात येईल. अशा ठिकाणाहून ६०० ते ७०० मेट्रिक टन ऑक्सिजन उपलब्ध होईल. याशिवाय आपण उद्योग विभागामार्फत एक योजना आखतोय. त्यात काही उद्योगांना अनुदान स्वरूपात मदत करण्यात येईल व अतिशय गरज असलेल्या ठिकाणी ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प उभारण्यात येतील.



नांदेड येथे उभारण्यात आलेले जम्बो कोविड सेंटर

## गरीब व दुर्बल घटकाला साहाय्य

हे सरकार दिड वर्षापूर्वी सत्तेत आलं. खुप काही विकासाचे संकल्प मनाशी बाळगत महाविकास आघाडी सरकारने आपली ध्येयवादी वाटचाल सुरू केली. पण तीन-चार महिन्यांच्या कालावधीतच कोरोनाचं संकट आपल्यासमोर येऊन उभं राहिलं. विकासाची वाटचाल कायम ठेवताना सगळे प्राधान्यक्रम या संकटाशी मुकाबला करण्यासाठी बदलावे लागले.

आपल्या सर्वांना याची जाणीव आहे. विशेषतः गरीब व दुर्बल घटकाला याची झळ पोहोचू नये म्हणून आम्ही एका पॅकेजच्या माध्यमातून त्यांना अर्थसाहाय्य करण्यास सुरुवात केली आहे. यात घर कामगार, बांधकाम कामगार, फेरीवाले, रिक्षावाले असे सर्व प्रकारचे लोक आहेत. आदिवासींना खावटीच्या स्वरूपात साहाय्य करणे सुरू झाले आहे. शिवभोजन थाळी आपण मोफत केली आहे जेणे करून गरिबांची पोटं भरतील.

## आरोग्य सुविधांमध्ये भरीव वाढ

राज्यात आजघडीला ६०९ चाचणी प्रयोगशाळा आहेत, पाच हजारांहून अधिक कोविड केअर सेंटर्स आहेत. त्यात दिवसेंदिवस भर पडत आहे. वाढती रुग्णसंख्या विचारात घेऊन मुंबईसह सर्व राज्यभरात आरोग्य सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात येत आहे.

ऑक्सिजन बेडची संख्या वाढवली आहे, आयसीयु बेडची संख्याही वाढवली आहे. व्हेंटिलेटर्ससह इतर सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधांमध्ये आपण वाढ करत आहोत.

गॅस ऑक्सिजनची वाहतूक करणे कठीण असल्याने महाजेनकोच्या खापरखेडा, अकोला आणि परळीच्या वीज केंद्रानजिक मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन उपलब्धतेसह जम्बो सुविधा उभ्या करण्यात येत आहेत. रिलायन्सच्या नागोठाणे प्रकल्पाजवळ जम्बो केअर सेंटर उभारण्याचे नियोजन आहे.

पेणमधील जेएसडब्ल्यू कंपनीच्या रुग्णालयात जम्बो कोविड सेंटर सुरू होत आहे, तर वर्धा येथील लॉयड्स स्टील कंपनीच्या परिसरात १ हजार बेड्सची जम्बो सुविधा उभारली जाणार आहे.

## बालरोग तज्ज्ञांचा टास्क फोर्स

कोरोनाची तिसरी लाट ही लहान मुलांसाठी घातक असणार असल्याचा वैद्यकीय तज्ज्ञांचा अंदाज आहे. त्या अनुषंगाने राज्यात बालरोग तज्ज्ञांचा टास्क फोर्स तयार केला जात आहे.



## लसीकरणात महाराष्ट्र प्रथम

कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरणात केवळ लसीचे सर्वाधिक डोस देण्यात महाराष्ट्र अव्वल नाही तर राज्यातील २८ लाख ६६ हजार ६३१ नागरिकांना दोन्ही डोस देऊन त्यांना संरक्षित करण्याकामीही महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. आजपर्यंत लसीकरण मोहिमेत १ कोटी ८२ लाख एवढे लसीकरण झाले आहे. महाराष्ट्राने लसीकरणात सुरुवातीपासूनच आघाडी घेतली आहे. त्याचबरोबर लस वाया जाण्याचे महाराष्ट्राचे प्रमाण केवळ १ टक्के आहे. लसीचा योग्य वापर करणाऱ्यात आरोग्य कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे.

## विनम्र आवाहन

१८ ते ४४ वयोगटातील नागरिकांना १ मे पासून मोफत लस दिली जात आहे. राज्यातील १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांच्या लसीकरणाची जबाबदारी स्वीकारण्यास राज्य शासन तयार असून, यासाठी लागणारी सर्व रक्कम एका चेकद्वारे देऊन लस विकत घेण्याचीही शासनाची तयारी आहे; परंतु लसीची उपलब्धता ही मर्यादित असल्याने १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांनी लगेच लस केंद्रांवर गर्दी करू नये, कोविन ॲपवर नोंदणी केल्यानंतर जी तारीख आणि वेळ मिळेल त्या दिवशी जाऊन लस घ्यावी. राज्य शासनानेही लस मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात या वयोगटात ६ कोटी नागरिक आहेत. त्यांना प्रत्येकी २ डोस म्हटले तरी १२ कोटी लसीची आवश्यकता आहे. आपण दररोज १० लाख लोकांचे लसीकरण करू शकतो एवढी महाराष्ट्रात क्षमता आहे; परंतु लस वितरण हे ऑक्सिजन आणि रेमडेसिवीरप्रमाणे केंद्र शासनाच्या अखत्यारीतील विषय आहे. राज्याला उपलब्ध होणारी लस ही मर्यादित आहे. राज्याला जस जशी लस उपलब्ध होत आहे, तसतशी सर्व नागरिकांना लस देण्याची सुनियोजित व्यवस्था करण्यात येत आहे.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत वेगाने वाढणारी रुग्णसंख्या थोपवण्यासाठी कडक निर्बंधाची आवश्यकता आहे. मात्र राज्यातील नागरिकांनी कोरोना प्रतिबंधक नियमांचे काटेकोरपणे पालन करून राज्य शासनास सहकार्य करावे, असेही मी आवाहन करत आहे.

## स्वतंत्र ॲपसाठी प्रयत्न

लसीची नोंदणी करण्यासाठी एकच गर्दी उसळल्याने केंद्र शासनाचे कोविन ॲप क्रॅश होत असल्याने लसीच्या नोंदणीसाठी प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र ॲप तयार करण्याची व ते कोविन ॲपला जोडण्याची किंवा राज्यांना त्यांचे ॲप तयार करू देऊन ते कोविन ॲपला जोडण्याची मान्यता द्यावी, अशी प्रधानमंत्र्यांकडे पत्राद्वारे मागणीदेखील आपण केली आहे.

आरोग्य सुविधा उभ्या करणे, ऑक्सिजन रेमडेसिवीरची उपलब्धता असो किंवा अन्य काही, कुठल्याही गोष्टीत सरकार काहीही कमी पडू देणार नाही.



संभाव्य तिसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन सुविधांची उभारणी करताना अर्थचक्र थांबू नये म्हणून राज्यातील उद्योजक आणि कंपन्यांच्या प्रतिनिधींशी आपण बोललो असून त्या दृष्टीने कामाची आणि कामगारांची राहण्याची व्यवस्था करण्याची विनंती त्यांना केली आहे. येणाऱ्या पावसाळ्यात जम्बो कोविड केंद्रामध्ये पाणी जाणार नाही, अपघात घडणार नाहीत, यासाठी स्ट्रक्चरल आणि फायर ऑडिट करण्याच्या सूचनाही संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

**शब्दांकन : अनिरुद्ध अष्टपुत्रे,**
मुख्यमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी

**महाराष्ट्र माझे कुटुंब आहे. कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा जीव आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. हीच भावना मनात ठेवून सन्माननीय मुख्यमंत्र्यांपासून गावोगावच्या ग्रामपंचायत सदस्यांपर्यंत प्रत्येक लोकप्रतिनिधी कोरोनाविरुद्धच्या लढ्यात योगदान देत आहेत. सर्वांच्या सहकार्याने आपण कोरोनाला हरवू या, महाराष्ट्राला कोरोनामुक्त करू या. महाराष्ट्र पडेल तो संघर्ष करेल, पण कोरोनाला हरवेल. महाराष्ट्र देशातील पहिले कोरोनामुक्त राज्य ठरेल, असा विश्वास आणि प्रयत्न आहे.**

# राज्य कोरोनामुक्त करू या

**अजित पवार,** उपमुख्यमंत्री



महाराष्ट्र आज कोरोना संकटाशी एकजुटीने, निर्धाराने लढत आहे. गेल्यावर्षी मार्च महिन्यात कोरोनाची पहिली लाट आली. सव्वावर्षानंतर महाराष्ट्र दुसऱ्या लाटेचा सामना करत आहे. कोरोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेतही राज्य सरकारची सर्वोच्च प्राथमिकता राज्यातील जनतेचे प्राण वाचवण्याला राहिली आहे. कोरोना संसर्गसाखळी तोडण्यासाठी सरकारला लॉकडाऊन किंवा मर्यादित निर्बंधांसारखे निर्णय नाइलाजाने घ्यावे लागले. त्याची झळ औद्योगिक, व्यापारी क्षेत्राला बसली. त्यातून राज्याचे वित्तीय नुकसान झाले. झालेले वित्तीय नुकसान भविष्यात भरून काढता येईल, परंतु नागरिकांचे गेलेले जीव परत येऊ शकत नाहीत. याची जाणीव ठेवून राज्यातील प्रत्येक नागरिकाचा जीव वाचावा, सर्वजण सुरक्षित राहावेत, कोरोनामुळे कुणाचाही मृत्यू होऊ नये, हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून राज्य सरकार गेले सव्वावर्ष काम करत आहे. तो लढा आजही सुरू आहे.

महाराष्ट्र माझे कुटुंब आहे. कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा जीव आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. हीच भावना मनात ठेवून सन्माननीय मुख्यमंत्र्यांपासून गावोगावच्या ग्रामपंचायत सदस्यांपर्यंत प्रत्येक लोकप्रतिनिधी कोरोनाविरुद्धच्या लढ्यात योगदान देत आहे. राज्यातील डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, फार्मासिस्ट, आरोग्य यंत्रणेतील कर्मचारी, सफाई कर्मचारी, पोलीस, अंगणवाडीताई, आशाताई, शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज संस्थांचे अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी जिवाची जोखीम पत्करून कोरोनाविरुद्ध पहिल्या फळीत लढत आहेत. संकटात महाराष्ट्र एकजूट होतो हा इतिहास आहे.

कोरोनाविरुद्ध लढताना काही सहकाऱ्यांना प्राण गमवावे लागले. या दिवंगत कोरोनायोद्ध्यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. कोरोनाविरुद्धच्या लढाईत अगदी पहिल्या दिवसापासून राज्य सरकारचे ध्येय स्पष्ट होते. त्यामुळे सरकारने कोरोना प्रतिबंधासाठी अनेक पथदर्शी निर्णय घेतले.

## मोफत लसीकरण

कोरोनाविरुद्धच्या लढाईत लसीकरणाचे महत्त्व लक्षात घेऊन राज्याने लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबवली. सद्य:स्थितीत दीड कोटींहून अधिक लसीकरणाचा विक्रमी टप्पा राज्याने पार केला आहे. राज्याने १८ ते ४४ वयोगटातील प्रत्येक नागरिकाला मोफत लस देण्याचा निर्णय घेतला आहे. असा निर्णय घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. लसनिर्मितीसाठी मुंबईतील हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये १५४ कोटी रुपये खर्चून भारत बायोटेकच्या सहकार्याने लस उत्पादन प्रकल्प उभारण्यात येत आहे.

## सर्वसामान्यांना साहाय्य

कोरोना साखळी तोडण्यासाठी लागू 'ब्रेक दि चेन' निर्बंधकाळात नागरिकांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी राज्यासाठी ५ हजार ४७६ कोटींचे मदत पॅकेज जाहीर केले आहे. कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांसाठी जिल्हा नियोजन समित्यांच्या माध्यमातून ३ हजार ३०० कोटी रुपये, तर ३५० आमदारांना स्थानिक विकास निधीतून ३५० कोटी रुपये खर्च करण्यास परवानगी देण्यात आली आहे. अन्न सुरक्षा योजनेंतर्गत राज्यातील सात कोटी लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती तीन किलो गहू, दोन किलो तांदूळ देण्यासाठी ९० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. निर्बंधकाळात राज्यात दररोज दोन लाख शिवभोजन थाळ्यांचे मोफत वितरण केले जात आहे. त्यासाठी ७५ कोटी रुपये उपलब्ध केले आहेत.

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्यावतीने संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ आणि केंद्रपुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तिवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तिवेतन या पाच योजनांच्या



## रुग्णालयात ऑक्सिजन निर्मिती

राज्यातील 'कोरोना'ची वाढती रुग्णसंख्या लक्षात घेऊन राज्यातच अधिकाधिक ऑक्सिजन निर्मिती करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. कोल्हापूर आणि ठाणे जिल्ह्यातील रुग्णालयांच्या ठिकाणी या आधीच हवेतून ऑक्सिजन निर्माण करण्याचे प्रकल्प स्थापन झाले आहेत.

मुंबई महापालिकेनेही अशा प्रकल्पनिर्मितीची कार्यवाही सुरू केली आहे. या तिघांनी विहित प्रक्रियेद्वारे खरेदी केलेल्या दरांना प्रमाण मानून नवीन ऑक्सिजन प्रकल्पांसाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे निविदा प्रक्रियेतील विलंब टाळून, योग्य दरात प्रकल्प उभा राहून कार्यान्वित होण्यास मदत होत



आहे. राज्यातील साखर कारखाने, पेपर, पोलाद, पेट्रोलियम, फर्टिलायझर, रिफायनरी उद्योगांच्या माध्यमातून ऑक्सिजन निर्मिती वाढवण्यात आली आहे. अनेक उद्योगांमध्ये बंद असलेल्या ऑक्सिजन निर्मिती संयंत्रांचा शोध घेऊन ती संयंत्रे तातडीने दुरुस्त करण्यात येत आहेत.

राज्यातील ३५ लाख लाभार्थ्यांना दोन महिन्यांकरिता प्रत्येकी १ हजार रुपयांचे आर्थिक साहाय्य आगाऊ देण्यात येत आहे. त्यासाठी ९६१ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. राज्यातील १२ लाख नोंदणीकृत बांधकाम कामगारांना प्रत्येकी दीड हजारांप्रमाणे १८० कोटी रुपयांची मदत दिली जात आहे. २५ लाख नोंदणीकृत घरेलू कामगारांसाठी ३७५ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य देण्यात येत आहे. राज्यातील ५ लाख नोंदणीकृत फेरीवाल्यांना प्रत्येकी दीड हजार रुपयांप्रमाणे ७५ कोटी रुपये तर, १२ लाख परवानाधारक रिक्षाचालकांना प्रत्येकी दीड हजार रुपयांप्रमाणे १८० कोटींची मदत राज्य सरकारकडून दिली जात आहे. ही मदत देताना सायकल रिक्षाचालकांचाही विचार करण्यात आला आहे. आदिवासी विभागांतर्गत खावटी योजनेचा लाभ घेत असलेल्या १२ लाख आदिवासी कुटुंबांना प्रत्येकी दोन हजार रुपयांप्रमाणे २४० कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

## जिल्हा वार्षिक योजनेतून निधी

जिल्हा वार्षिक योजनेतील ३० टक्के निधी 'कोविड'वरील औषधोपचार, उपकरणे, सुविधा उभारणी व इतर व्यवस्थेसाठी खर्च करण्याची परवानगी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. राज्यभरासाठी ३ हजार ३०० कोटी रुपये एवढा निधी यासाठी उपलब्ध झाला आहे. यापैकी पहिल्या टप्प्यात १ हजार १०० कोटी रुपयांचा निधी तातडीने वितरित करण्यात आला आहे.

## आमदार निधीतून ३५० कोटी

राज्यातील आमदारांच्या स्थानिक विकास निधीतून चार कोटींपैकी एक कोटी रुपयांचा निधी 'कोरोना' प्रतिबंधक उपाययोजनांसाठी आपापल्या मतदारसंघात खर्च करण्यास आमदारांना परवानगी देण्यात आली आहे. या माध्यमातून विधानसभेतील २८८ आणि विधान परिषदेतील ६२ अशा एकूण ३५० आमदारांचा ३५० कोटी रुपयांचा निधी राज्याच्या विविध भागात 'कोरोना' प्रतिबंधक उपाययोजनांसाठी उपलब्ध झाला आहे.

## राज्य आपत्ती निवारण निधी

राज्यातील रुग्णालयांमध्ये ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प बसवण्यासाठी तसेच 'कोरोना' प्रतिबंधक अन्य उपाययोजनांसाठी राष्ट्रीय आरोग्य मिशन, सार्वजनिक आरोग्य विभाग, राज्य आपत्ती निवारण निधी (एसडीआरएफ) मधून निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## अधिग्रहीत खासगी रुग्णालयांबाबत

'कोरोना'विरुद्धच्या लढाईला बळ व वेग देण्यासाठी शासनाच्यावतीने अनेक खासगी रुग्णालये अधिग्रहीत करण्यात आली आहेत. कोरोनारुग्णांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन प्रशासनाने खासगी रुग्णालयातील खाटांचेही अधिग्रहण केले आहे. अधिग्रहीत खासगी रुग्णालयांमध्ये आवश्यक आरोग्य सुविधा व यंत्रणा उपलब्ध करण्यासाठी विभागीय आयुक्तांना खर्चाच्या मंजुरीचे अधिकार दिले आहेत.

## आरोग्यासाठी भरीव तरतूद

'कोरोना' संकटाचा सामना करण्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात आरोग्य विभागासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागासाठी ८ हजार ९५५ कोटी २९ लाख रुपये, तर वैद्यकीय शिक्षण विभागासाठी १ हजार ९४१ कोटी ६४ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये आरोग्य संस्थांचे बांधकाम व श्रेणीवर्धनासाठी ७ हजार ५०० कोटी रुपये किमतीचा प्रकल्प येत्या चार वर्षांत पूर्ण करण्यात येणार आहे. महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये दर्जेदार आरोग्य सेवांसाठी येत्या पाच वर्षांत ५ हजार कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यापैकी ८०० कोटी रुपये या वर्षी उपलब्ध केले जात आहेत. कर्करोगाच्या निदानासाठी १५० रुग्णालयांमध्ये सुविधा निर्माण केली जात आहे.

महाराष्ट्र आज कोरोनाविरुद्धची लढाई आपल्या संपूर्ण ताकदीनिशी लढत आहे. ही लढाई लवकर जिंकायची असेल तर राज्याला प्रत्येकाचे योगदान अपेक्षित आहे. कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी संसर्गाची साखळी तोडणे हे आज आपले मुख्य ध्येय आहे. कोरोनाला हरवू या, महाराष्ट्राला कोरोनामुक्त करू या. महाराष्ट्र पडेल तो संघर्ष करेल, पण कोरोनाला हरवेल. महाराष्ट्र देशातील पहिले कोरोनामुक्त राज्य ठरेल, असा आपला विश्वास आणि प्रयत्न आहे.

**शब्दांकन : संजय देशमुख,**
उपमुख्यमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी

**महाराष्ट्र पोलीस दलाला कर्तव्यदक्षतेचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. आजच्या कोरोना संकटातही पोलिसांनी आपल्या कर्तव्यदक्षतेत कुठलीही तडजोड केलेली नाही. पोलिसांनी दाखवलेले धैर्य आणि शौर्य हे गौरवास्पद आहे. कोविड-१९ विषाणूच्या प्रतिबंधासाठी डॉक्टरांप्रमाणेच पोलीसही कोविडयोद्धा बनून कायदा व सुवस्था राखण्यासोबतच माणुसकीचे दर्शन घडवत आहेत.**

# कर्तव्यातून माणुसकीचे दर्शन

**दिलीप वळसे-पाटील,** गृह मंत्री



राज्याच्या गृहमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारल्यापासून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे आणि पोलीस विभागाची परंपरा अधिक उज्ज्वल करण्यासाठी कार्यप्रणाली निश्चित केली आहे. त्यानुसार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाची वाटचाल सुरू आहे.

## खाकी वर्दीचा मानवी चेहरा

सध्याचा काळ आव्हानात्मक आहे. कोरोनामुळे सर्व पोलीस दल फिल्डवर आहे. 'ब्रेक दि चेन'अंतर्गत कोरोनाची साखळी तोडण्यासाठी शासनाने राज्यभरात निर्बंध लागू केले आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेसोबतच कोरोना काळातल्या बंधनांची अंमलबजावणी करणे ही जबाबदारी सक्षमपणे पार पाडली जात आहे. या काळात नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्याबरोबरच अनेक ठिकाणी पोलिसांमधल्या माणुसकीचेही दर्शन घडते आहे. गरिबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, वृद्ध आणि निराधारांना सहकार्य, नागरिकांना मार्गदर्शन यात पोलीस कर्मचारी आघाडीवर आहेत. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्यास अनुसरून कार्यरत असताना पोलीस विभागाने केलेल्या चांगल्या कामांमुळे खाकी वर्दीचा मानवी चेहरा समाज मनावर कोरला गेला आहे.

## पोलिसांचा अभिमान

पोलिसांवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच निर्बंधांची कठोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आहे. न दिसणाऱ्या कोरोनासारख्या शत्रूसोबतही पोलीस जिवाची बाजी लावून लढताहेत. पोलिसांचे हे कार्य कौतुकास्पद आहे. गेले वर्षभर मोठ्या प्रमाणावर कामाचा ताण असतानादेखील कायद्याची अंमलबजावणी करताना माणुसकीची, बंधुत्वाची भावना सर्व पोलीस दलाने दाखवून दिली आहे. पोलीस विभागाचा कुटुंबप्रमुख या नात्याने मला माझ्या कुटुंबातील सदस्यांचा अभिमान आहे.

## दक्ष व सतर्क

'ब्रेक दि चेन'अंतर्गत राज्यात लागू करण्यात आलेल्या निर्बंधांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सर्व पोलीस अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घेण्याबरोबरच अधिकारांचा वापर संवेदनशीलपणे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे विनाकारण घराबाहेर पडणाऱ्यांवर कारवाई, वस्त्यांमध्ये जाऊन कोरोनाबाबत जनजागृती, गस्त, ठिकठिकाणी नाकाबंदी करून नियमांचे पालन याची तपासणी पोलीस विभाग करत आहे. याबरोबरच कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सातत्याने दक्ष व सतर्क आहेत. कोरोनाच्या या जैविक लढाईमध्ये समाज माध्यमांवर पोलिसांची करडी नजर आहे. आक्षेपार्ह पोस्ट आणि अफवा लोकांपर्यंत पोहोचणार नाहीत, याची खबरदारी घेतली जात आहे.



## पुरेशा सुविधा व दिलासा

राज्यातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी कोरोना पार्श्वभूमीवर विविध सुविधा देण्यात येत आहेत. तसेच गृह विभागाने पोलिसांच्या सुरक्षिततेसाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. पोलीस दलामधील संसर्गाची व्याप्ती पाहता मास्क, फेस शिल्ड, सॅनिटायझर याचा पुरवठा करण्यात येत आहे. बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पोषक आहार तसेच व्यायामाचे धडेही पोलिसांना देण्यात आले आहेत. जिल्हानिहाय कोविड हेल्पलाईन सुरू करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून आवश्यक ती सर्व मदत उपलब्ध करून देण्यात येत आहे. इतकेच नव्हे, तर मुंबईसह महाराष्ट्रातील अनेक रुग्णालयात पोलिसांवर उपचारांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच अनेक जिल्ह्यांमध्ये खास पोलिसांसाठी सुसज्ज कोरोना रुग्णालये उभारण्यात आली आहेत. त्यामुळे तत्काळ उपचार उपलब्ध होत आहेत.

आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावत असताना राज्यात सुमारे ३९ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांना कोरोनाचा संसर्ग झाला. या सर्व बाधितांना वेळेत उपचार उपलब्ध करून देण्यात आले. सुमारे ३५ हजारांपेक्षा जास्त जणांनी कोरोनावर यशस्वीपणे मात केली आहे. उर्वरित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर राज्यातील विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

नुकताच पोलीस व त्यांच्या कुटुंबीयांच्या वैद्यकीय बिलाच्या मान्यतेचे अधिकार संबंधित विभागाच्या पोलीस महासंचालकांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही पोलिसांसाठी दिलासादायक बाब आहे.

## सरकार तुमच्या पाठीशी

कोरोनाच्या लढाईत अहोरात्र पोलीस विभाग आणि राज्य राखीव दलातील जवान असे सव्वा दोन ते अडीच लाख पोलीस बांधव कार्यरत आहे. अनेकांना कोरोनाचा संसर्ग झाला. बरे होऊन पुन्हा नव्या उत्साहाने, धैर्याने जनतेच्या सेवेत दाखल होत आहेत. पोलिसांनी मनोधैर्य खचू न देता कर्तव्य बजावावे, राज्य शासन आपल्या पाठीशी खंबीर आहे, असा विश्वास आम्ही पोलीस यंत्रणेला सुरुवातीलाच दिला. त्यामुळे पोलिसांचा आत्मविश्वास वाढला आहे. या कोरोनाविरुद्धच्या लढाईत काही पोलीसयोद्ध्यांना आपला जीव गमवावा लागला हे वेदनादायी आहे. त्या सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली. या सर्व कोरोनायोद्ध्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी गृह खाते तसेच राज्य शासन ठामपणे उभे आहे.

## लसीकरण मोहीम

राज्यात अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना लसीकरणासाठी परवानगी मिळाल्यानंतर विभागामध्ये लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबवण्यात आली. राज्यात एकूण १ लाख ६७ हजार ६४४ अधिकारी व कर्मचारी यांना लसची पहिली मात्रा देण्यात आली आहे, तर ९३ हजार ११७ जणांना लसची दुसरी मात्रा देण्यात आली आहे. उर्वरित जणांचे लवकरच लसीकरण पूर्ण होणार आहे. या मोहिमेमुळे पोलिसांचे मनोबल उंचावले आहे.

## सानुग्रह अनुदान वाटप

कोरोनारूपी संकटात स्वतःची, कुटुंबाची तमा न बाळगता केवळ कर्तव्यापोटी समाजाचे रक्षण करणाऱ्या या पोलिसांप्रति राज्य शासन संवेदनशील आहे. कर्तव्य बजावत असताना कोरोनाची लागण होऊन दुर्दैवाने पोलीस अधिकारी कर्मचारी मृत्यू पावल्यास त्यांच्या कुटुंबास राज्य शासनामार्फत ५० लाख रुपयांचे सानुग्रह साहाय्य देण्यात येते. आतापर्यंत २७६ योद्ध्यांच्या कुटुंबांना मदत देण्यात आली आहे. प्रस्ताव प्राप्त होताच तत्काळ आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही गृह विभागामार्फत करण्यात येत आहे. तसेच शहीद पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्यात येत आहे. अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीचे पत्र जिल्हास्तरावर देण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच अधिकाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नेमणूक देण्याबाबतच्या प्रस्तावाचा पाठपुरावा गृह विभागामार्फत करण्यात येत आहे.

## लढण्यासाठी बळ

कर्तव्य निभावत असताना काही लोकांकडून पोलिसांवर अनपेक्षित हल्ले झाले. यात अनेक पोलीस जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. आपण अहोरात्र ज्यांच्यासाठी काम करतोय, त्यांच्याकडून अशी वागणूक मिळाल्यामुळे पोलीस बांधव निराश झाले. परंतु त्यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केली नाही. या काळात अनेक सकारात्मक बाबी घडलेल्या आहेत. त्यामुळे पोलिसांचा आत्मविश्वास वाढला आहे. नाशिक जिल्ह्याच्या निफाड तालुक्यातील गार्गी नावाच्या एका चिमुकलीने गस्तीवर असलेल्या पोलीस बांधवांना गुलाबपुष्प देऊन त्यांचे ऋण व्यक्त केले होते. याचे फोटो समाज माध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर अनेक ठिकाणी अशाच प्रकारे पोलिसांचे स्वागत झाले. पहिल्या लाटेत पोलिसांनी नागरी वस्तीत मार्च काढल्यानंतर काही ठिकाणी पोलिसांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. या घटना निश्चितच पोलिसांना लढण्यासाठी बळ देतात.

***रक्षक दुर्बलांचे, सेवक दुरितांचे, सोबती दुःखितांचे,***
***आम्ही पोलीस सारे, साथी समाजाचे,***

यानुसार पोलिसांनी घेतलेली ही मेहनत संपूर्ण पोलीस दलासाठी अभिमानास्पद आहेच, शिवाय पोलीस दलाची प्रतिमा उंचावणारीही आहे.

**शब्दांकन : मनीषा पिंगळे,**
वरिष्ठ सहायक संचालक

**जागतिक महामारी असलेल्या कोरोनाविरुद्ध संपूर्ण देशासह महाराष्ट्र राज्य गेल्या सव्वावर्षाहून अधिक काळ लढा देत आहे. मार्च २०२० मध्ये राज्यात पहिला रुग्ण आढळून आल्यानंतर सुरू झालेली ही लढाई डिसेंबर, जानेवारीच्या सुमारास अंतिम टप्प्यात आली असे वाटत असतानाच फेब्रुवारी २०२१ मध्ये रुग्णसंख्या वाढू लागली. त्यानंतर ती झपाट्याने वाढत गेली. मात्र या संकटावर मात करण्यासाठी राज्य शासनाचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. ऑक्सिजन निर्मिती, औषधांची उपलब्धता, लसीकरण, कोरोना चाचणीच्या प्रयोगशाळा, ऑक्सिजन बेड्स आदींच्या माध्यमातून आरोग्य यंत्रणा बळकट केली जात आहे.**

# कोरोनाला करू या हद्दपार

**राजेश टोपे,** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री



गेल्या वर्षीच्या पहिल्या लाटेत सप्टेंबरच्या सुमारास राज्यातील दैनंदिन सर्वाधिक रुग्णसंख्या ही २४ हजार ८८६ च्या आसपास होती. मात्र मार्च, एप्रिल २०२१ मध्ये दिवसाला ६० हजारांहून अधिक रुग्ण आढळून यायला लागले. १८ एप्रिलला तर आतापर्यंतची सर्वाधिक ६८ हजार ६३१ इतकी रुग्णसंख्या आढळून आली. प्रत्येक दिवस विक्रमी रुग्णसंख्या नोंदवणारा ठरला आहे. आता मेच्या पहिल्या आठवड्यात रुग्णसंख्या काहीशी स्थिरावल्यासारखी वाटतेय. राज्याचा रुग्णवाढीचा दर १३ मे रोजी एक टक्क्यांहून कमी आहे. रुग्णवाढीत देशातील ३६ राज्यांमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक ३१ वा आहे. मुंबई महानगरातही रुग्णसंख्या कमी आढळतेय ही थोडीशी दिलासादायक बाब म्हणू शकतो. मात्र रेमडीसीवीर, ऑक्सिजन, रुग्णशय्यांची उपलब्धता आणि वाढती रुग्णसंख्या यामुळे आरोग्य व्यवस्थेवर ताण पडतोय. काही जिल्ह्यांमध्ये रुग्णसंख्या कमी होताना दिसतेय तर काही ठिकाणी वाढताना. त्यामुळे जागरूक राहून कोरोनाविरुद्ध युद्ध सुरू ठेवावे लागणार आहे.

राज्यात आलेली कोरोनाची दुसरी लाट भयंकर आहे. दिवसाला किमान ६० हजार रुग्णांचे निदान होत असल्याने राज्यात सक्रिय रुग्णांच्या संख्येतही वाढ होत होती. मात्र त्यात मे च्या दुसऱ्या आठवड्यापासून घट होताना दिसून येत आहे. एकेकाळी ७ लाखांहून अधिक सक्रिय रुग्ण असताना त्यात घट होऊन ही संख्या साडेपाच लाखांवर आली आहे.

## ऑक्सिजनची उपलब्धता

महाराष्ट्रात सध्या दररोज १२५० मेट्रिक टन ऑक्सिजन उत्पादित होतो आणि त्यातील १०० टक्के वैद्यकीय वापरासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. तरीदेखील मागणी जास्त असल्याने अन्य राज्यांमधून आपण सुमारे ३०० ते ३५० मेट्रिक टन ऑक्सिजन घेत आहोत. मिळेल तिथून ऑक्सिजन उपलब्ध करून घेत आहोत.

## ऑक्सिजन रेल्वेचा महाराष्ट्र पॅटर्न

रस्तामार्गे वाहतुकीत वेळ जात असल्याने महाराष्ट्राने ऑक्सिजन वाहतुकीसाठी रेल्वेचा वापर करण्याची सूचना मांडली. ती अमलात आणली आणि पहिली ऑक्सिजन एक्सप्रेस २४ एप्रिलला राज्यात दाखलही झाली. प्रवासाचा वेळ व अंतर वाचवण्यासाठी 'वायुदलाची' व 'राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन' विभागाची मदत घेण्यात येत आहे. यासोबतच हवेतून ऑक्सिजन निर्मितीसाठी प्रकल्प उभारण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. सातत्याने कोरोना रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता २५० ते ३०० मेट्रिक टन अतिरिक्त साठा उपलब्ध असणे उपयुक्त ठरेल.

## रेमडेसिवीरचे वाटप

राज्याला रेमडेसिवीर इंजेक्शनचा तुटवडा भासत आहे. मधल्या काळात रुग्णांच्या नातेवाइकांची त्यासाठी होत असलेली ओढाताण, भटकंती मनाला वेदना देणारी होती. त्यावर मार्ग काढत हे इंजेक्शन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत थेट रुग्णालयांना पुरवण्याचा निर्णय झाला. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला. मधल्या काळात रुग्णसंख्या कमी झाल्याने रेमडेसिवीरचे उत्पादन कमी झाले होते. मात्र, उत्पादक कंपन्यांशी चर्चा केल्यानंतर त्यांना उत्पादन वाढवायला सांगितले. रेमडेसिवीरमुळे हॉस्पिटलमध्ये



पीपीई किट घालून जालना येथील कोविड सेंटरमधील रुग्णांची विचारपूस करताना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री राजेश टोपे.

## लसीकरणात अग्रेसर

राज्यात संसर्गाचे प्रमाण कमी होत असतानाच्या काळात १६ जानेवारी २०२१ पासून कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरणाला सुरुवात झाली. सुरुवातीला प्राधान्य गटातील कर्मचाऱ्यांना लसीकरणाला सुरुवात झाली. त्यानंतर ४५ वर्षांवरील सर्वांना आणि आता १ मे पासून १८ वर्षांवरील सर्वांचे लसीकरण केले जात आहे. महाराष्ट्राने सुरुवातीपासून लसीकरणात आघाडी घेतली. देशपातळीवर आजही महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. सध्या (१३ मेपर्यंत) १ कोटी ९० लाख जणांना लसीकरण झाले आहे.

महाराष्ट्रात १८ ते ४४ वयोगटातील लोकसंख्या ही ५ कोटी ७१ लाख असून त्यांच्या लसीकरणासाठी १२ कोटी डोसेसची आवश्यकता भासेल आणि देशातील लस उत्पादक एव्हढ्या कमी कालावधीत मोठ्या संख्येने त्याचा पुरवठा करू शकणार नाही. लसीकरण हे कोरोनाविरुद्धच्या लढाईतील महत्त्वाचे साधन असल्याने त्यावर भर देण्यात येत आहे.

राहण्याचा रुग्णाचा कालावधी कमी होतो. परिणामी ऑक्सिजनचा वापर, खाटांची उपलब्धता आणि एकूणच आरोग्य सुविधांवर पडणारा ताण कमी होण्यास मदत होते. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रधानमंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीत महाराष्ट्राला रेमडेसिवीरचा पुरवठा सुरळीत होण्यासाठी विनंती केली. त्यावर केंद्राने राज्यासाठी पुरवठा वाढवून देण्याचे आदेश काढले. त्यामुळे काहीसा दिलासा मिळण्यास मदत होणार आहे. राज्याने परदेशातून रेमडेसिवीर आयात करायला परवानगी मागितली आहे. त्यासाठी जागतिक निविदा काढून सहा कंपन्यांना ३ लाख रेमडेसिवीरची ऑर्डर दिली आहे.

## आरोग्य सुविधांवर भर

पहिल्या लाटेचा सामना करताना महाराष्ट्रात आरोग्य सुविधा वाढवण्यावर भर देण्यात आला. सुरुवातीला राज्यात केवळ ३ ठिकाणी कोरोना चाचणीच्या प्रयोगशाळा होत्या. त्या आता एकूण ५४२ झाल्या आहेत. त्यात ३९२ शासकीय आणि १५० खासगी प्रयोगशाळा आहेत. राज्यात दर दशलक्ष लोकसंख्येमागे चाचण्यांचे प्रमाण २ लाख ४० हजार इतके आहे. एप्रिलच्या मध्यातली आकडेवारी पाहिली तर दिवसाला सरासरी २ लाख ४७ हजार चाचण्या दिवसाला झाल्या आहेत.

वाढत्या रुग्णसंख्यमुळे उपचाराच्या सुविधेत मोठी वाढ करण्यात आली आहे. राज्यात सध्या ६१७८ कोरोना उपचार केंद्र आहेत त्यामध्ये केंद्र शासनाच्या निर्देशानुसार त्रिस्तरीय वर्गवारी करण्यात आली आहे. त्यात ४ लाख ५५ हजार ७२५ खाटा असून ऑक्सिजन खाटांची संख्या ९९ हजार ७४६ आहेत. ३१ हजाराच्या आसपास अतिदक्षता विभागातील खाटा आहेत. १२ हजार १६० व्हेंटिलेटर्स आहेत. राज्य शासनाने ही व्यापक सुविधा करून ठेवल्या असल्या तरी दिवसागणिक वाढणाऱ्या रुग्णसंख्येमुळे या सुविधांच्यादेखील मर्यादा आहेत.

## जाणीवजागृती मोहीम

कोरोनाचा प्रतिबंध करण्यासाठी सातत्याने शासनाकडून जाणीवजागृती केली जाते. मात्र नागरिकांनी त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळणे आवश्यक आहे. वैयक्तिक काळजीतूनच आपण समुहाची काळजी घेऊ शकतो. त्यामुळे मास्क वापरणे, गर्दी न करणे, हात धुणे, सुरक्षित अंतर राखणे याविषयी वारंवार आवाहन केले जात आहे. त्यासोबतच कोरोनाची लक्षणे दिसल्यास काय करावे, कोठे उपचार घ्यावे, घरच्या घरी ऑक्सिजन पातळी मोजण्यासाठी सहा मिनिटे चाचण्याची चाचणी करावी यामाध्यमातून नागरिकांचे प्रबोधन केले जात आहे. मध्यंतरी मुंबई महापालिकेने खाटांच्या नियोजनासाठी मध्यवर्ती नियंत्रण कक्ष सुरू केला त्याचा चांगला परिणाम दिसून त्यामुळे मुंबई महापालिकेचा हा पॅटर्न राज्यभर राबवण्याचे निर्देश आम्ही सर्व जिल्ह्यांना दिले.

रुग्णसंख्या कमी होण्यासाठी संसर्गाची साखळी तोडणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्य शासनाने सर्व घटकांचा सखोल विचार करून निर्बंध लावले आहेत. संसर्ग रोखतानाच अर्थचक्र सुरळीत ठेवण्याचेही प्रयत्न शासनाला करावे लागतात मात्र सर्वप्रथम प्राधान्य नागरिकांच्या आरोग्याला आहे, हे महत्त्वाचे.

## सामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून निर्णय

कोरोनाच्या सुरुवातीच्या वर्षापासून उपाययोजना करत असताना राज्य शासनाने सामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून निर्णय घेतले आहेत. खासगी प्रयोगशाळांमधील चाचणीचे दर कमी करण्यासाठी किमान पाच ते सहा वेळा सुधारणा करण्यात आल्या. सुरुवातीला ४५०० रुपये असणारा दर आता केवळ ५०० रुपयांवर आणला आहे. सिटी स्कॅन चाचण्यांच्यादरांवर देखील नियंत्रण आणले आहे. राज्यातील सर्व नागरिकांना महात्मा फुले जनआरोग्य लागू करतानाच या योजनेत सहभागी असलेल्या रुग्णालयात कोरोना रुग्णांना मोफत उपचार देण्यात येत आहेत. रुग्णांसाठी खाटा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ८०:२० खाटांचा फॉर्म्युला आणला. खासगी रुग्णालयांकडून जादाची बिल आकारणी होऊ नये, यासाठी लेखापरीक्षक ठेवण्यात आले आहेत. नागरिकांकडून रोज वापरण्यात येणाऱ्या मास्कच्या किमतीदेखील नियंत्रित करण्यात आल्या आहेत. यासारख्या अनेक निर्णयांची अंमलबजावणी जिल्हा यंत्रणेकडून केली जात आहे.

हे सर्व उपाय योजीत असताना या संकटाचा मुकाबला करण्यासाठी सर्वांची साथ महत्त्वाची आहे. यंत्रणा गेल्या सव्वावर्षापासून अपार कष्ट घेऊन रुग्णांना बरे करण्यासाठी धडपडत आहे. त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप मारतानाच संसर्ग रोखण्यासाठी शासन करत असलेल्या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची प्रत्येकाची जबाबदारी आहे. मी नेहमी म्हणत असतो प्रत्येकाने 'मीच माझा रक्षक' अशी शपथ घेऊन स्वत:सोबतच समाजाच्या रक्षणाची जबाबदारी घेतली पाहिजे.

**शब्दांकन : अजय जाधव,**
विभागीय संपर्क अधिकारी

**वर्षभराहून अधिक काळापासून कोविड-१९ या विषाणूविरोधात एकजुटीने लढा देत आहोत. दिवसेंदिवस रुग्णांची संख्या वाढताना दिसत आहे. राज्यातील रुग्ण संख्या कमी करण्यासाठी आणि कोविड-१९ला आळा घालण्यासाठी कडक निर्बंध घालण्यात आले आहेत. 'ब्रेक दि चेन' अंतर्गत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. राज्य शासन या सर्व संकटांशी नेटाने आणि निर्धाराने लढत आहे. राज्याच्या विकासात कामगार हा महत्त्वपूर्ण घटक ठरला आहे. येणाऱ्या काळात कामगार वर्गाला अधिक सक्षम करण्यासाठी कामगार विभाग काम करत आहे. संकटातून संधी निर्माण करत राज्य शासन विकासाची परंपरा कायम राखेल, यात शंका नाही.**

**हसन मुश्रीफ,** कामगार मंत्री



# संकटातून संधी

राज्याच्या जडणघडणीत राज्यातील कामगारांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. राज्याच्या विकासात कामगारांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. महाराष्ट्र हे अनेक कामगार कायद्यांचे जनक आहे. राज्य शासन महाराष्ट्रातील कामगारांच्या सुरक्षेला, आरोग्याला आणि एकंदरच सर्वांगीण विकासाला प्राधान्य देऊन विविध कायदे कामगारांच्या हितासाठी राबवत आहे. यापुढील काळातही कामगारांचे हक्क आणि त्यांचे हित अबाधित ठेवण्याचा प्रयत्न असणार आहे. गेल्या वर्षभरात प्राधान्याने कामगारांसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. कामगारांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी कामगार विभागाने वेळोवेळी सक्रिय भूमिका घेतली आहे.

कोविड विषाणूची साखळी तोडणे आवश्यक असल्याने राज्यात आणखी कडक निर्बंध लावण्यात आले आहेत. मात्र असे करत असताना या काळात आर्थिक दुर्बल घटकांना या निर्बंधाचा त्रास होऊ नये म्हणून त्यांना दिलासा देणारे ५ हजार ४७६ कोटी रुपयांच्या मदतीचे पॅकेज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी जाहीर केले आहे.



## संत जनाबाई सुरक्षा व कल्याण योजना

कोविड काळातील लॉकडाऊनचा फटका समाजातील सर्वच घटकांना बसला असला तरी या काळात सर्वाधिक हाल झाले ते असंघटित क्षेत्रातील कष्टकऱ्यांचे. त्यातही घरकाम करणाऱ्या मायभगिनींची दुरवस्था झाली. या मायभगिनी यापुढे अशा संकटात मदतीपासून वंचित राहू नयेत म्हणून त्यांची नोंदणी व त्यांना आधार ठरेल अशी 'संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याण योजना' या वर्षीच्या अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आली आहे. या महिलांच्या सामाजिक सुरक्षा व कल्याणासाठी 'समर्पित कल्याण निधी' निर्माण करण्यात येणार असून, त्यासाठी बीजभांडवल म्हणून २५० कोटी रुपये या वर्षीच्या अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आले आहे. जमा होणाऱ्या निधीतून घरकाम करणाऱ्या मायभगिनींसाठी कल्याणकारी योजना राबवण्यात येणार आहेत.

## कामगार नोंदणी

असंघटित क्षेत्रात अनेक कामगार काम करत असून या कामगारांचे नोंदणीकरण वेळेत करणे यावर येत्या काळात भर देण्यात येणार आहे. सध्या ऑनलाइन पद्धतीने कामगारांचे नोंदणीकरण करण्यात येत आहे. येत्या काळात कामगारांची नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ आणि सोपी करण्यावर भर देण्यात येईल.

बांधकाम कामगारांना आवश्यक असेल ती मदत करणे, त्यांच्या भोजनासोबत त्यांच्या निवाऱ्याची सोय करणे, बांधकाम व्यावसायिकांनी आपल्या कामगारांना आरोग्य सुविधा देणे, अधिकाधिक घरेलु कामगारांची नोंदणी करणे आणि त्यांना जाहीर करण्यात आलेली मदत पोहोचवणे, बांधकाम कामगारांची नोंदणी अधिक सुलभ करणे, ९० दिवसांचे प्रमाणपत्र देणे, कामगारांना नोंदणी पूर्ण झाल्यावर ओळखपत्र देणे, जिल्हा आणि तालुका पातळीवर कामगार विभागामार्फत नोडल ऑफिसर नेमणे अशी आवश्यक ती कार्यवाही प्राधान्याने करण्यात येत आहे.

### महत्त्वपूर्ण निर्णय

- लॉकडाऊन काळात स्थलांतरित कामगारांची आणि परराज्यात अडकलेल्या विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यासाठी विशेष रेल्वे व बस गाड्या यांची व्यवस्था केली. तात्पुरती निवासव्यवस्था, अन्न, वस्त्र आणि वैद्यकीय उपचार आणि औषधे यासाठी ८१६ कोटी रुपये खर्च केले.
- मागील वर्षी लॉकडाऊन काळात नोंदणीजीवित असलेल्या कामगारांना दोन टप्प्यात ५ हजार रुपयांचे आर्थिक साहाय्य.
- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळामार्फत एकूण ४४४.७५ कोटी रुपयांहून अधिक रकमेचे वाटप.
- लॉकडाऊन काळात काम बंद असल्याने नोंदीत माथाडी कामगारांना ५ हजार रुपयांपर्यंत आर्थिक मदत. २६ माथाडी मंडळातील ७५,४७० माथाडी कामगारांना ३१ कोटी ११ लाख ६५ हजार रुपयांची आर्थिक मदत.
- लॉकडाऊन काळात नोंदीत सुरक्षा रक्षकांना अतिरिक्त प्रवास भत्ता देण्यास मान्यता. ९ सुरक्षा रक्षक मंडळातील २४,१७० सुरक्षा रक्षकांना ६ कोटी ६६ लाख ९७ हजार ३०० एवढ्या रकमेचा अतिरिक्त प्रवास भत्ता एप्रिल ते जुलै २०२० या कालावधीसाठी अदा.
- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळामार्फत लॉकडाऊन काळात मुंबई, पुणे, ठाणे आणि नागपूर येथील ५२९ बांधकामाच्या ठिकाणी ८२ हजार कामगार अडकले होते. या अडकलेल्यांसह ८८ लाख २३ हजार बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत जेवण, तर ३७ लाख ७५ एवढ्या बांधकाम कामगारांना रात्रीचे भोजन. यासाठी ६ कोटी २९ लाख ९८ हजार ५१० रुपये भोजनासाठी खर्च.
- कोविड-१९ मुळे राज्यात लॉकडाऊन यामुळे अनेक व्यवसाय, उद्योग बंद असल्याने कामगारांना थकीत वेतन न देणे, कामावरून कमी करणे इत्यादी तक्रारी कामगार विभागास प्राप्त झाल्याने कामगार आयुक्तालयाच्या आधिपत्याखाली प्रत्येक जिल्हा कार्यालयामध्ये तक्रार निवारण केंद्राची स्थापना. आतापर्यंत एकूण १ हजार ०६६ तक्रारी हाताळण्यात आल्या, तर २५,६९९ कामगारांना ४७.५९ कोटी रुपये इतका लाभ कामगार आयुक्त कार्यालयाच्या मध्यस्थीने मिळवून देण्यात आला.
- आंतरराज्यीय स्थलांतरित कामगारांना मूळगावी जाण्याकरिता विशेष श्रमिक रेल्वेने जाण्याकरिता कामगारांची वैयक्तिक माहिती घेणे आवश्यक. कामगारांची माहिती एकत्र करण्याकरिता कामगार विभाग आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाच्या साहाय्याने स्वतंत्र पोर्टल (http:migrant.mahalabour.in/migrant/form) विकसित.
- स्थलांतरित कामगारांना सुविधा देण्यासाठी जिल्हाधिकारी यांना आपत्ती व्यवस्थापन निधीतून खर्च करण्यास मान्यता.
- विस्थापित कामगारांच्या व्यवस्थेसाठी ४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर.
- लॉकडाऊननंतर 'मिशन बिगीन अगेन' अंतर्गत उद्योग व्यवसाय सुरू. यामुळे कारखान्यांना १२ तासांच्या २ पाळ्यांमध्ये काही अटींच्या अधीन राहून कारखाने चालवण्यास परवानगी.
- राज्यातील माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळांचे वैधानिक लेखा परीक्षण करण्यासाठी नव्याने लेखा परीक्षकांची सूची (पॅनेल) तयार.
- बाष्पक निरीक्षणाला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल बाष्पके संचालनालयामार्फत बॉयलर इंडिया २०२० चे आयोजन. या कार्यशाळेत बाष्पक अभियंते, बाष्पक परिचर, बाष्पक निर्माते, दुरुस्तीकार असे १५०० हून अधिक सहभागी.
- कोविड -१९ परिस्थितीमुळे बाष्पक मालकांना बाष्पकांच्या दहा वर्षांनंतरचे उघड्या स्वरूपातील निरीक्षणामध्ये एक वर्ष सूट.
- कोविड-१९ पार्श्वभूमीवर ऑनलाइन पद्धतीने नकाशाला मान्यता देण्यासाठी 'नवीन नकाशा मान्यता ऑनलाइन प्रणाली' www.mahaboiler.com या संकेतस्थळावर उपलब्ध.

### बांधकाम कामगारांना अर्थसाहाय्य

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदीत सक्रिय १३ लाख बांधकाम कामगारांना दीड हजार रुपयांचे अर्थसाहाय्य त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट (डीबीटी) जमा करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत राज्यातील १३ लाख बांधकाम कामगारांपैकी ९ लाख १७ हजार नोंदीत बांधकाम कामगारांना अर्थसाहाय्य देण्यात आले आहे. उर्वरित अर्थसाहाय्य लवकरात लवकर देण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येत आहे. अवघ्या ४ दिवसात १३७ कोटी ६१ लाखांचा निधी थेट बांधकाम मजुरांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे. नोंदीत बांधकाम कामगारांची मोफत आरोग्य तपासणी करण्याची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून योजना राबवण्यात येत असून आतापर्यंत २ लक्ष ३ हजार कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, पुणे, नागपूर येथे बांधकाम कामगारांना मध्यान्ह व रात्रीचे भोजन वितरित करण्यात येत आहे.

याशिवाय राज्यातील २५ लाख घरेलु कामगारांसाठी विविध कल्याणकारी साहाय्यासाठी भरीव निधीची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील सुमारे पाच लाख फेरीवाल्यांना प्रत्येकी १५०० रुपयांचे आर्थिक साहाय्य देण्यात येत आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**जगभरात आलेल्या कोविड–१९च्या विषाणूचे संकट अजूनही देशासह महाराष्ट्रावर घोंगावत आहे. जवळपास वर्षभराहून अधिक काळ आपण कोविडच्या संकटाचे नियंत्रण आणि व्यवस्थापन करून त्याच्याशी सामना करत आहोत. राज्यात कोविडचा पहिला रुग्ण आढळल्यापासून या विषाणूविरोधात आपण एकत्रपणे लढत आहोत. मात्र या महामारीमुळे राज्यातील आरोग्य सेवांमधील सुधारणांची आवश्यकता अधोरेखित झाली आहे. त्यामुळे वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांतील आरोग्य यंत्रणा अधिक बळकट करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले जात आहेत.**

# नियम पाळू या, सुरक्षित राहू या...

**अमित देशमुख,** वैद्यकीय शिक्षण मंत्री



राज्यात मार्च २०२१ पासून कोविड-१९ची दुसरी लाट आली असून या लाटेमध्ये बाधितांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. रुग्णांची संख्या कमी करण्याची गरज म्हणून राज्यात कडक टाळेबंदी लागू करण्यात आली. या काळात आर्थिक दुर्बल घटकांना अन्नधान्य आणि आर्थिक साहाय्य केले जात आहे. कोविड विषाणूची साखळी तोडणे आवश्यक असल्याने राज्यात आणखी कडक निर्बंध लावण्यात आले आहेत.

सध्या राज्यात कोविडचा वाढता प्रादुर्भाव पाहता रुग्णांना सेवा देण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांनी त्यांच्या सेवांचा विस्तार करण्याची आवश्यकता आहे. रुग्णशय्या, ऑक्सिजन, व्हेंटिलेटर्स या साधनसामग्रीची संख्या वाढवण्यासाठी आवश्यक ते निर्णय राज्य शासनमार्फत घेण्यात येत आहेत. कोविड विषाणूच्या प्रादुर्भावाची दुसरी लाट पाहता वैद्यकीय महाविद्यालयाची जी रुग्णालये पूर्णपणे रुग्णांनी भरली गेली आहेत त्या ठिकाणी संलग्न अशी कोविड केअर सेंटर्स सुरू करण्याची आवश्यकता आहे. यासाठी रुग्ण व्यवस्थापन करणे गरजेचे असून, त्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

## ऑक्सिजन वाहतुकीचे नियोजन

सौम्य आणि कमी लक्षणे असणाऱ्या रुग्णांवर उपचारासाठी मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. सध्या ऑक्सिजनचे १०० टक्के उत्पादन हे फक्त वैद्यकीय कारणासाठीच आरक्षित ठेवण्यात आले आहे. त्यामुळे सर्व जिल्ह्यांना ऑक्सिजनचा पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने वाहतुकीचे नियोजन करून ऑक्सिजन पुरवठ्यात सुलभता निर्माण करण्यात येत आहे. राज्यातील रुग्णांना आवश्यक असणाऱ्या व्हेंटिलेटर्सची मागणी लक्षात घेता याबाबत केंद्राकडे राज्य शासन मागणी करत आहे.



## उपाययोजना

महाराष्ट्रात कोविडचा संसर्ग फैलावू नये आणि रुग्णसंख्या वाढू नये यासाठी आपण देशभरात लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनपूर्वी काही कडक निर्बंध आणले, आणि त्यानंतर देशभरात लॉकडाऊन जाहीर करण्यात आला. काही काळानंतर आपण 'मिशन बिगीन अगेन' असे म्हणत आपण सर्व रुळावर आणण्याचा प्रयत्न करत असतानाच पुन्हा राज्यात कोविडची रुग्णसंख्या झपाट्याने वाढताना दिसू लागली. त्यामुळे मग आपण पुन्हा ही रुग्णसंख्येची चेन तोडण्यासाठी काही कडक निर्बंध 'ब्रेक दि चेन'अंतर्गत लागू केले आहेत. आतासुद्धा महाराष्ट्रातील कोविड रुग्णसंख्या कमी व्हावी, यासाठी आपण १४ एप्रिल २०२१ च्या रात्री ८ वाजल्यापासून संचारबंदी लागू केली आहे.

गेल्या वर्षभरात आपण कोविडचे नियंत्रण आणि व्यवस्थापन करण्यासाठी अनेक विविध उपाययोजना हाती घेतल्या असून त्या उर्वरित राज्यांसाठी आणि अन्य देशांसाठीही आदर्श ठरल्या आहेत. मला येथे सांगण्यास आवडेल की, गेल्या वर्षी राज्य शासनाने 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' ही मोहीम राज्यभरात राबवली. विशेष म्हणजे ही देशातील एक अभिनव आरोग्य तपासणी मोहीम ठरली. दोन फेऱ्यांमध्ये राज्यातील सर्व कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले तर अतिजोखमीच्या व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिक यांचे विशेष सर्वेक्षणदेखील करण्यात आले. या मोहिमेमुळे कोविड संसर्ग झालेले अनेक रुग्ण सापडण्यास मदत झालीच पण राज्याचा आरोग्य नकाशा तयार होण्यास मदत झाली आहे. कोविडची लढाई अद्यापही सुरू असून जनजागृतीसाठी 'मी जबाबदार' ही मोहीम सुरू करण्यात आली आहे.

कोविडसंदर्भात आरोग्य व

### कोरोना प्रतिबंधासाठीचे महत्त्वपूर्ण निर्णय

- कोविड नियंत्रणासाठी राज्य शासनाला वैद्यकीय आणि तांत्रिक साहाय्य करण्यासाठी वरिष्ठ डॉक्टरांचे राज्य कृती दल (टास्क फोर्स) स्थापन केले आहे.
- संक्रमित व्यक्तींची चाचणी करण्यासाठी पुरेशा चाचणी प्रयोगशाळा उभारण्यात आल्या आहेत.
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांद्वारे स्थापित २० कोविड रुग्णालयात सुमारे ६००० हून अधिक खाटा कोविड रुग्णांसाठी उपलब्ध, तर यापैकी १६०० हून अधिक खाटा अतिदक्षता (आयसीयू) साठी राखीव. ९५ टक्क्यांहून अधिक खाटा ऑक्सिजनसह.
- तात्पुरत्या स्वरूपातील विशाल (जम्बो) कोविड रुग्णालये विक्रमी वेळेत उभारण्यात आली.
- रुग्णालयांकडून उपचारासाठी अवास्तव दर आकारला जाऊ नये, यासाठी महात्मा फुले जीवनदायी योजनेद्वारे सुनिश्चिती करण्यात आली.
- शासकीय रुग्णालयांतील खाटांच्या क्षमतेबरोबरच कोविड रुग्णांसाठी खासगी रुग्णालयांमध्ये वाजवी दराने पुरेशा खाटा राखून ठेवण्यात आल्या.
- खासगी रुग्णालयांतील उपचारांचा खर्च, प्रयोगशाळा चाचणी, सीटी स्कॅन, मुखपट्ट्या इत्यादींच्या किंमतीचे विनियमन करण्यात आले.
- कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. राज्यातील नागरिकांकरिता लसींचा कोटा वाढवण्यासाठी राज्य शासन केंद्र शासनाकडे पाठपुरावा करत आहे.
- वैद्यकीय पायाभूत सोयीसुविधांचे बळकटीकरण करण्यावर भर देताना २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये १०० विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीला प्रवेश देऊन नंदूरबार येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरू केले आहे.
- सार्वजनिक आरोग्यविषयक पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीची गरज ओळखून उस्मानाबाद, सिंधुदुर्ग, रायगड, सातारा आणि नाशिक येथे नवीन वैद्यकीय महाविद्यालये उभारण्यास राज्य शासनाच्या मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. तसेच अमरावती आणि परभणी येथेही वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात येणार आहेत.
- नवीन वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याकरिता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सार्वजनिक-खासगी भागीदारीचे धोरण निश्चितकरण्याची कार्यवाही सुरू आहे.
- राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची क्षमतावाढ आणि स्थापन होणाऱ्या नवीन शासकीय महाविद्यालयांमुळे राज्यात पदवी स्तरावरील २४०० तर पदव्युत्तर स्तरावर १ हजार आणि विशेषज्ञांच्या २०० जागा वाढवणार आहेत.
- याच वर्षामध्ये मुंबईतल्या सेंट जॉर्ज रुग्णालयात १०० खाटा असलेल्या नवीन अतिदक्षता कक्ष सुविधा देखील सुरू करण्यात आली आहे.
- विभागाच्या नियंत्रणाखाली १८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आरटीपीसीआर चाचणी प्रयोगशाळा सुरू करण्यात आल्या आहेत. आजपर्यंत राज्यात सुमारे ५०० हून अधिक प्रयोगशाळा कार्यरत आहेत.
- कोविड संसर्गातून बऱ्या झालेल्या रुग्णांमध्ये फुफ्फुस, यकृत आणि मूत्रपिंडाच्या तसेच मानसिक तणावाच्या तक्रारी उद्‌भवत असल्याने प्रत्येक जिल्हा रुग्णालयांमध्ये आणि शहरी भागात वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये 'पोस्ट कोविड कौन्सिलिंग व ट्रीटमेंट सेंटर' सुरू करण्यात आले आहेत.
- राज्यात परिचर्यांची कमतरता आणि संसर्गजन्य आजारांचा वाढता फैलाव विचारात घेऊन रुग्णसेवांशी संबंधित इतर अभ्यासक्रमांमध्येही बदल करून रुग्णसेवेशी निगडित शाखांना प्रोत्साहन आणि प्राधान्य देण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. यासाठी राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न १४ शासकीय परिचर्या विद्यालयांचे महाविद्यालयांमध्ये रूपांतर करण्यात येणार आहे, तर १७ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना जोडून भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार महाविद्यालयांची टप्प्याटप्प्याने स्थापना करण्यात येणार आहे.
- राज्यातील १८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, ३ दंत महाविद्यालय आणि ५ शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांच्या सध्याच्या विद्यावेतनात १० हजार रुपयांची वाढ.
- आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता प्रादेशिक कोटा (७०:३०) आरक्षण पद्धत रद्द. प्रादेशिक आरक्षण रद्द झाल्याने सर्व भागातील विद्यार्थ्यांना आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमासाठी शिक्षणाची समान संधी उपलब्ध होणार.
- लस संशोधनाचा वारसा असणाऱ्या हाफकिन संस्थेमार्फत कोविड प्रतिबंधात्मक लस उत्पादनासाठी पुढाकार घेण्यात येणार.
- राज्यातील कोविड परिस्थितीशी सामना करण्यासाठी पाच हजार वैद्यकीय अधिकारी आणि १५ हजार नर्सेस उपलब्ध करून देण्यात येणार.

सुरक्षाविषयक उपाययोजनांबाबत आपल्याला सतत दक्ष राहण्याची गरज आहे. येणारा काळ आपल्या सर्वांसाठी कठीण असल्याने आपण सर्वांनीच सुरक्षित अंतराचे पालन करण्याची, मुखपट्ट्यांचा (मास्क) वापर करण्याची आणि नियमितपणे हात धुण्याची गरज आहे. कोविड साथरोगाचा मुकाबला करण्यासाठी आपण सर्वांनीच स्वत:च्या आरोग्याबरोबरच इतरांच्या आरोग्याची आणि सुरक्षेचीदेखील काळजी घेणे आवश्यक आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**संपूर्ण देशात कोरोनाचा संसर्ग मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. राज्यातही हा संसर्ग प्रचंड वाढल्याने रुग्णसंख्याही झपाट्याने वाढली. आरोग्य यंत्रणेवर प्रचंड ताण आला, मात्र 'ब्रेक दि चेन' मोहिमेदरम्यान जिल्हा प्रशासनांनी कोरोना विषाणूच्या प्रतिबंधासाठी प्रयत्नांची शिकस्त करत रुग्णांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या. अनेक नावीन्यपूर्ण प्रयोग केले, युद्धपातळीवर काम करत ऑक्सिजन प्रकल्प व कोविड सेंटरची निर्मिती केली. याबाबतच्या काही निवडक यशकथा..**

# तत्पर प्रशासन

## गाव तिथं कोविड केअर सेंटर

कोरोनाच्या सामान्य रुग्णांपासून इतरांना बाधा होऊ नये, गावातल्या गावात रुग्णांना उपचार मिळून रुग्ण त्वरित बरा व्हावा, यासाठी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात 'गाव तिथं कोविड केअर सेंटर' उभे राहत आहे. सोलापूर जिल्ह्यात नव्याने १०० कोविड केअर सेंटर उभी राहत असून सद्य:स्थितीत या संकल्पनेतून बार्शी तालुक्यात ९ कोविड केअर सेंटर सुरू झाली आहेत.

जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी या संकल्पनेला प्रत्यक्षात आणायला सुरुवात केली आहे. पाच हजार लोकसंख्या असणाऱ्या प्रत्येक गावात कोविड केअर सेंटर तयार करण्यात येत आहेत. ज्या गावात प्राथमिक आरोग्य केंद्र आहे, तिथे मंगल कार्यालय किंवा शाळांमध्ये कोविड केअर सेंटर सुरू करण्यात येत आहे.



### सरपंचांसोबत संवाद

श्री. स्वामी यांनी जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचे सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी यांच्याशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधून संकल्पनेची माहिती दिली. प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ठिकाणी मंगल कार्यालय, सभागृह हॉल किंवा शाळा निश्चित करून पाहणी करावी. या ठिकाणी मूलभूत सुविधांची व्यवस्था आणि विजेची व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. कोविड केअर सेंटरमध्ये लक्षणे नसलेले व सौम्य लक्षणे असलेल्या कोरोना रुग्णांना दाखल करायचे आहे. रुग्णांना लक्षणे गंभीर असतील, श्वास घेण्यास त्रास होत असेल तर त्या रुग्णांना डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर किंवा डेडिकेटेड कोविड हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात येणार आहे.

### नागरिकांची मदत

कोविड सेंटरसाठी आरोग्य कर्मचारी, गावातील खासगी डॉक्टरांच्या सेवा घेण्यात येणार आहेत. त्यांना विनंती करून त्यांच्या सेवेचे वेळापत्रक निश्चित केले जाणार आहे. रुग्णांना लागणारी औषधे ही जिल्हा परिषदेमार्फत देण्यात येणार असून इतर साहित्यासाठी गावातील दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था यांची मदत घेण्यात येणार आहे.

### प्रत्येक सेंटरमध्ये २५-२५ बेड्स

जिल्ह्यात एक वैद्यकीय महाविद्यालय, तीन उपजिल्हा रुग्णालये, १४ ग्रामीण रुग्णालये, ७७ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि याअंतर्गत ४३१ उपकेंद्रे रुग्णांना सेवा देत आहेत. याचबरोबर १४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि सहा आयुर्वेदिक दवाखाने आहेत. ग्रामीण भागात ७७ प्राथमिक आरोग्य केंद्रांसोबत अन्य ३३ ठिकाणी नव्याने कोविड केअर सेंटर उभारण्यात येणार असून आठ ठिकाणी ती कार्यरत झाली आहेत. प्रत्येक कोविड केअर सेंटरमध्ये २५ ते ५० बेडची सुविधा निर्माण करण्यात येत आहे.

**तालुकानिहाय कोविड केअर सेंटर :**
अक्कलकोट - ६, बार्शी - ५, करमाळा - ५, माढा - ९, मोहोळ - ८, मंगळवेढा - ३, माळशिरस - १९, पंढरपूर - २१, सांगोला - १०, दक्षिण सोलापूर - ९ आणि उत्तर सोलापूर - ५.

### कोविड सेंटरचा फायदा

कोविड झाला म्हटले की, रुग्ण निम्मा घाबरून जातो. मोठ्या शहरातील दवाखान्यात जाण्यास गावातील रुग्ण घाबरतात. दवाखान्याची सोय गावातच होणार असल्याने चाचणी करून घेण्याचे प्रमाण वाढून रुग्ण आजार अंगावर काढणार नाहीत. परिणामी कोरोनाची साखळी तोडण्यास मदत होणार आहे. इतरांना संसर्ग होणार नाही. गावातच सोय झाल्याने घरचे जेवण मिळेल. डॉक्टरांच्या देखरेखीखाली रुग्ण राहतील. जाण्यायेण्याचा खर्च, वेळ वाचेल.

**– धोंडिराम अर्जुन,** माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर

## पोलिसांनी घेतली पोलिसांची काळजी

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत संसर्गाचा वेग जास्त असल्याने सोलापूर शहर आणि जिल्ह्यात कोरोनाचे रुग्ण वाढू लागले. आरोग्य यंत्रणेवर ताण येऊ नये, यासाठी शहर पोलीस आयुक्त कार्यालयाने पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि त्यांचे नातेवाईक यांच्यासाठी डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल सुरू केले आहे. शहर पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी त्यांचे कुटुंबीय यांच्यावर या हॉस्पिटलमध्ये उपचार केले

जाणार आहेत.

शहर पोलीस दलाच्या कल्याण निधीतून पोलीस मुख्यालयाच्या पब्लिक स्कूलमध्ये कोविड हॉस्पिटल सुरू करण्यात आले आहे. सध्या या ठिकाणी ६० बेड्सची व्यवस्था करण्यात आली आहे. २५ बेड्सला ऑक्सिजनची व्यवस्था करण्यात आली आहे. २५ बेड्सला व्हेंटिलेटरची सुविधा आहे. काही दिवसातच बेडची संख्या १०० पर्यंत वाढवली जाणार आहे.

सतत बंदोबस्तात असणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना कोरोना संसर्ग झाल्यास पटकन उपचार करता यावे, यासाठी हे कोविड हॉस्पिटल सुरू करण्यात आले आहे. यामुळे शहरातील शासकीय दवाखान्यांवरील ताण कमी होण्यास मदत होईल. त्याचबरोबर पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना तत्काळ उपचार मिळण्यासाठी हे हॉस्पिटल उपयुक्त ठरेल, असे पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी सांगितले. हे हॉस्पिटल उभारण्यासाठी पोलीस उपायुक्त दीपाली घाटे, वैशाली कडूकर, बापू बांगर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पंढरपुरात ३८ तासांत उभारले कोविड हॉस्पिटल

कोरोना संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पोलीस यंत्रणेचा मोठा सहभाग आहे. पोलीस अधिकारी कर्मचारी यांना कोरोनाची लागण झाली तर तत्काळ उपचार मिळावेत, यासाठी पंढरपूर पोलीस संकुल येथे केवळ ३८ तासांत सर्व सुविधायुक्त ८२ बेड्सच्या कोविड हॉस्पिटलची उभारणी करण्यात आली. यामध्ये ४२ ऑक्सिजनचे बेड्स व इतर ४० बेड्स राहणार आहेत.



जिल्हा पोलीस कल्याण निधी आणि देणगीदारांच्या माध्यमातून निधी जमा करून हॉस्पिटल सुरू करण्यात आले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली ही सुविधा निर्माण करण्यात आली आहे.

सातारा येथील डब्लू.आर. ग्रुप ऑफ बिझनेसचे रोहन वाघमारे आणि त्यांचे अभियंते, कर्मचारी यांनी केवळ ३८ तासांत हॉस्पिटलमध्ये आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा निर्माण करून दिल्या. या हॉस्पिटलमधील वैद्यकीय उपचारासाठी लाईफलाईन हॉस्पिटलचे डॉ. निरज दोडके, डॉ. सचिन बेलदार तसेच वैद्यकीय अधिकारी, नर्सिंग स्टाफ कार्यरत राहणार आहेत.

हॉस्पिटलमुळे पोलीस-अधिकारी कर्मचाऱ्यांच्या आरोग्याबाबतची सुविधा निर्माण झाल्याने मोठा दिलासा मिळाल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी सांगितले.

– **अविनाश गरगडे,** उपमाहिती कार्यालय, पंढरपूर

## प्रयोगशील 'स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ'

मराठवाड्यातील एक वैभव म्हणजेच नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ. या 'अ' दर्जाच्या विद्यापीठामध्ये अनेक नावीन्यपूर्ण संशोधन झाले आहे. येथे असणाऱ्या प्रत्येक कुलगुरूंनी विद्यापीठाच्या विकासामध्ये उत्तरोत्तर भर टाकली आहे. कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या सकारात्मक दृष्टिकोनातून या विद्यापीठामध्ये कोविड-१९ चाचणी प्रयोगशाळेची निर्मिती करण्यात आली.

कोरोनाचा राज्यात व मराठवाड्यात शिरकाव झाला तेव्हा नांदेड, परभणी, लातूर आणि हिंगोली या चारही जिल्ह्यांमध्ये दिवसेंदिवस कोरोना रुग्णांमध्ये वाढ होत होती. पण जवळपास एकही कोरोना तपासणी प्रयोगशाळा उपलब्ध नसल्यामुळे सर्व लाळेचे नमुने हे औरंगाबाद, पुणे आणि हैदराबाद इथे जात होते. एवढ्या दुरून तपासणी अहवाल रुग्णापर्यंत पोहचायला चार-पाच दिवस लागत होते. या दरम्यान आजार वाढत असे आणि रुग्णांचा मृत्यू होत होता. या सर्व घडामोडीवर अगदी बारकाईने कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांचे लक्ष होते. त्यांनी त्यानंतर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण आणि जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांच्याशी चर्चा करून कोविड-१९ लॅब उघडण्याचा मनोदय व्यक्त केला. प्रशासनानेही तेवढ्याच तत्परतेने सर्वोतोपरी मदत करण्याची तयारी दर्शवली. त्यानंतर युद्धपातळीवर अवघ्या १५ दिवसामध्ये या प्रयोग शाळेचे काम पूर्ण झाले. लगेच नवी दिल्ली येथील राष्ट्रीय वैद्यकीय संशोधन परिषद (आयसीएमआर) यांची मान्यता प्राप्त झाली. त्यानंतर नॅशनल क्रेडिशन बोर्ड फॉर टेस्टिंग ॲण्ड कॅलिब्रेशन लॅबोरेटरीज (एनएबीएल) यांचीही मान्यता मिळाली. अशी मान्यता मिळवणारे कोविड-१९ नमुना तपासणी प्रयोगशाळा असणारे हे देशातील एकमेव विद्यापीठ ठरले आहे.

अशा सर्व तयारीनिशी २२ एप्रिल २०२० रोजी ही प्रयोगशाळा सुरू झाली. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारची प्रयोगशाळा उभी करणारे 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ' हे पहिले विद्यापीठ ठरले आहे. या प्रयोगशाळेचे वैशिष्ट्ये म्हणजे ही प्रयोगशाळा विद्यापीठामध्ये उपलब्ध असलेली साधने, उपकरणे, शास्त्रज्ञ, संशोधक विद्यार्थी आणि प्राध्यापक



यांचा उपयोग करून उभारली आहे. या प्रयोग शाळेमध्ये तांत्रिक काम करणारे कर्मचारी हे विद्यापीठाचे विद्यार्थी आणि संशोधक विद्यार्थी आहेत. त्यांच्या सहकार्यातून ही प्रयोगशाळा यशस्वी काम करत आहे. त्यानंतर पुढेपुढे कामाचा भार वाढल्यामुळे जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडून मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले.

नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली या चारही जिल्ह्यांतून दररोज अनेक लाळेचे नमुने तपासणीसाठी येतात. त्या-त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाला २४ तासाच्या आत तपासणी अहवाल पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात येत असतो. अशा प्रकारे जो अहवाल पूर्वी चार-पाच दिवसानंतर मिळायचा तो आता २४ तासाच्या आत मिळतो. त्यामुळे बाधित रुग्णाला तत्काळ औषधोपचार घेता येतो.

### तीन सत्रात काम

आज कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव बघता या प्रयोगशाळेवरही खूप भार पडला आहे. येथील प्रमुख डॉ. जी.बी. झोरे यांची तर तारेवरची कसरत होत आहे. या प्रयोगशाळेची क्षमता ही दर आठ तासाला किंवा एका सत्रामध्ये ५०० नमुने तपासणीची आहे. पण सध्याचा काळ बघता या प्रयोगशाळेमध्ये रोज तीन सत्रामध्ये काम चालू आहे. म्हणजेच दररोज १५०० नमुने तपासणीचे काम चालू आहे. असे आतापर्यंत ९४,००० च्या वर नमुने तपासले आहेत.

राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालक मंत्री अशोक चव्हाण यांनी आतापर्यंत दोन वेळा, तर महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी एक वेळा या प्रयोगशाळेस प्रत्यक्ष भेट देऊन विद्यापीठ प्रशासनाचे कौतुक केले.

**– डॉ. अशोक स. कदम,**
जनसंपर्क अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## कायमस्वरूपी ऑक्सिजनची व्यवस्था

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या ऑक्सिजन टंचाईच्या प्रश्नावर मार्ग काढून नाशिक जिल्ह्यातील सर्व सरकारी रुग्णालयांत कायमस्वरूपी ऑक्सिजनची व्यवस्था व्हावी, यासाठी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांतून पहिल्या टप्प्यात ९ रुग्णालयांमधील ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून १० कोटी ८८ लक्ष रुपयांच्या या अत्यावश्यक प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यामुळे लवकरच जिल्ह्यातील बहुतांश रुग्णालयात स्वतःचा ऑक्सिजन प्रकल्प निर्माण होऊन ऑक्सिजनचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे.



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील शासकीय रुग्णालयात कायमस्वरूपी ऑक्सिजन बेड्सची व्यवस्था करण्याच्या सूचना पालकमंत्री छगन भुजबळ यांनी जिल्हा प्रशासनाला दिलेल्या होत्या. त्यानुसार जिल्हाधिकारी सुरज मांढरे यांनी जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात १० रुग्णालयांत ऑक्सिजन प्रकल्पाची निर्मिती करण्यासाठी १० कोटी ८८ लक्ष रुपयांच्या या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

नाशिक जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात नाशिक जिल्हा रुग्णालयासोबत मनमाड, येवला, कळवण व चांदवड या उपजिल्हा रुग्णालयात तर सिन्नर, पिंपळगाव बसवंत, इगतपुरी आणि वणी या ग्रामीण रुग्णालयात ऑक्सिजन प्रकल्पाची निर्मिती करण्यात येणार आहे. महिन्याभरात हे प्रकल्प कार्यान्वित होणार आहेत. या प्रकल्पांच्या माध्यमातून प्रतिदिन नैसर्गिक स्वरूपात ८६० जम्बो सिलेंडरची निर्मिती करण्यात येणार असल्याने या रुग्णालयांत कायमस्वरूपी ऑक्सिजनची व्यवस्था होणार आहे. या प्रकल्पामुळे लिक्विड ऑक्सिजनची गरज भासणार नसून नैसर्गिक स्वरूपात हवेतील प्राणवायू यातून मिळणार आहे. त्यामुळे वाहतुकीचा येणारा खर्चही कमी होणार असून, कायमस्वरूपी ऑक्सिजनची व्यवस्था होणार आहे. या नावीन्यपूर्ण प्रकल्पामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**– अर्चना देशमुख,** माहिती अधिकारी, नाशिक

## नाशिक मनपातर्फे संवादातून जनजागृती

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात कोरोना रुग्णांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी राज्य शासनाच्या 'ब्रेक दि चेन' च्या निर्बंधांचे काटेकोरपणे पालन करण्यात येत आहे. यासाठी महानगरपालिका परिक्षेत्रातील प्रतिबंधित क्षेत्रांची संख्या वाढवण्यात आली आहे. या क्षेत्रातील नागरिकांनी कोरोना नियमावलीचे पालन करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत सातत्याने संवाद साधण्यात येत आहे.

प्रत्येक कोरोनाबाधित रुग्णाला योग्य वेळेत आवश्यक उपचार मिळण्यासाठी महानगरपालिका कोविड केअर सेंटर्स तसेच खासगी रुग्णांलयातील बेड्स अधिग्रहित करून बेड्सची संख्या वाढवणे, तेथे रुग्णांना सर्व आरोग्यविषयक सोयी सुविधा उपलब्ध करण्यावर भर देत आहे. अधिग्रहित करण्यात आलेल्या रुग्णालयांत रुग्णांवर होणारे उपचार, तेथे ठेवण्यात आलेली व्यवस्था यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिकेने काही पथकांची नेमणूक केली आहे. शहरी भागातील प्रतिबंधित क्षेत्र आणि 'ब्रेक दि चेन' च्या नियमांचे काटेकोरपणे पालन होण्यासाठी तसेच गर्दीच्या ठिकाणांवर नियंत्रण आणून कायदा व सुव्यवस्था राहण्यासाठी महानगरपालिका व पोलीस प्रशासन समन्वयाने काम करत आहेत. ट्रेसिंग, टेस्टिंग व ट्रिटमेंट या त्रिसूत्रीच्या मदतीने कोरोना विषाणूची साखळी तोडण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाचे सामाजिक जाणिवेने अविरतपणे कार्य सुरू आहे.

**– किरण डोळस,** माहिती सहायक, नाशिक

## अल्पावधीत कोविड केअर सेंटरची पुनर्निर्मिती

'ब्रेक दि चेन' मोहिमेंतर्गत नाशिकच्या उंटवाडीतील ठक्कर डोम येथे महापालिका आणि क्रेडाई यांच्या पुढाकाराने युद्धपातळीवर कोविड केअर सेंटरची पुनर्निर्मिती करण्यात आली. येथे सेंटरची नितांत गरज भासत होती. त्यामुळे क्रेडाई व नाशिक महानगरपालिकेने पुढाकार घेत पुन्हा तातडीने कार्यवाही करत ३५० बेड्सचे सुसज्ज कोविड केअर सेंटर सुरू केले.



ठक्कर डोम सेंटर सुरू झाल्याने सौम्य ते मध्यम लक्षणे असलेल्या कोरोना रुग्णांची येथे सोय झाली आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत नाशिकमधील जिल्हा रुग्णालयासह महापालिकेची आणि इतर खासगी रुग्णालयातील बेड कमी पडत आहेत. या सेंटरमुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. आता येथे कोरोना रुग्णांवर उपचार सुरू झाले आहेत. वाढती रुग्णसंख्या आणि अपुरी साधनसामग्री यामुळे पालकमंत्र्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत या सेंटरसाठी अनेक खासगी डॉक्टर, नर्स, परिचारिका व समाजसेवक पुढे आले आहेत.

– **मोहिनी राणे,** सहायक संचालक, नाशिक

## सामान्य रुग्णालयाचे बळकटीकरण

वाढत्या कोरोना रुग्णांच्या पार्श्वभूमीवर मालेगाव येथील सामान्य रुग्णालयात मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा उभ्या केल्या जात आहेत. महानगरपालिका क्षेत्रामध्ये गंभीर स्वरूपाची लक्षणे असणाऱ्या रुग्णांना आयसीयू बेड्सची कमतरता असल्याने हा प्रश्न सोडवण्याचे काम हाती घेण्यात आले. रुग्ण सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी आयसीयू बेडसह ५८ व्हेंटिलेटर्स उपलब्ध करण्यात आली असून सामान्य रुग्णालयात २३, महानगरपालिका रुग्णालयात ३०, महिला रुग्णालयात ३, तर नांदगाव व दाभाडी येथे प्रत्येकी १ याप्रमाणे व्हेंटिलेटर्स उपलब्ध झाली आहेत. या व्हेंटिलेटर्समुळे हायफ्लो नेझल व बायपॅप यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्यामुळे अत्यवस्थ रुग्णांना ऑक्सिजनचा सुरळीत व अखंडीत पुरवठा होत आहे. सामान्य रुग्णालयात टेमसेक फाऊंडेशन



इंटरनॅशनल कंपनी, सिंगापूर यांच्याकडून रत्ना निधी स्वयंसेवी संस्थेमार्फत सामाजिक दायित्व निधीतून प्राप्त झालेली ऑक्सिजन कॉन्संट्रेटरची १२ यंत्रे ही सामान्य रुग्णालयातील आरोग्य यंत्रणेच्या बळकटीकरणासाठी उपयुक्त ठरतील.

मालेगाव सामान्य रुग्णालयातील रुग्णांसाठी ऑक्सिजनचा तुटवडा भासू नये, यासाठी सामान्य रुग्णालयास २० के.एल. ऑक्सिजन टँक मंजूर करण्यात आला असून लवकरच तो कार्यान्वित होईल. सध्या उपयोगात असलेले ऑक्सिजन सिलेंडर व ड्युरा सिलेंडरच्या रिफीलसाठी नाशिक किंवा औरंगाबाद येथे वाहतूक करावी लागते. २० के.एल.चा ऑक्सिजन टँक बसवल्यानंतर वाहतूक खर्चासह वेळेची व मनुष्यबळाची देखील मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.

– **मनोहर पाटील,** माहिती सहायक, मालेगाव

## श्रीसाई संस्थानची सामाजिक बांधिलकी

कोरोना प्रादुर्भावाने त्रस्त झालेल्या सर्वसामान्य नागरिक आणि गोरगरीब रुग्णांना चांगली आरोग्य सेवा मिळावी, यासाठी साईबाबा संस्थानने पुढाकार घेतला आहे. लॉकडाऊनमुळे परराज्यातील आपल्या गावी जाणाऱ्या मजूर, कामगार यांना मोफत भोजन व इतर सुविधा संस्थानने सामाजिक बांधिलकीतून पुरवल्या.

शिर्डी व परिसरातील तालुक्यामध्ये कोरोनाबाधित रुग्णांची संख्या वाढतच गेली. या रुग्णांवर योग्य उपचार व्हावे, यासाठी संस्थानने साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि साईनाथ रुग्णालय येथे



सुसज्ज डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल सुरू केले आहे. धर्मशाळेच्या निसर्गरम्य परिसरात कोविड केअर सेंटर आणि विलगीकरण कक्षसुद्धा उभारण्यात आले आहे. येथील रुग्णांचा संपूर्ण खर्च संस्थानकडून करण्यात येतो. वैद्यकीय संचालक डॉ. प्रीतम वडगावे, डॉ. मैथिली पितांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली हॉस्पिटलचे डॉक्टर्स आणि स्टाफ अहोरात्र सेवा देत आहेत.

कोविडबाधित रुग्णांच्या उपचारासाठी सध्या ऑॉक्सिजनचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. संस्था नि दात्यांच्या सहकार्याने ऑॉक्सिजनचा अत्याधुनिक प्रकल्प लवकरच उभारणार असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी कान्हूराज बगाटे यांनी दिली. तसेच रेमडेसिवीर इंजेक्शनचा साठा दात्यांच्या माध्यमातून करण्यात येत आहे. यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. या

व्यवस्थेमुळे कोरोना रुग्णांची ससेहोलपट थांबणार आहे. संस्थानच्या रुग्णालयातच कोरोना चाचणीसाठी लॅबची निर्मिती करण्यात येत असल्याची माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र ठाकरे यांनी दिली.

**– जयंत कर्पे,** माहिती सहायक, शिर्डी

## 'ट्रीपल टी'च्या माध्यमातून साखळी खंडित

जळगाव जिल्ह्यात कोरोनाची साखळी खंडित (ब्रेक दि चेन) करण्यासाठी कोरोना संशयित रुग्ण शोधण्याबरोबरच बाधित रुग्णांच्या संपर्कातील व्यक्तींचा शोध घेऊन त्यांची तपासणी करणे व बाधित आढळून आल्यास त्यांच्यावर तातडीने उपचार करणे अर्थात 'ट्रेसिंग, टेस्टिंग आणि ट्रीटमेंट' (ट्रीपल टी) ही त्रिसूत्री अवलंबल्यानेच कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यास मदत होत आहे.



शिवाय जिल्हा रुग्णालयाची नकारात्मक प्रतिमा दूर होऊन आता जिल्हा शासकीय रुग्णालय अत्याधुनिक सुविधा देणारे शासकीय कोविड रुग्णालय म्हणून नावारूपास आले आहे. हाच 'जिल्हाधिकारी राऊत पॅटर्न' कोरोनाबाधितांचे प्राण वाचवून मृत्युदरही कमी करत आहे. गतवर्षी जिल्ह्यात कोरोनाचा प्रादुर्भाव सुरू झाला. त्या वेळी कोरोनाबाधितांचा मृत्युदर सर्वाधिक असलेला जळगाव जिल्हा अशी जिल्ह्याची ओळख झाली होती. त्याच काळात अभिजीत राऊत यांनी जिल्हाधिकारी पदाची सूत्रे स्वीकारली.

## जिल्हाधिकारी 'ॲक्शन मोड'मध्ये

जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेत सुधारणा करण्यासाठी श्री. राऊत यांनी विविध रुग्णालयात अचानक तपासणी करणे, रुग्णांना योग्य ट्रिटमेंट, जेवण, नाश्ता आदि सुविधा योग्य पद्धतीने मिळते की नाही याची विचारपूस करण्याचा धडाका लावला. यासाठी ते रात्री- बेरात्री रुग्णालयांना भेटी देऊ लागले. यामुळे रुग्णालयातील डॉक्टर व आरोग्य कर्मचारी सजग झाले व सुविधाही सज्ज झाल्यात.

## मृत्युदरावर नियंत्रण

रुग्णांसह खासगी, शासकीय डॉक्टरांना विश्वासात घेत, प्रत्येक समस्येवर नावीन्यपूर्ण उपाय शोधत मृत्युदरावर नियंत्रण मिळवले. वेळेवर उपचाराअभावी रुग्ण दगावत होते. जिल्हाधिकारी राऊत यांनी ही बाब हेरून जिल्हास्तरावर तज्ज्ञांचा टास्क फोर्स तयार केला. वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर्स, खासगी रुग्णालये आणि स्वयंसेवी संस्था अशा सगळ्यांशी संवाद, समन्वय साधून विपरीत परिस्थितीत मृत्युदर रोखण्यात, तो कमीत कमी करण्यात यश मिळवले.

## रुग्णांना वेळेवर उपचार

डॉ. उल्हास पाटील रुग्णालय, इकरा युनानी महाविद्यालय, देवकर महाविद्यालय आदि कोरोना बाधितांसाठी अधिग्रहीत करण्यात आले. खासगी रुग्णालयांना कोविडच्या रुग्णांवर उपचार करण्यास परवानगी देण्यात आली.

## 'बेडसाइड असिस्टंट' उपक्रम

रुग्णालयाच्या स्वच्छतागृहात रुग्णाचे अपघात होण्याच्या घटना टाळण्यासाठी बेडसाइड असिस्टंट ही नवी कल्पना जळगाव जिल्ह्यात राबवण्यात आली. कंत्राटी स्वरूपात ही विशेष टीम कोविड रुग्णालयांमध्ये तयार करण्यात आली. त्यातून रुग्णांना अडचणी आल्यास त्याचे जागेवरच निराकरण होत आहे किंवा तत्काळ डॉक्टरांना माहिती देऊन उपचार सुरू आहेत. या उपक्रमाचे देशभरात कौतुक झाले.

## खासगी डॉक्टरांचा सहभाग

खासगी डॉक्टरांशी बोलून त्यांच्याकडे तपासणीसाठी येणाऱ्या संशयित रुग्णांची माहिती जमा करण्यात आली, त्यांची चाचणी करून ते बाधित आढळले तर त्यांना दाखल करून उपचार करण्यात आले. एका बाधित रुग्णाच्या संपर्कातील किमान १२ ते १५ जणांची तपासणी करण्यासाठी कोरोना संशयित रुग्ण शोध मोहीम आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून जिल्हाभर राबवल्याने बाधित रुग्ण सापडण्यास मदत झाली.

जिल्ह्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हा आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यावर भर देण्यात आला. यासाठी आतापर्यंत दीडशे कोटींच्या वर खर्च शासन, जिल्हा नियोजन समिती व लोकसहभागातून केला आहे. यातून कोरोना विषाणू तपासणी प्रयोगशाळा, ऑक्सिजन टँक, ऑक्सिजन व आयसीयु तयार करणे, आरोग्य कर्मचाऱ्यांना सुरक्षिततेची साधने पुरवणे, रुग्णांना औषधे उपलब्ध करणे आदी बाबींना प्राधान्य दिले. जिल्ह्यातील कोरोनाची साखळी खंडित (ब्रेक दि चेन) करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे मार्गदर्शन व टास्क फोर्सचे सदस्य, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधिक्षक, महापालिका आयुक्त, जिल्हा शल्यचिकित्सक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालचे अधिष्ठाता, डॉक्टर्स, आरोग्य कर्मचारी, जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, आयएमए यांचे मोलाचे योगदान लाभले. त्याचबरोबर 'ट्रीपल टी' च्या त्रिसूत्रीचा प्रभावी वापर केल्याने कोरोनाला रोखण्यात यश येत आहे.

**– विलास बोडके,** जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव

**'ब्रेक दि चेन' अंतर्गत राज्यातील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यात येऊन विकास कामांना गती देण्याचे कार्य करण्यात येत आहे. या काळात विविध निर्णय, प्रकल्पांचे शुभारंभ, 'ब्रेक दि चेन' अंतर्गत जाहीर केलेल्या मदतीच्या वितरणाचा शुभारंभ, विविध योजनांचा, प्रकल्पांचा राज्य मंत्रिमंडळातील सर्व सदस्य सातत्याने आढावा घेऊन प्रशासनास निर्देश देत प्रगतीच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे पडत आहे. या सर्वांची थोडक्यात माहिती....**

# पाऊल पडते पुढे

## बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाचे भूमिपूजन

दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानाजवळील महापौर निवास येथे विकसित करण्यात येत असलेल्या बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाचे भूमिपूजन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उद्योग मंत्री तथा स्मारकाचे सचिव सुभाष देसाई, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री अनिल परब, महापौर किशोरी पेडणेकर, खासदार संजय राऊत, अरविंद सावंत, राहुल शेवाळे, विनायक राऊत, आमदार सदा सरवणकर, रोहित पवार आदी मान्यवर उपस्थित होते.



**उद्धव बाळासाहेब ठाकरे**
मुख्यमंत्री

## ई-ऑफिस प्रणाली

माहिती तंत्रज्ञान विभागाने ई-ऑफिस प्रणाली अधिक सोपी, सुटसुटीत आणि वापरण्यास सुलभ करावी, अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिल्या. माहिती तंत्रज्ञान विभागाच्यावतीने ई-ऑफिस प्रणालीचे सादरीकरण करण्यात आले त्या वेळी ते बोलत होते. ज्या विभागात मोठ्या प्रमाणात नस्त्यांची निर्मिती होते त्या विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ई-ऑफिस प्रणालीचे प्रशिक्षण देण्यात यावे. ई-ऑफिस प्रणालीचे सर्व विभागांच्या सचिव आणि संबंधित मंत्र्यांसमोर सादरीकरण करण्यात यावे. त्यांच्या सूचनाही घेण्यात याव्यात. ई-ऑफिसच्या माध्यमातून मुख्यमंत्री कार्यालयात येणारा पत्रव्यवहार हाताळताना संबंधितांना त्यासंबंधीच्या सूचना व त्यांनी पाठवलेल्या पत्रावरची कार्यवाही कळवली जावी. ही ई-ऑफिस प्रणाली सुरक्षित आणि परिपूर्ण असावी, असेही मुख्यमंत्री श्री.ठाकरे यांनी या वेळी सांगितले.

१५ शासकीय विभागांच्या १५०० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ई-ऑफिस प्रणालीचे प्रशिक्षण दिले असल्याची माहिती या वेळी देण्यात आली.

## उद्यान विकासासाठी मदत

नागपूर येथील बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानाचा खासगी भागीदारीतून विकास करण्यासाठी नवीन संस्थेची निवड करावी. या उद्यानातील विकास कामांसाठी शासन सर्वतोपरी मदत करेल, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानाच्या कामाची प्रगती तसेच वन विकास महामंडळाच्या कामाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत घेतला. वन विकास महामंडळ सध्या गोल लाकूड विक्री करत आहे. त्याऐवजी बाजारामध्ये लागणारे चिराण आकाराचे लाकूड तयार करून जनसामान्यांना चांगले दर्जेदार व स्वस्त दरात लाकूड उपलब्ध करून देण्यासाठी आलापल्ली येथे वन विभागाची आरागिरणी वन विकास महामंडळाला हस्तांतरित करण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली.

## कन्हारगाव ५०वे अभयारण्य

चंद्रपूर जिल्ह्यातील कन्हारगाव अभयारण्याची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. कन्हारगाव हे राज्यातील ५०वे अभयारण्य ठरले आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वन्यजीव मंडळाच्या गेल्या डिसेंबर महिन्यात झालेल्या बैठकीत कन्हारगाव अभयारण्य घोषित करण्यास मान्यता देण्यात आली होती.

## मान्सूनपूर्व तयारीची कामे

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असला तरी मान्सूनपूर्व कामांवर त्याचा परिणाम होणार नाही, याची काळजी घ्यावी आणि नालेसफाईसह साथरोग नियंत्रणासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. तसेच नियोजनानुसार सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत, अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबई महानगरपालिका प्रशासनाला दिल्या आहेत. मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मान्सूनपूर्व कामांचा आढावा मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी ऑनलाइन बैठकीत घेतला.

## अनुदान वितरणाचा शुभारंभ

आदिवासी बांधवांसाठी राज्य शासनाने जाहीर केलेल्या पॅकेजअंतर्गत खावटी अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांना थेट अनुदान वाटपाचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने झाला. दुरदृश्य प्रणालीद्वारे झालेल्या या कार्यक्रमास विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, आदिवासी विकास मंत्री ॲड. के.सी. पाडवी, आमदार

## 'ऑक्सिजन एक्सप्रेस'



महाराष्ट्राला कोरोनाच्या संकटकाळात दिलासा देणारी आनंदवार्ता असून राज्याला विशाखापट्टणम येथून प्राणवायू (ऑक्सिजन) वाहून आणण्यासाठी मोठे टँकर घेऊन जाणारी देशातील पहिली 'ऑक्सिजन एक्सप्रेस' रवाना करण्यात आली. रेल्वे वाहतुकीमार्गे जलद गतीने ऑक्सिजनची वाहतूक व्हावी, अशी मागणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केंद्र शासनाकडे केली होती. त्याला रेल्वेने प्रतिसाद देताच राज्याने जलद गतीने हालचाली करून १९ एप्रिल २०२१ रोजी पहिली रेल्वे रवाना केली. परिवहन मंत्री ॲड. अनिल परब यांनी या एक्सप्रेसला हिरवा दिवा दाखवून रवाना केले.

राज्यातील कोविड रुग्णांची ऑक्सिजनची गरज भागवण्यासाठी इतर राज्यातून ऑक्सिजन पुरवठा करण्यासाठी भारतीय रेल्वेने पुढाकार घेतला आहे. या पार्श्वभूमीवर ४५ मेट्रिक टन लिक्विड वैद्यकीय ऑक्सिजनच्या ३ टँकरसह ही ऑक्सिजन एक्सप्रेस कळंबोली येथे दाखल झाली. विशाखापट्टणम् येथून वैद्यकीय लिक्विड ऑक्सिजन आणण्याकरिता पनवेलमधील कळंबोली येथून १० ट्रकची ऑक्सिजन एक्सप्रेस रवाना करण्यात आली होती. ही ऑक्सिजन एक्सप्रेस राज्यात दाखल झाल्यामुळे कोविड रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशाखापट्टणम् येथून निघालेल्या या ऑक्सिजन एक्सप्रेसमधील १० टँकरपैकी ३ टँकर हे नागपूर येथे, ४ टँकर हे नाशिक येथे आणि उर्वरित ३ टँकर हे कळंबोली, पनवेल येथे उतरवण्यात आले.

सुनील भुसारा, आमदार विनोद निकोले आदी उपस्थित होते.

खावटी कर्ज योजना पुनर्जीवित करून कर्जाऐवजी अनुदान देणारी ही योजना कोरोनाच्या संकटकाळात राज्याने आणली आहे. यासाठी शासनाने विभागाला ४८२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. आदिवासींच्या जीवनमानात बदल करून त्यांचा विकास करण्यासाठी विभाग कसोशीने प्रयत्न करत आहे. राज्यात पहिल्यांदाच एकाच वेळी १२ लाख कुटुंबांना या योजनेचा ऑनलाइन लाभ उपलब्ध करून देत आहोत.

## विद्यापीठाचे विभागीय केंद्र



**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक-नागपूर या विद्यापीठाचे उपकेंद्र बालेवाडी-पुणे येथे तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे विभागीय केंद्र पुणे येथे तर उपकेंद्र बारामती येथे सुरू करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत घेण्यात आला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली 'कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक-नागपूर व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक'चे उपकेंद्र, विभागीय केंद्र स्थापन करण्याबाबतच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती सभागृहात आयोजित या बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत आदींसह संबंधित विद्यापीठांचे मान्यवर व अधिकारी उपस्थित होते.

## निधी वितरणाचा आढावा

'कोरोना' संसर्गाची साखळी तोडण्यासाठी लागू असलेले, निर्बंधकाळात नागरिकांना मदत करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या ५ हजार ४७६ कोटींच्या मदत पॅकेजचे लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत तातडीने पोहोचले पाहिजेत. त्यासाठी युद्धपातळीवर अंमलबजावणी करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रशासनाला दिले. सात कोटी नागरिकांना मोफत अन्नधान्य, सामाजिक न्याय विभागाच्या ३५ लाख, आदिवासी विभागाच्या १२ लाख लाभार्थ्यांना आगाऊ मदतीचे तत्काळ वितरण, बांधकाम क्षेत्रातील नोंदणीकृत कामगार, घरेलु कामगार, राज्यातील फेरीवाले, रिक्षाचालक यांच्यासह विविध समाजघटकांसाठी जाहीर केलेल्या मदतीचा निधी तत्काळ वितरित करावा. यासाठी आवश्यक शासन निर्णय, निधी वितरणाचे आदेश जारी झाले आहेत. उर्वरित आदेशही तत्काळ जारी व्हावेत, अशा सूचना उपमुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिल्या. मुख्यमंत्र्यांनी राज्यासाठी जाहीर केलेल्या मदत पॅकेजअंतर्गत देण्यात येणारी मदत संबंधित घटकांपर्यंत तत्काळ पोहोचवण्याच्या कार्यवाहीचा आढावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

## निर्देशांक वेब पोर्टलचे उद्घाटन

नियोजन विभागाच्या अर्थ व सांख्यिकी महासंचालनालय व उद्योग विभागाच्या उद्योग संचालनालयाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य औद्योगिक उत्पादन निर्देशांक वेब पोर्टल'चे ऑनलाईन उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र हे देशात अग्रेसर राज्य आहे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक उत्पादन निर्देशांक या वेब पोर्टलच्या माध्यमातून

राज्यातल्या औद्योगिक क्षेत्राच्या वाढीचा कल लक्षात येईल. राज्याच्या अर्थचक्राला गती देण्यासाठी राज्याचे उद्योग धोरण ठरवून ते प्रभावीपणे राबवण्यासाठी तसेच धोरणांचा नियमित आढावा घेण्यासाठी, हे वेबपोर्टल निश्चितच उपयोगी ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या वेळी व्यक्त केला.

### रुग्णवाढीचा दर कमी करण्यासाठी प्रयत्न

कोरोनाचे रुग्ण वाढत असतानाच रेमडेसिवीरची मागणीही वाढत आहे. त्यामुळे कृत्रिम तुटवडा निर्माण होऊन या औषधाचा काळाबाजार होणार नाही याची खबरदारी घेण्याचे निर्देश नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. तसेच, कोरोना रुग्णवाढीचा दर पाच टक्क्यांपेक्षा कमी राहील, यासाठी सर्व आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, गृह विलगीकरणात असलेले रुग्ण घरातच राहावेत, याची काळजी घ्यावी आणि त्यासाठी आवश्यकता भासल्यास संबंधित सोसायटीचे अध्यक्ष व सचिव यांना विशेष पोलिस अधिकारी म्हणून तात्पुरते अधिकार द्यावेत, असे निर्देशही त्यांनी दिले.

कोकण, पुणे आणि नागपूर विभागातील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिकांचे आयुक्त, तसेच नगर परिषदा आणि नगरपंचायतींचे मुख्याधिकारी यांची कोरोनाविषयक आढावा बैठक दूरदृश्य प्रणालीद्वारे झाली.

### १४ प्रकल्पांची उभारणी



**एकनाथ शिंदे**
नगरविकास मंत्री

ऑक्सिजनची वाढती मागणी लक्षात घेऊन हवेतून ऑक्सिजन तयार करणाऱ्या १४ प्रकल्पांची मुंबई महानगर क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बसवण्यासाठी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेतला आहे. ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, मीरा-भाईंदर, वसई-विरार, नवी मुंबई आणि पनवेल या महापालिकांमध्ये पुढील काही दिवसांमध्ये हे प्रकल्प कार्यान्वित होतील, असे मंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. वाढत्या कोरोना रुग्णसंख्येमुळे ऑक्सिजनची गरज भासू लागली आहे. त्यावर मात करतानाच भविष्यात अशा प्रकारचा तुटवडा जाणवू नये, यासाठी हवेतून ऑक्सिजन शोषून रुग्णांना पुरवणाऱ्या प्रकल्पांची उभारणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हवेतून ऑक्सिजन शोषून त्यातून शुद्ध ऑक्सिजन रुग्णांना पुरवण्यात येतो. साधारणत: एका प्रकल्पामधून दररोज सुमारे २ टन (९६० एलपीएम) ऑक्सिजनची निर्मिती होऊन सुमारे २०० ऑक्सिजन बेड्सला त्याचा पुरवठा करता येऊ शकतो, असे मंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

### दोन कोटी रुपयांची मदत

कोरोना संकटामुळे राज्य अडचणीत असतानाही राज्यातील नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देत शासनाने राज्यातील सर्व नागरिकांचे मोफत लसीकरण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या संकटकाळात एका जबाबदार राजकीय पक्षाचा नेता आणि लोकप्रतिनिधी म्हणून राज्य सरकारच्या या कामात थोडीशी मदत म्हणून आपण आपल्या एक वर्षाच्या वेतनाची आणि काँग्रेस पक्षाच्या सर्व आमदारांच्या एक महिन्याच्या वेतनाचे असे एकूण जवळपास दोन कोटी रुपये, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने ५ लक्ष रुपये आणि अमृत उद्योग समूह संगमनेरच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या लसीकरणाचा खर्च मुख्यमंत्री साहाय्यता निधीला देणार असल्याची घोषणा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.



**बाळासाहेब थोरात**
महसूल मंत्री

कोरोना रुग्णांवरील उपचारांसाठी ऑक्सिजन, औषधे, वैद्यकीय उपकरणे अशा विविध गोष्टींची आवश्यकता आहे. मुख्यमंत्री साहाय्यता निधीला दिलेली ही मदत गरीब रुग्णांसाठी आवश्यक सामग्री खरेदी करण्यासाठी उपयोगात येऊ शकते. त्यामुळे राज्यातील इतर राजकीय पक्ष, सहकारी संस्था औद्योगिक आस्थापना यांनी आपल्यापरीने मुख्यमंत्री साहाय्यता निधीला मदत करावी, असे आवाहन श्री. थोरात यांनी केले आहे.

### नेस्को संकुलात खाटांची सुविधा



**सुभाष देसाई**
उद्योगमंत्री

कोरोना रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन गोरेगाव येथील नेस्को जम्बो कोविड सेंटर येथे आणखी दीड हजार रुग्णांच्या उपचारासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी नुकतीच या केंद्राला भेट देऊन आढावा घेतला. या कोविड सेंटरला डीआर सिस्टिम व एक्सरे मशिन-सीआर सिस्टिम या यंत्रांची व्यवस्था आमदार निधीतून करण्यात येईल. लवकरात लवकर या मशिन्स रुग्णसेवेसाठी नेस्को सेंटरला सुपुर्द केल्या जातील, असे मंत्री सुभाष देसाई यांनी स्पष्ट केले.

### गोदामांच्या बांधकामांना मान्यता

नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील मौजे पिंपळगाव बसवंत ता. निफाड, नांदगाव ता. नांदगाव, अंगणगाव ता. येवला, मौजे राजूरबाहूला ता. नाशिक, मौजे चंदनपुरी ता. मालेगाव जि. नाशिक येथील शासकीय गोदाम बांधकामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ

यांनी दिली.



**छगन भुजबळ**
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

## अन्नधान्य वितरणावर लक्ष

राज्य सरकारने लागू केलेल्या निर्बंधांच्या काळात गोरगरिबांसाठी शिवभोजन थाळी महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. राज्यातल्या सर्व शिवभोजन केंद्रांना आपण दीडपट जास्त थाळ्या वितरण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्या सर्व गरजू आणि सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी आपली सर्वांची असल्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवभोजन थाळी आणि अन्नधान्य वितरण संदर्भात विभागाचे अधिकारी व राज्याच्या सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यासमवेत मंत्रालयात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक घेतली.

## प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना

महाराष्ट्रात कोरोनाची वाढती संख्या लक्षात घेता आणि कोरोनाला अटकाव करण्यासाठी राज्य सरकारने केलेले कडक निर्बंध लक्षात घेता सर्वसामान्य जनतेसाठी प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न सुरक्षा योजना पुन्हा राबवण्यास केंद्र शासनाने परवानगी दिली आहे. या संदर्भातील मागणी अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री पियुष गोयल आणि खासदार शरद पवार यांना पत्र लिहून केली होती. या संदर्भात केंद्र सरकारने मे आणि जून महिन्यांसाठी मोफत पाच किलो धान्य देणार असल्याची घोषणा केली असल्याने राज्यातील नागरिकांना याचा मोठा फायदा होणार आहे.

## शिवभोजन थाळीचा आस्वाद



राज्यातील गोरगरीब, शेतकरी, मजूर व विद्यार्थी वर्ग उपाशी राहू नये, यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सूचनेनुसार महाविकास आघाडी सरकारचा महत्वाकांक्षी कार्यक्रम असलेली शिवभोजन योजना सुरू करण्यात आली आहे. राज्यात २६ जानेवारी २०२० ते १ मे २०२१ या कालावधीत तब्बल ४ कोटी नागरिकांनी शिवभोजन थाळीचा आस्वाद घेतला असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

राज्यात २६ जानेवारी २०२० ला या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. त्यानुसार केवळ १० रुपयांत राज्यातील गोरगरीब नागरिकांना शिवभोजन थाळी उपलब्ध करून देण्यात आली. पुढे कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या काळात राज्यातील गोरगरीब, शेतकरी, मजूर व विद्यार्थी वर्ग उपाशी राहू नये, यासाठी शासनाने केवळ ५ रुपयांमध्ये ग्राहकांना जेवण देण्याचा निर्णय मार्च २०२० मध्ये घेण्यात आला होता. हा सवलतीचा दर मार्च २०२१ पर्यंत लागू करण्यात आलेला होता. मात्र, अद्यापही कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झालेला नसल्याने आणि पुन्हा आपण राज्यात कडक निर्बंध लागू केल्यामुळे ही थाळी आता आपण मोफत देत आहोत. तसेच राज्य शासनाने यापूर्वीच लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर सद्य:स्थितीत सुरू असलेल्या शिवभोजन केंद्रांच्या प्रतिदिन इष्टांकामध्ये दीडपट वाढ केली आहे. यात जे शिवभोजन केंद्र दिवसाला १०० थाळ्या वितरित करत होते ते केंद्र आता १५० थाळ्या वितरित करत आहे.

## बेरोजगारांना रोजगार



**नवाब मलिक**
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री

कोरोनाच्या संकटामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण झाली असताना कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत राबवण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांद्वारे राज्यात मार्च २०२१ मध्ये १० हजार १११ उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यात आला असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक यांनी दिली. महास्वयंम वेबपोर्टल, ऑनलाइन रोजगार मेळावे आदी विविध उपक्रमांद्वारे राज्यात नोकरीइच्छुक उमेदवार आणि विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था यांची सांगड घालून रोजगार उपलब्ध करून देण्यात येतो.

अशा विविध उपक्रमांमधून मागील वर्षी २०२० मध्ये राज्यात १ लाख ९९ हजार ४८६ उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यात यश आले, तर या वर्षात जानेवारी ते मार्चअखेर ४३ हजार ९१० बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यात आला आहे.

## कौशल्य विद्यापीठ अधिनियम अमलात

राज्यातील युवक-युवतींना एकात्मिक आणिसमग्र स्वरूपाचे कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध व्हावे, तसेच त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त कौशल्याधारित उच्च शिक्षणाद्वारे रोजगारक्षम करून रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात या हेतूने राज्यात महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (सार्वजनिक-अर्थसाहाय्यित) स्थापन करण्यात येत आहे. यासाठी विधानमंडळाने व राज्यपालांनी संमत केलेले महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, राज्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी १४ एप्रिल २०२१ पासून अमलात आणण्यात आले आहे, अशी माहिती कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक यांनी दिली. यामुळे राज्यात सार्वजनिक-अर्थसाहाय्यित कौशल्य विद्यापीठाच्या स्थापनेच्या कामास गती मिळणार आहे.

## कडक कारवाई

सध्या महाराष्ट्रात कोविडच्या रुग्ण संख्येत झपाट्याने वाढ होत असून, संभाव्य वाढणाऱ्या रुग्णांचे हित लक्षात घेऊन मेडिकल ऑक्सिजन व रेमडेसिवीर इंजेक्शनचा काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री राजेंद्र शिंगणे यांनी दिले. या संदर्भात रेमडेसिवीर इंजेक्शनचे उत्पादक व मेडिकल ऑक्सिजन उत्पादक यांच्या प्रतिनिधींसमवेत मंत्री श्री.शिंगणे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

राज्यात केवळ सात दिवस पुरेल एवढाच रक्तसाठा शिल्लक आहे. त्यामुळे सर्व रक्तपेढ्यांनी तसेच स्वयंसेवी संस्थांनी कोरोना नियमांचे काटेकोरपणे पालन करून रक्तदान शिबिरे आयोजित करावी, असे आवाहनही राजेंद्र शिंगणे यांनी या वेळी केले.

## रेमडेसिवीर उत्पादन कंपनीला भेट

कोरोनाच्या उपचारासाठी आवश्यक असलेले रेमडेसिवीर या औषधाचा पुरवठा सुरळीत व्हावा, तसेच त्याचे उत्पादन कसे वाढवता येईल याची पाहणी करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, यांनी विविध औषध निर्मिती कंपन्यांना प्रत्यक्ष भेट दिली आहे. कंपनीने उत्पादनात वाढ करावी, दर्जेदार औषधे रुग्णांना उपलब्ध व्हावी यासाठी उत्पादकांनी प्रयत्नशील राहावे, असेही आवाहन डॉ. शिंगणे यांनी या कंपन्यांना केले आहे.



**डॉ. राजेंद्र शिंगणे**
अन्न व औषध प्रशासन मंत्री

## योग्य नियोजन

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ऑक्सिजनचा पुरवठा समप्रमाणात होण्याच्या दृष्टीने त्याचप्रमाणे रेमडेसिवीरच्या उपलब्धतेबाबत अन्न व औषध प्रशासन विभागाच्या माध्यमातून योग्य नियोजन करण्यात येत असल्याची माहिती अन्न व औषध मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी दिली.

अन्न व औषध प्रशासन ऑक्सिजन पुरवठ्याचे विवरणपत्र तयार करून ते उत्पादक व जिल्ह्यांना नियमितपणे देत आहे. रेमडेसिवीर इंजेक्शनचे उत्पादन मे.सिप्ला, हेटेरो, झायडस, मायलन, सन फार्मा, डॉ. रेड्डीज व जुबिलंट या औषध उत्पादक कंपन्यामार्फत करण्यात येते. राज्यात मे. सिप्ला लि. या उत्पादकाचे उत्पादन होते. वरील उत्पादकांना प्रामुख्याने भिवंडी, पुणे व नागपूर येथील डेपोमधून या औषधाचा पुरवठा करण्यात येतो.

## विकास शुल्क ग्रामनिधीत

राज्यातील ग्रामीण भागातील ३ हजार २२९ चौरस फुटापर्यंतच्या (३०० चौरस मीटर) भुखंडावरील बांधकामांना नगररचनाकाराच्या परवानगीची गरज नसल्याबाबतचा निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. याऐवजी ग्रामस्थांना आता बांधकामासाठी काही कागदपत्रे ग्रामपंचायतीकडे सादर करावयाची असून विकास शुल्क आणि बांधकाम कामगार उपकर भरावयाचा आहे. या संदर्भात अधिक स्पष्टीकरणासाठी ग्रामविकास विभागामार्फत राज्यातील सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्राद्वारे अवगत करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देणाऱ्या या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.



**हसन मुश्रीफ**
ग्रामविकास मंत्री

## घरकुलांची बांधकामे

राज्यातील ग्रामीण भागातील घरकुल बांधकामांना चालना देण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणण्यासाठी राष्ट्रीय आवास दिन २० नोव्हेंबर २०२० पासून ३१ मार्च २०२१ या साधारण साडेचार महिन्यांच्या कालावधीत राबवण्यात आलेल्या महाआवास अभियानास चांगले यश मिळाले. प्रधानमंत्री आवास योजना व राज्यपुरस्कृत घरकुल योजनांमधून अभियान कालावधीत राज्यात ७ लाख ४१ हजार ५४५ घरकुलांचे बांधकाम करण्यात आले असून, त्यापैकी ३ लाख ६२१ घरकुले बांधून पूर्ण करण्यात आली आहेत, तर ४ लाख ४० हजार ९२४ घरकुलांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे.

प्रगतिपथावर असलेल्या घरकुलांचे बांधकाम चालू महिन्याअखेर पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

## राष्ट्रीय पंचायत पुरस्कार

केंद्र शासनामार्फत दिले जाणारे राष्ट्रीय पंचायत पुरस्कार जाहीर झाले असून, यामध्ये राज्यातील सातारा जिल्हा परिषद, गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) आणि राहाता (जि. अहमदनगर) या दोन पंचायत समित्यांसह राज्याच्या विविध भागातील १६ ग्रामपंचायतींनी विविध गटांमध्ये पुरस्कार मिळवत उत्तुंग कामगिरी केली असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

दीनदयाळ उपाध्याय पंचायत सशक्तीकरण पुरस्कार २०२१ (पडताळणी वर्ष २०१९-२०) हा राज्यातून सातारा जिल्हा परिषदेला आणि गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) व राहाता (जि. अहमदनगर) या दोन पंचायत समित्यांना तसेच १४ ग्रामपंचायतींना जाहीर झाला.

नानाजी देशमुख राष्ट्रीय गौरव ग्रामसभा पुरस्कार २०२१ हा राज्यातून मान्याचीवाडी (ता. पाटण, जि. सातारा) या ग्रामपंचायतीने पटकावला. ग्रामपंचायत विकास आराखडा पुरस्कार २०२१ हा राज्यातून लोणी बुद्रुक (ता. राहाता, जि. अहमदनगर) या ग्रामपंचायतीने पटकावला. बालसुलभ ग्रामपंचायत पुरस्कार २०२१

हा राज्यातून सिरेगाव (ता. अर्जुनी मोरगाव, जि. गोंदिया) या ग्रामपंचायतीने पटकावला.

## तक्रारी सोडवण्याला प्राधान्य

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने ग्राहकांनी स्वतः मीटर रिडिंग पाठवून व देयके भरून महावितरणला सहकार्य करण्याचे आवाहन ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केले आहे.



**डॉ. नितीन राऊत**
ऊर्जामंत्री

मंत्रालय येथे वीजबिल व थकबाकी यासंदर्भात पार पडलेल्या बैठकीत डॉ. राऊत यांनी वीज ग्राहकांच्या तक्रारी तत्काळ सोडवण्यासाठी ग्राहक तक्रार निवारण यंत्रणेला संवेदनशील करण्याचे महावितरण व्यवस्थापनाला निर्देश दिले.

ग्राहकांना ऑनलाइन व मोबाईल ॲपद्वारे तक्रार करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरीपण जे ग्राहक याचा वापर करू शकत नाहीत त्यांच्यासाठी स्थानिक कार्यालयात ऑफलाईन तक्रारी नोंद करून घेण्याची व्यवस्था करावी.

कोरोना काळात रीडिंग न घेता बिले पाठवल्याच्या ग्राहकांनी तक्रारी केल्या आहेत. म्हणून शक्यतो मीटर रीडिंग घेऊन वीज बिले पाठवण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. कोरोनामुळे काही वेळा महावितरणला रीडिंग घेणे शक्य होत नसल्याने ग्राहकांनी जर मोबाईल ॲपद्वारे रीडिंग पाठवले तर त्यांना रीडिंगनुसार बिल उपलब्ध करून देता येईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजना

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अर्जदारांना प्राधान्याने महावितरणद्वारे घरगुती ग्राहकांसाठी वीज जोडणी उपलब्ध करून देण्यासाठी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी पुढाकार घेतला असून १४ एप्रिल ते ६ डिसेंबर २०२१ या कालावधीत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजना' राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेसंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला.

## १०० गाळे रुग्णालयाला हस्तांतरित

मानवतेच्या दृष्टिकोनातून कॅन्सरग्रस्त रुग्णांच्या नातेवाइकांची व काळजीवाहू व्यक्तींच्या निवासाची सोय करता यावी या दृष्टीने शासनाने पहिल्यांदाच म्हाडाच्या १८८ उपलब्ध असलेल्या गाळ्यांपैकी १०० गाळे टाटा मेमोरियल रूग्णालयाला देण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेऊन १०० गाळे टाटा मेमोरियल रुग्णालयाला हस्तांतरित केले असल्याची माहिती गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी दिली.

## महिलांसाठी सुसज्ज वसतिगृह



**जितेंद्र आव्हाड**
गृहनिर्माण मंत्री

मुंबईत नोकरीसाठी आलेल्या महिलांची राहण्याची सोय व्हावी, यासाठी मुंबईतील ताडदेव येथे म्हाडाच्या संक्रमण शिबिराच्या जागेवर म्हाडातर्फे एक हजार महिलांसाठी सुसज्ज वसतिगृह उभारले जाणार असल्याची माहिती गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी दिली.

राज्य शासन नेहमीच विविध सामाजिक उपक्रमांद्वारे लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. त्यामुळे राज्यभरातून महिला येथे नोकरी करण्यासाठी येतात, मात्र त्यांना कार्यालयाच्या जवळ राहणे शक्य होत नाही. कार्यालयापासून दूर उपनगरांमध्ये राहावे लागत असल्याने रोजच्या प्रवासामुळे त्यांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होतो. ही गरज ओळखून 'म्हाडा' अंतर्गत ताडदेव येथील एम.पी. मिल कम्पाऊंड परिसरात महिलांसाठी हे सुसज्ज वसतिगृह उभारण्यात येणार आहे. मंत्रालय, मुंबईसेंट्रल, महालक्ष्मी, ग्रँट रोड अशा महत्त्वूपर्ण ठिकाणांपासून हे वसतिगृह अगदी जवळ असल्याने मुंबईत नोकरी करणाऱ्या महिलांचा वेळ व प्रवासाचा त्रास वाचणार आहे. ४५० खोल्यांचे हे सुसज्ज वसतिगृह साधारणपणे दीड ते दोन वर्षात उभारले जाणार असून येत्या सहा महिन्यांत त्याबाबतची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन काम सुरू केले जाणार असल्याचेही गृहनिर्माण मंत्री श्री. आव्हाड यांनी सांगितले.

## अत्यावश्यक सेवेत समावेश

मदत व पुनर्वसन विभागाद्वारे कोविड-१९ रोग प्रसार खंडित करणे (ब्रेक दि चेन) अभियानांतर्गत पशुसंवर्धनाशी संबंधित दूध व दुग्धजन्य पदार्थ, अंडी, मांस, मासे, जनावरांचा चारा आदी बाबी अत्यावश्यक सेवेमध्ये समावेश करण्यात आल्याची माहिती पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री सुनील केदार यांनी दिली.

अत्यावश्यक सेवांमध्ये दूध व दुग्धजन्य पदार्थ (डेअरी) आणि फूड शॉपचा समावेश करण्यात आला आहे. तसेच चिकन, कोंबड्या, मटन, अंडी, मासे दुकानांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. यामध्ये जनावरांसाठी आवश्यक असणारे पशू व कुक्कुट खाद्य, चारा याचाही समावेश करण्यात आला आहे. अत्यावश्यक सेवांमध्ये स्थानिक कार्यालयाच्या मान्सूनपूर्व उपक्रमांचा समावेश करण्यात आला असून यामध्ये पशुसंवर्धन विभागामार्फत कोरोना संसर्गाची साखळी तोडण्यासाठीच्या अभियान काळात हाती घ्यावयाच्या लसीकरण



**सुनील केदार**
पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री

कार्यक्रमांचा अंतर्भाव करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

### आपत्ती व्यवस्थापन विभागाचा आढावा

आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक बँक साहाय्यित राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत किनारी जिल्ह्यातील भूमिगत विद्युत वाहिनी, खारप्रतिबंधक बंधारे इत्यादी कामाचा आढावा घेण्यात आला.

राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प राज्याच्या किनारी जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. यासाठी केंद्र शासन, जागतिक बँक, महाराष्ट्र शासन यांच्यात ११ ऑगस्ट २०१५ रोजी करार करण्यात आला आहे. किनारपट्टीवरील जिल्ह्यांना वादळे, चक्रीवादळे इत्यादीमुळे असलेला धोका विचारात घेऊन सुरू असलेली कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना विभागाच्या अधिकाऱ्यांना तसेच कंत्राटदार कंपन्यांना देण्यात आल्या आहेत. कामे विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी राज्य शासन/केंद्र शासन यांच्याकडे देखील पाठपुरवठा करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.



**विजय वडेट्टीवार**
आपत्ती व्यवस्थापन,
मदत व पुनर्वसन मंत्री

### रक्तदान करा

कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेचा महत्त्वपूर्ण टप्पा १ मे पासून सुरू होणार असून १८ वर्षांपुढील सर्वजण लस घेऊ शकणार आहेत. लस घेतल्यानंतर पुढील काही दिवस रक्तदान करता येत नाही. त्यामुळे कोरोना प्रतिबंधक लशीची मात्रा घेण्यापूर्वी रक्तदान करावे, असे आवाहन आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी केले आहे.

श्री. वडेट्टीवार म्हणाले, आता रुग्णालयांमध्ये कोविड आणि नॉन-कोविड अशा दोन्ही रुग्णांवर उपचार केले जात आहेत. त्यामुळे अधिकाधिक रक्तदात्यांची आवश्यकता भासत आहे. त्यातच कोरोना लस घेतल्यावर पुढील काही दिवसांपर्यंत रक्तदान करता येणार नाही. त्यामुळे आधी रक्तदान करा आणि त्यानंतर कोरोनाची प्रतिबंधात्मक लस घ्या त्यासाठी २८ एप्रिलनंतर cowin.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करा. कोरोनामुळे मागील वर्षापासून रक्तदानात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. रक्ताचा तुटवडा पाहून सामाजिक भान जपून रक्तदान करा. त्यामुळे रक्ताची मागणी असणाऱ्या रुग्णांचा जीव वाचवता येईल, असे आवाहन श्री. वडेट्टीवार यांनी केले आहे.

### प्रतिबंधात्मक साहित्य खरेदी

कोरोना विषाणूला प्रतिबंध घालण्यासाठी सर्व आघाड्यांवर प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी जे-जे लागेल ते सरकार करत आहे. रुग्णसंख्येत होणारी वाढ लक्षात घेता आरोग्य कर्मचाऱ्यांना सेवा देताना प्रतिबंधात्मक साहित्याअभावी व्यत्यय येऊ नये आणि त्यामुळे रुग्णांची हेळसांड होऊ नये म्हणून त्यासाठी लागणारे सर्व साहित्य तात्काळ खरेदी करण्याचे आदेश आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिले आहेत.

### पदे भरण्याची प्रक्रिया

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत वर्ग १ ते वर्ग ४ या रिक्त पदांसाठी भरती प्रक्रियेसंदर्भातील कार्यवाही तत्काळ करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी दिले. वर्ग १ मध्ये प्राध्यापक, वर्ग २ मध्ये सहयोगी प्राध्यापक आणि वर्ग ३ आणि वर्ग ४ मधील रिक्त पदे सध्या ५० टक्क्यांपर्यंत भरण्याबाबतची मंजुरी मिळालेली आहे, तर वर्ग ४ मधील पदे वैद्यकीय शिक्षण विभागच्या अखत्यारीत येणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या अधिष्ठातांना कंत्राटी पद्धतीने भरण्याची परवानगी देण्यात आली आहे. संबंधित वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठात्यांनी याबाबत कार्यवाही करून ही पदे तातडीने भरावी. तसेच वर्ग-३ संदर्भात मंजूर पदापैकी ५० टक्के पदे भरण्याची परवानगी राज्य शासनाची असल्याने याबाबतची जाहिरात कालबद्ध वेळेत प्रसिद्ध करून या भरती प्रक्रियेला गती द्यावी, असेही श्री.देशमुख यांनी सांगितले.



**अमित देशमुख**
वैद्यकीय शिक्षण,
सांस्कृतिक कार्य मंत्री

### रुग्णालय उभारणीस गती

चंद्रपूर येथील शासकीय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामासंदर्भात कराराप्रमाणे दिलेल्या सवलतीच्या कालावधीतच काम पूर्ण करावे. याचबरोबर जळगाव येथील शासकीय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयाचे काम नियमानुसार उपलब्ध निधीत पूर्ण करावयाच्या कार्यवाहीस गती द्यावी. संबंधित कामाचा अहवाल तत्काळ सादर करावा, असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी दिले. मंत्रालयात चंद्रपूर आणि जळगाव येथील शासकीय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामासंदर्भात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

### अतिरिक्त मनुष्यबळ

राज्यात कोविड-१९ चा मोठ्या प्रमाणात झालेला फैलाव लक्षात घेता, या परिस्थितीशी सामना करण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा निर्णय वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी घेतला आहे. यानुसार ५,२०० वैद्यकीय अधिकारी आणि १५,००० नर्सेस तातडीने उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

राज्यातील शेवटच्या वर्षात वैद्यकीय पदवी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा येत्या २० एप्रिलला संपणार आहे. या

परीक्षेचा निकाल तातडीने लावून त्यांच्या सेवा इंटर्नशीपसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे कोरोना परिस्थिती हाताळण्यासाठी अतिरिक्त स्वरूपात हे डॉक्टर्स उपलब्ध होणार आहेत.

राज्यातील विविध नर्सिंग कॉलेजमधील जी.एन.एम आणि ए.एन.एम हा अभ्यासक्रम आणि इंटर्नशीप पूर्ण झालेल्या १५ हजार नर्सेसच्या रजिस्ट्रेशनचे काम तातडीने पूर्ण करून त्यांच्या सेवाही आरोग्यसेवेसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या नर्सेसेच्या सेवा त्या-त्या जिल्ह्यात कंत्राटी तत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येतील.

राज्यात विविध जिल्ह्यांत आणि विशेषत: शहरी भागात कोविड परिस्थितीचा सामना करताना वैद्यकीय क्षेत्रातील मनुष्यबळाची मोठी कमतरता जाणवत आहे. या निर्णयामुळे डॉक्टर्स आणि नर्से स यांच्या सेवा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणार आहेत.

## वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या परीक्षा जूनमध्ये

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत येत्या १९ एप्रिलपासून घेण्यात येणाऱ्या वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या परीक्षा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी दिली आहे. या परीक्षा आता येत्या जूनमध्ये घेण्यात येणार असून परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत जाहीर करण्यात येईल.

## विद्यार्थ्यांचे लसीकरण



**उदय सामंत**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता राज्यातील १८ पेक्षा अधिक वय असणाऱ्या सर्व नागरिकांना १ मे २०२१ पासून लस दिली जाणार असून यामध्ये विद्यापीठ व महाविद्यालयातील सुमारे ३६ लाख ८७० विद्यार्थ्यांचे लसीकरण होणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी येथे दिली. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंसोबत महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय परीक्षांबाबत श्री.सामंत यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून बैठक झाली.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या विनंतीनुसार राज्यातील १८ वर्षावरील नागरिकांना लस देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. याची अंमलबजावणी १ मे २०२१ पासून होणार आहे. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता १८ वर्षावरील विद्यार्थ्यांना लस मिळणे आवश्यक असून त्यांच्या आरोग्याची पूर्ण काळजी घेऊन हे लसीकरण करण्यात येणार आहे. यासाठी आरोग्य यंत्रणेशी चर्चा करून पुढील निर्णय घेण्यात येणार आहे.

## खतांची कमतरता भासणार नाही

राज्यात यंदाच्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर रासायनिक खते व युरियाचा तुटवडा भासू नये, यासाठी राज्य शासनामार्फत दीड लाख मेट्रिक टन युरियाचा बफर स्टॉक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी दिली. संरक्षित रासायनिक खतांबाबत असलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक कृषिमंत्री श्री.भुसे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. राज्यात गेल्या वर्षी रासायनिक खतांचा विशेषत: युरियाचा तुटवडा जाणवला होता. त्या पार्श्वभूमीवर यंदाच्या खरीप हंगामात पुरेशी रासायनिक खते उपलब्ध करून देण्यासंदर्भात बैठकीत चर्चा करण्यात आली.

## खरीप हंगामासाठी बियाणे नियोजन



**दादाजी भुसे**
कृषी मंत्री

यंदाच्या खरीप हंगामासाठी राज्यातील शेतकऱ्यांना सोयाबीनसह अन्य पिकांचे गुणवत्तापूर्ण बियाणे पुरवताना त्यांची किंमत वाढवू नका, असे निर्देश कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी महाबीजला दिले. पालेभाज्यांच्या बियाणे निर्मितीमध्ये महाबीजने अधिक लक्ष घालावे, अशी सूचना कृषिमंत्र्यांनी दिली.

कृषिमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगामासाठी बियाणे नियोजनाची बैठक झाली. राज्यात खरीप हंगामाचे एक कोटी ४१ लाख ९४ हजार हेक्टर क्षेत्र असून ज्वारी, बाजरी, भात, मका, तूर, मुग, उडीद, भूईमूग, सोयाबीन, कापूस ही प्रमुख पिके आहेत. राज्यात बियाणे बदल दरानुसार १६ लाख ६७ हजार क्विंटल बियाण्यांची गरज असून महाबीज, राष्ट्रीय बीज निगम आणि खासगी कंपन्या यांच्या माध्यमातून बियाण्यांचा पुरवठा केला जातो. राज्यामध्ये सोयाबीनचे क्षेत्र ४२ लाख २२ हजार १६५ हेक्टर आहे. त्यासाठी ३१ लाख ६६ हजार क्विंटल सोयाबीन बियाणांची आवश्यकता आहे.

सोयाबीन बियाण्यांची कमतरता भासू नये, यासाठी राज्य शासनामार्फत शेतकऱ्यांना स्वत:कडील बियाणे वापरण्याबाबत आवाहन केले होते. त्याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांकडे स्वत:चे सुमारे २० लाख क्विंटल बियाणे उपलब्ध असल्याचे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी या वेळी सांगितले.

## कृषी विभागाचे पुरस्कार

राज्यात दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे शेतकरी व संस्थेस राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत विविध पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. नुकतेच कृषिमंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत २०१८ व २०१९ या दोन वर्षांच्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. शेती क्षेत्रातील सर्वोच्च अशा डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार सांगली जिल्ह्यातील आष्टा येथील संजीव गणपतराव माने (२०१८ करिता),

तर २०१९ करिता बारामती तालुक्यातील पिंपळी येथील राजेंद्र दिनकरराव पवार व नागपूर जिल्ह्यातील सोनेगाव येथील सुनंदा संतोषराव सालोटकर (जाधव) यांना जाहीर झाला आहे.

पुढील वर्षापासून 'युवा शेतकरी', कृषी शास्त्रज्ञांसाठी 'कृषी संशोधक' पुरस्कार नव्याने सुरू करण्यात आल्याचे सांगून आता पुरस्कारांची संख्या ६३ ऐवजी ९९ इतकी केली असल्याचे व पुरस्कारांच्या निकषांमध्ये बदल केले असल्याचे कृषिमंत्री श्री. भुसे यांनी सांगितले.

## एक गाव एक वाण

केंद्र शासनाने या वर्षी अधिसूचना जारी करून बिजी-२ वाणांचे दर वाढवले आहेत. या वाणांची दरवाढ करू नये, अशी विनंती केंद्र शासनाला करणार असल्याचे कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले. कापूस बियाण्यांची वाहतूक सुरळीत व्हावी, यासाठी कृषी आयुक्तालय स्तरावर विशेष कक्ष स्थापन करण्याचे निर्देश देतानाच राज्यातील बीटी कापसाचे क्षेत्र मोठे असल्याचे लक्षात घेऊन बोंडअळी नियंत्रणाबरोबरच कापूस पिकासाठी 'एक गाव एक वाण' ही संकल्पना रुजवण्यासाठी कंपन्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही कृषिमंत्र्यांनी या वेळी केले. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयात श्री. भुसे यांच्या अध्यक्षतेखाली बीटी कापूस बियाणे पुरवठा व त्याच्या दराच्या अनुषंगाने बैठक झाली.

## स्वच्छाग्रहींना मुदतवाढ

कोविड-१९ विषाणूच्या प्रतिकारासाठी सर्वात महत्त्वाचा घटक असणाऱ्या स्वच्छतेच्या प्रचार-प्रसारासाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या राज्यातील स्वच्छाग्रहींना तीन महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली.



**गुलाबराव पाटील**
पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

## टँकर मंजुरीचे अधिकार

कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर पाणी टंचाईच्या निवारणासाठी टँकर मंजूर करण्याचे अधिकार प्रांताधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत, अशी माहिती पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली.

पाणी टंचाईचे निवारण करण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातर्फे टँकर्सची तरतूद करण्यात येते. या अनुषंगाने यंदाही टँकर्सची तरतूद करण्यात आलेली आहे.

आजवर जिल्ह्यातील टँकरच्या मंजुरीचे अधिकार हे जिल्हाधिकाऱ्यांनाच होते. तथापि, सध्या कोविड-१९ म्हणजेच कोरोनाच्या प्रतिकारासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांमुळे जिल्हाधिकाऱ्यांवर कामाचा बोजा पडलेला आहे. यातच ठिकठिकाणी स्थलांतर करणाऱ्या मजूर व नागरिकांसाठी निर्माण केलेल्या शिबिरांकरिता स्थानिक स्वराज्य संस्थेकडून पुरेसा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होऊ शकत नसल्यास, टँकरद्वारे पिण्याच्या साधारण वापरासाठी पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने टँकर मंजुरीचे अधिकार प्रांताधिकाऱ्यांना असल्यास संबंधितांना पिण्याच्या पाण्याचा तातडीने पुरवठा करता येणार आहे.त्याअनुषंगाने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली.

## १०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षांच्या तयारीसाठी खासगी नामवंत संस्थामधून पूर्व परीक्षा ते मुलाखत या सर्व टप्प्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी आता राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाने नवीन योजना जाहीर केली आहे. यामध्ये १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार असून त्यांना दिल्ली अथवा महाराष्ट्रातील खासगी नामवंत संस्थांमधून यूपीएससीच्या तयारीसाठी प्रशिक्षण घेता येणार असल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री ॲड. के.सी. पाडवी यांनी दिली. या योजनेत यूपीएससीच्या पूर्व, मुख्य तसेच मुलाखतीच्या तयारीसाठी प्रशिक्षण घेण्यासाठी १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभागाने निवडलेल्या दिल्ली किंवा महाराष्ट्रातील खासगी नामवंत संस्थांमधून परीक्षेची तयारी करता येणार आहे.

या योजनेकरिता वार्षिक एकूण ४ कोटी ९ लाख ६ हजार रुपये खर्चास मान्यता देण्यात आली असल्याचे श्री. पाडवी यांनी सांगितले.



**ॲड. के. सी. पाडवी**
आदिवासी विकास मंत्री

## रेमडेसिवीर इंजेक्शनवरील खर्च

कोरोना संसर्गामुळे खासगी रुग्णालयात दाखल झालेल्या अनुसूचित जमातीच्या रुग्णासाठीच्या इंजेक्शनवर रेमडेसिवीर येणारा खर्च भागवण्यासाठी प्रत्येक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास विभाग यांना न्युक्लिअस बजेटमधून १० लाख रुपयापर्यंत निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री ॲड. के.सी. पाडवी यांनी दिली.

सध्या कोरोना संसर्गामुळे अनेकजण आजारी पडत आहेत. आदिवासी भागातही या रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. या पार्श्वभूमीवर आदिवासी बांधवांकडील आर्थिक उत्पन्नाची साधने व त्यांची मर्यादा विचारात घेता खासगी रुग्णालयात कोरोना आजारामुळे दाखल झालेल्या राज्यातील अनुसूचित जमातीतील रुग्णास रेमडेसिवीर इंजेक्शनसाठी येणारा खर्च हा न्युक्लिअस बजेट योजनेमधून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली असल्याची माहिती श्री. पाडवी यांनी दिली आहे.

## मुख्यमंत्री सहायता निधी

कोविड १९ विरुद्धच्या लढाईत राज्य शासनास आर्थिक मदत देऊ इच्छिणाऱ्यांसाठी कोविड १९ मुख्यमंत्री सहायता निधी स्थापन करण्यात आला आहे. या विशेष निधीसाठी सामाजिक दायित्वाच्या भावनेतून जास्तीत जास्त नागरिकांनी मदत देऊन कोरोनाविरुद्ध लढण्यासाठी साहाय्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले आहे.

**माहिती खालीलप्रमाणे :-**

**इंग्रजीत -**

Chief Minister's Relief Fund-COVID 19
Savings Bank Account number 39239591720
State Bank of India, Mumbai Main Branch,
Fort Mumbai 400023
Branch Code 00300
IFSC CODE- SBIN0000300



**मराठीत-**

मुख्यमंत्री सहाय्यता निधी-कोविड १९
बँकेचे बचत खाते क्रमांक- ३९२३९५९१७२०
स्टेट बँक ऑफ इंडिया,
मुंबई मुख्य शाखा, फोर्ट, मुंबई ४०००२३
शाखा कोड ००३००
आयएफएससी कोड SBIN००००३००
या देणग्यांना आयकर अधिनियम १९६१ च्या ८० (G) नुसार आयकर कपातीतून १०० टक्के सूट देण्यात येते.

## कोविड सेंटर सुरू करण्यास मान्यता

राज्यात कोरोना रुग्णसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. रुग्णांना रुग्णालयात, कोविड सेंटरमध्ये बेड, ऑक्सिजन बेड मिळणे कठीण होत आहे. या पार्श्वभूमीवर कोविड उपचाराशी निगडित विलगीकरण कक्ष, ऑक्सिजन सेंटर, ऑक्सिजन सिलेंडर, ऑक्सिजन बेड, सॅच्युरेटेड, ऑक्सिजन मशीनचा पुरवठा अशा कोविड उपचाराशी निगडित सुविधा उपलब्ध होण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांना कोविड केअर सेंटर सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली.



**बाळासाहेब पाटील**
सहकार व पणन मंत्री

## 'स्मार्ट कार्ड' योजनेला मुदतवाढ

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाच्या 'स्मार्ट कार्ड' योजनेला ३१ मार्च २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सध्याची राज्यातील कोरोनाची परिस्थिती लक्षात घेऊन, या योजनेला ३० सप्टेंबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष ॲड. अनिल परब यांनी दिली.



**ॲड. अनिल परब**
परिवहन मंत्री

## सानुग्रह अनुदान

राज्यातील कोरोना संसर्गाची साखळी तोडण्यासाठी राज्य सरकारकडून घातलेले निर्बंध व त्यानुषंगाने राज्य शासनाने राज्यातील रिक्षा परवानाधारकांना जाहीर केलेल्या सानुग्रह अनुदानासंदर्भात आढावा घेण्यासाठी परिवहन मंत्री ॲड. अनिल परब यांचे अध्यक्षतेखाली मुंबईतील रिक्षा संघटनांचे प्रतिनिधी व परिवहन विभागातील अधिकारी यांचे समवेत मंत्रालयात बैठक झाली.

राज्यात सात लाख पंधरा हजार रिक्षा परवानाधारक असून त्यांना प्रत्येकी १५०० रुपये प्रमाणे एकूण १०७ कोटी रुपये सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे. ही रक्कम संबंधितांच्या बँक खात्यांवर थेट ऑनलाइन पद्धतीने जमा करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली.

## विशाखा समितीची अंमलबजावणी

राज्यातील सर्व नोंदणीकृत आस्थापना, कारखाने, कंपनी, संघटित, असंघटित क्षेत्रामध्ये कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळ केल्याच्या घटना घडतात. या छळापासून संरक्षण व्हावे, यासाठी आलेल्या तक्रारींची वेळीच दखल घेणे गरजेचे असून सर्व विभागांनी नियमानुसार उचित कार्यवाही करावी, असे निर्देश देऊन विशाखा समितीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी टास्क फोर्स नेमणार असल्याचे महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या आयोजित बैठकीत सांगितले.



**ॲड. यशोमती ठाकूर**
महिला व बालविकास मंत्री

कामाच्या ठिकाणी महिलांची छळवणूक, अत्याचार रोखण्यासाठी असलेल्या विशाखा समितीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बैठक झाली. या वेळी प्रधान सचिव आय ए कुंदन, कामगार विभागाच्या सचिव विनिता वेद तसेच सामान्य प्रशासन, उद्योग, ऊर्जा, सहकार विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### ई–संजीवनी ऑनलाईन ओपीडी

राज्यात गेल्या वर्षी लॉकडाऊन काळात सुरू केलेल्या ई-संजीवनी ऑनलाइन ओपीडी (बाह्यरुग्ण) सेवेला चांगला प्रतिसाद मिळत असून दररोज किमान ३०० रुग्ण त्याद्वारे वैद्यकीय उपचार आणि सल्ला घेत आहेत. राज्यात आतापर्यंत ३७ हजार ८९१ रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला आहे. विशेष म्हणजे कोरोना रुग्ण जे घरी उपचार घेत आहेत किंवा विलगीकरणात असलेले रुग्णदेखील या सेवेचा लाभ घेत आहेत, असे आरोग्य विभागामार्फत कळवण्यात आले आहे.

कोरोना संसर्ग रोखण्यासाठी राज्यात गेल्यावर्षी करण्यात आलेल्या लॉकडाऊन काळात रुग्णांना घरबसल्या वैद्यकीय उपचार आणि सल्ला मिळावा, यासाठी १३ एप्रिल २०२० रोजी ऑनलाइन ई-संजीवनी सेवा सुरू करण्यात आली. सुरूवातीला संकेतस्थळावरून ही सेवा घेण्याची सोय उपलब्ध होती त्यानंतर त्याचे मोबाईल ॲपही विकसित करण्यात आल्याने त्याच्या वापरात वाढ झाल्याचे दिसून येत आहे.



ई-संजीवनी ओपीडी सेवा मोफत आहे. या माध्यमातून सामान्य तसेच तज्ज्ञ ओपीडी सेवा सुरू करण्यात आली आहे. राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि ग्रामीण रुग्णालय येथील सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांची नोंदणी या ॲप्लिकेशनमध्ये करण्यात आली आहे. दिवस ठरवून दिल्याप्रमाणे सर्व वैद्यकीय अधिकारी या सेवेमार्फत रुग्णांना त्यांच्या आजारावर सल्लामसलत करतात. दररोज सकाळी ९ ते दुपारी १ आणि दुपारी १.४५ ते सायंकाळी ५ या वेळेत ही सेवा घेता येते. रुग्णांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग आणि चॅटचा वापर करून घरबसल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांशी आजाराबाबत सल्ला घेता येतो.

ई-संजीवनी ओपीडी सेवेमार्फत रुग्णांना सल्ला दिल्यानंतर एसएमएसद्वारे ई-प्रिस्क्रिप्शन रुग्णांना प्राप्त होते. त्याद्वारे रुग्ण जवळच्या सरकारी रुग्णालयात जाऊन औषधे घेऊ शकतात. ई-संजीवनी ओपीडी सेवेचा वापर घेणे करीता रुग्ण esanjeevaniopd.in या संकेत स्थळाला भेट देऊन डॉक्टरांशी सवांद साधू शकतात. तसेच ॲन्ड्रॉईड मोबाइलधारक गुगल प्ले स्टोअरमध्ये जाऊन esanjeevani OPD National Telconsultation Service या नावाने देण्यात आलेले ॲप्लिकेशन डाऊनलोड करून त्याचा लाभ घेऊ शकतात.

### अनाथ निराधार मुलांना दिलासा

बाल न्याय अधिनियमात ‘बालक’ या संज्ञेसाठी नमूद वयाची अट पूर्ण झाल्यामुळे बालकांच्या काळजीसाठी कार्यरत संस्थातून बाहेर पडावे लागू शकणाऱ्या बालकांना सध्याची कोरोना परिस्थिती पाहता मोठा दिलासा देण्याचा निर्णय महिला व बालविकास विभागाने घेतला आहे. महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्या निर्देशानुसार राज्यातील अनुरक्षण गृहांमध्ये पात्र मुलांना अनुरक्षण सेवा पुरवण्यासाठी वयाची अट दोन वर्षांनी शिथिल करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे या बालकांना अनुरक्षण गृहांमध्ये अधिकची दोन वर्षे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, प्रशिक्षण आदी सुविधा मिळणार आहेत.

### दोन महिन्यांसाठी अर्थसाहाय्य

कोरोनाच्या अनुषंगाने कडक निर्बंधांच्या काळात गरीब जनतेला दिलासा मिळावा, या हेतूने राज्य सरकारने यापूर्वीच विशेष पॅकेज घोषित केले आहे. यामधून सामाजिक न्याय विभागांतर्गत संजय गांधी निराधार, श्रावण बाळ, वृद्धापकाळ वेतन, विधवा निवृत्तिवेतन व दिव्यांग निवृत्तिवेतन या पाच योजनांतील ३५ लाख लाभार्थ्यांना एप्रिल व मे या दोन महिन्यांचे प्रतिमहिना एक हजार रुपये प्रमाणे दोन महिन्यांचे अर्थसाहाय्य देण्यासाठी १ हजार ४२८ कोटी ५० लाख रुपये निधी वितरित करण्यात आला आहे, अशी माहिती सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. ऑनलाइन प्रणालीद्वारे जिल्हास्तरावर योजनेच्या लाभार्थीच्या संलग्न बँक खात्यांवर ही रक्कम वितरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



**धनंजय मुंडे**
सामाजिक न्याय व
विशेष साहाय्य मंत्री

### विविध विकासकामांचा आढावा

पर्यटन मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे यांनी एमएमआरडीएचे महानगर आयुक्त आर. ए. राजीव आणि अतिरिक्त महानगर आयुक्त डॉ. के. एच. गोविंदराज यांच्यासोबत एमएमआरडीएच्या विविध कामांचा आढावा घेतला. मुंबईत, विशेषत: मुंबई उपनगरात एमएमआरडीएमार्फत विविध कामे सुरू आहेत. याबाबत कामाच्या प्रगतीची ऑनलाइन प्रणालीद्वारे चर्चा करण्यात आली.



**आदित्य ठाकरे**
पर्यटन, पर्यावरण व
वातावरणीय बदल मंत्री

**शासन हे विविध पातळ्यांवर काम करत असते. यामध्ये मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय महत्त्वपूर्ण असतात. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयांचा थोडक्यात आढावा.**

# मंत्रिमंडळात ठरले !

## मोफत लसीकरण



राज्यातील १८ ते ४४ या वयोगटातील सर्वांना कोविड प्रतिबंधात्मक लस मोफत देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीनंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी याची घोषणा केली. लसीकरण कार्यक्रमाबाबत आरोग्य विभाग नियोजन करत असून नागरिकांना याबाबत व्यवस्थित पूर्वसूचना देण्यात येईल, त्यामुळे लसीकरण केंद्रांवर अनावश्यक गर्दी करू नये, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले

या वेळी बोलताना मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले की, गेल्या वर्ष-सव्वा वर्षांपासून आपण कोविडची लढाई लढतो आहोत. जानेवारीपासून केंद्राच्या सहकार्याने राज्यात लसीकरण सुरू आहे. आजतागायत ४५ च्या पुढील वयोगटातील दीड कोटींपेक्षा जास्त जणांचे लसीकरण करण्यात आले आहे. हा देशात विक्रम आहे.

## लसीकरण कार्यक्रम

उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, आरोग्यमंत्री राजेश टोपे तसेच इतर सर्व प्रमुख सहकाऱ्यांशी या संदर्भात चर्चा झाली आहे. सध्या राज्यासमोर आर्थिक चणचण असूनही नागरिकांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य आहे. त्यामुळेच १८ ते ४४ च्या वयोगटातील सर्वांना मोफत लस देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला असून लसींचा पुरवठा कसा होतो, यानुसार लसीकरण नियोजन करून पुढील कार्यक्रम जाहीर करण्यात येईल.

## कोविन ॲपवर नोंदणी करा

१८ ते ४४ या वयोगटातील नागरिकांनी कोविन मोबाईल ॲपवर नोंदणी करावी, कुठेही लसीकरण केंद्रांवर गर्दी करू नये. लसीकरणाबाबत व्यवस्थित व सुस्पष्ट सूचना मिळतील.

## कोविड लस प्रकल्प सुरू करण्यास मान्यता

हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळास कोविड लस प्रकल्प सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. केंद्र शासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैव तंत्रज्ञान विभागाच्या साहाय्याने आणि मे.भारत बायोटेक इंटरनॅशनल लि., हैद्राबाद या कंपनीकडून कोविड-१९ या साथ रोगाच्या लसीचे उत्पादन तंत्रज्ञान घेऊन महामंडळाच्या परळ, मुंबई येथील जागेत १५४ कोटी रुपये भांडवली खर्चाच्या कोवॅक्सिन लस उत्पादनाचा हा प्रकल्प सुरू होईल.

प्रकल्पाच्या उभारणीसाठी रूपये ९४ कोटी इतके अर्थसाहाय्य राज्य शासनाच्या आकस्मिकता निधीतून खर्च करण्यात येईल. केंद्र शासनाने ६५ कोटी रुपये इतके अर्थसाहाय्य मंजूर केले आहे.

## माल वाहतुकीची परवानगी

विविध शासकीय विभागांच्यामार्फत खासगी माल वाहतूकदारांकडून जी वाहतूक करण्यात येते. त्यातील २५ टक्के माल वाहतुकीचे काम राज्य परिवहन महामंडळास देण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्य परिवहन महामंडळाकडे उपलब्ध मालवाहतुकीची वाहने विचारात घेता राज्य शासनाच्या विविध विभागामार्फत निविदा प्रक्रिया करून खासगी माल वाहतूकदार यांच्यामार्फत जी वाहतूक करण्यात येते. त्यामध्ये राज्य परिवहन महामंडळास २५ टक्क्यांपर्यंत माल वाहतुकीचे काम देण्याचा निर्णय घेण्यात आला.

या संदर्भात मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करून अंमलबजावणीबाबत तसेच राज्य परिवहन महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत सर्वंकष विचारविनिमय करून उपाययोजना सुचवेल, असा निर्णय घेण्यात आला.

याशिवाय महामंडळाच्या टायर्स पुन:स्तरण संयंत्रकडून शासकीय परिवहन उपक्रम, महानगरपालिका परिवहन सेवा व इतर शासकीय उपक्रमांच्या ५० टक्के अवजड व प्रवासी वाहनांचे टायर्स पुन:स्तरण करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महामंडळाच्या विभागीय कार्यशाळेत अवजड व प्रवासी शासकीय वाहनांची देखभाल व दुरुस्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## जलदगती न्यायालयांना मुदतवाढ

राज्यातील न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी १०० जलदगती न्यायालयांना १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ या १ वर्षाच्या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास, तसेच सदर न्यायालयांकरिता तदर्थ जिल्हा न्यायाधीश व कर्मचारी वर्गासह पुढीलप्रमाणे एकूण ५०० पदे पुढे सुरू ठेवण्यास मान्यता देण्यात आली

**टीम लोकराज्य**



**आज संपूर्ण जगात कोरोना विषाणूचे संक्रमण झाले आहे. आपला देश आणि राज्यही त्याला अपवाद नाही. देशात आणि त्यातही महाराष्ट्रात संसर्ग मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. अशा भयंकर संकटात शासकीय यंत्रणा तोकडी पडणे साहजिक आहे. परंतु योग्य आहार घेऊन काही पथ्ये पाळली तर कुठल्याही रोगांपासून शरीर निरोगी ठेवता येणे शक्य आहे.**

# उत्तम आहार, उत्तम आरोग्य

कोविड-१९ या आजारावर नेमके औषध आजघडीला बाजारात नसले तरी त्यावर प्रभावी ठरणारी काही औषधे आहेत ज्याच्या माध्यमातून उपचार केले जात आहेत. शिवाय सोशल मीडियावर हे करा, ते करा, हा काढा घ्या असे अनेक प्रयोगांचे व्हिडिओ व्हायरल होत आहेत. अशा परिस्थितीत एक प्रश्न बऱ्याच लोकांच्या मनात येतो की, आपले स्वतःचे भारताचे प्राचीन वैद्यकीय शास्त्र आयुर्वेद हे कोरोनामध्ये प्रभावी ठरू शकते का? याचे उत्तर होय असेच आहे. ते कसे हे आपण आज समजून घेऊ या..

## रोगाचे मूळ कारण

आपले शरीर हे तीन दोष (वात, पित्त आणि कफ), सात धातू (रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा, शुक्र) आणि तीन मल (मूत्र, स्वेद (घाम) आणि पुरीष) यांच्यापासून बनलेले आहे. जेव्हा या दोष, धातू आणि मल यामध्ये समतोल असतो तेव्हा ते आपल्याला आरोग्य प्रदान करते, परंतु जेव्हा समतोल ढासळतो तेव्हा ते आपल्याला रोग सोडून बाकी काही देत नाही.

## आरोग्याचे गमक

आहार काय घेतला पाहिजे या आधी आयुर्वेदाचे सिद्धान्त आपण समजून घेणे गरजेचे आहे. दोष, धातू आणि मल यामधील साम्य किंवा समतोल आपल्याला चिरकाल टिकवायचा असेल म्हणजेच आरोग्य किंवा रोगप्रतिकारक शक्ती चांगली पाहिजे असेल तर तीन घटकांकडे आपण लक्ष दिले पाहिजे. ते म्हणजे आपली दररोजची दिनचर्या (दररोज आपण आपले २४ तास कसे घालवतो), प्रत्येक २ महिन्यांनी ऋतू बदलतो, ऋतू बदलला की त्यानुसार आपला आहार बदलला गेला पाहिजे, म्हणजेच आयुर्वेदीय ऋतुचर्या पाळली गेली पाहिजे आणि तिसरा महत्त्वाचा घटक म्हणजे अग्नी. आपल्या शरीरात जठराग्नी असतो तो आपण जो काही आहार खातो किंवा पितो त्याचे परिणमन करून त्यापासून आहाररस तयार करून त्यापासून आपल्या सात धातूंचे पोषण करतो. त्याचबरोबर त्या सात धातूंचा सार भाग म्हणून ओज नावाचा घटक आपल्या शरीरात निर्माण होतो त्याच्यावर आपल्या सर्वांची रोगप्रतिकारक शक्ती अवलंबून असते. म्हणजे थोडक्यात फक्त आपल्या आहारावर नाही, तर आपल्या भुकेच्या अग्नीवर आपली रोगप्रतिकारक शक्ती अवलंबून असते. म्हणून आपण आपल्या अग्नीचे सदा रक्षण करावे तो मंद होऊ देऊ नये.

आयुर्वेद ग्रंथामध्ये जठराग्नीचे खालीलप्रकारे वर्णन केले आहे :

***आयुर्वर्णो बलं स्वास्थ्यमुत्साहोपचयौ प्रभा ।***
***ओजस्तेजोऽग्रयः प्राणाश्चोक्ता देहाग्निहेतुकाः ।।१।।***

***शान्तेऽग्नौ म्रियते, युक्ते चिरं जीवत्यनामयः।***
***रोगी स्याद्विकृते, मूलमग्निस्तस्मान्निरुच्यते ॥२॥***

(चरक संहिता)

अर्थात जठराग्नी जर चांगल्या स्थितीमध्ये म्हणजेच प्राकृत असेल तर तो आपल्याला आरोग्य, उत्तम वर्ण, शारीरिक बल, स्वास्थ्य, उत्साह देतो. आपल्या सात धातूचे पोषण, प्रभा, ओज (म्हणजेच आपली रोगप्रतिकारक शक्ती) हे सर्व घटक आपल्या जठराग्नीवर अवलंबून असते. जर जठराग्नी मंद झाला किंवा शांत झाला तर आजार किंवा मरण संभवते असे आयुर्वेद सांगतो. म्हणून जठराग्नी हा कोणताही आजार होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक भूमिका आपल्या शरीरात बजावत असतो. त्यामुळे आयुर्वेदीय आहाराबद्दल सांगायचे झाले तर आता सध्या ग्रीष्म ऋतूला सुरवात झाली आहे. जो २१ जून २०२१ पर्यंत असणार आहे. त्यामधे आपण कोणते पथ्य (पथ्य म्हणजे जे शरीरास हितकर किंवा आरोग्यदायी आहे ते) पाळलं पाहिजे ते पाहूया.

लेखामध्ये उल्लेख केलेला आहार जर योग्य मात्रेत सेवन केला, तर आरोग्य चांगले राहून कोरोनाविरुद्ध ते आपले रक्षण करते. त्यामुळे उपचारापेक्षा आपण आजारी पडणार नाही, याची काळजी घेतलेली कधीही चांगले. ज्याची दिनचर्या व आहार उत्तम त्याला कुठल्याही औषधाची गरज पडत नाही.

***पथ्ये सति गदार्तस्य किमौषधिनिषेवणैः।***
***पथ्येऽसति गदार्तस्य किमौषधिनिषेवणैः ॥१॥***

म्हणजे

जो पथ्य पाळतो त्याला औषधाची गरज काय?

जो पथ्य नाही पाळत त्याला औषध देऊन उपयोग काय?

आहाराचे आणि पथ्याचे महत्त्व सांगणारे वरील वचन आपण कायम लक्षात ठेवून चांगली दिनचर्या व योग्य आहार घेऊन आरोग्य कमवावे. आपल्या आरोग्याला जे हितकर आहे, त्याचेच सदा सेवन करावे म्हणजे आपण आजाराने ग्रस्त होणार नाही.

## हा आहार घेता येईल



- जे निरोगी आहेत त्यांनी पचनास हलका आहार घेतला पाहिजे.
- हिरवे (मोड न आलेले) मूग पचनास हलके आणि आरोग्यासाठी उत्तम आहे.
- तांदूळ (नेहमी कमीत कमी १ वर्ष जुना असावा कारण तो पचायला सोपा असतो आणि आरोग्य देतो, जर तांदूळ जुना आहे की नाही हे माहीत नसेल तर प्रथम तांदूळ तव्यावर भाजून मगच शिजवावा).
- पडवळ, दुधी, फरसबी, लाल भोपळा, रताळी, डाळिंब, काळे मनुके, सफरचंद, खजूर. (फळाचे सेवन करताना लक्षात ठेवा की, कधीही फळ आणि दूध एकत्र करून खाऊ नये. त्याचबरोबर जेवण झाल्यानंतर फळे खाऊ नये कारण ते रोगास कारणीभूत ठरतात).



- भोजन बनवताना सैंधव मिठाचा वापर करावा. कारण ते शीत असते आणि समुद्र मिठापेक्षा आरोग्यदायी असते.
- पाणी सेवन करताना धने आणि जिरे (दोन्ही मिळून १० ग्रॅम) ६४० मिली पाण्यात टाकून ते अर्धे होईपर्यंत उकळावे. हे अर्धे झालेले पाणी कोमट झाल्यावर प्यावे.
- पंचसारचे सेवन करावे (मध, खजूर, मनुके, बेरी, साखर आणि पाणी याच्यापासून जो सार बनतो त्याला पंचसार म्हणतात.)

## कोणते आहार टाळावे?

- खारट, आंबट, तिखट जेवढे कमी खाता येईल तेवढे कमी खावे. कारण मुळात बाहेर वातावरणात उष्णता असते, हे आपल्या शरीरात आणखी उष्णता वाढवतात.
- म्हशीचे दूध, दही, ताक, वांग, कारले, कुळीत, लोणचं, पापड, मासे, मांसाहार.
- पूर्वीचे अन्न पचल्यावरच पुढेच्या अन्नाचे सेवन करावे. भूक लागणे हे लक्षण म्हणजे पूर्वीचे अन्न पचले आहे असे समजावे. थोडक्यात भूक लागल्याशिवाय जेवू नये.
- मद्यपान, शारीरिक संबंध टाळावे.



## कोविडबाधित रुग्णांसाठी

कोरोना विषाणूबाधित रुग्णांमध्ये प्रामुख्याने फुफ्फुसात कफ घट्ट होऊन संचित होतो. त्यामुळे रुग्णाला ऑक्सिजन कमी पडतो. त्याचबरोबर रुग्णाचा भुकेचा अग्नी पण मंद होतो. अशा वेळी रुग्णाला हिरव्यामुगाचे कढण, मुगाची उसळ, फुलका हा आहार फायद्याचा ठरतो. कोरोना रुग्णामध्ये एक गोष्ट प्रामुख्याने आपण लक्षात ठेवली पाहिजे की, सातत्याने रुग्णाला फलाहार देऊ नये. जर फक्त फळ किंवा त्याचा ज्युस देत राहिले तर कफ संचिती फुफ्फुसात अजून वाढते. त्यामुळे रुग्णाचा त्रास अजून वाढू शकतो. पाणी हे खडंगओदक सेवन करावे. (खडंगओदक आयुर्वेदिक औषधालयात मिळते. ६४० मिली पाण्यात १० ग्रॅम पावडर टाकावी. पाणी अर्धे होईपर्यंत उकळावे व कोमट झाल्यावर प्यावे. शक्यतो याच पाण्याचे सेवन करावे.)

**वैद्य गौरव दवे,**
आयुर्वेदाचार्य, पनवेल.

प्रदीर्घ लढ्यानंतर अनेकांच्या हौतात्म्यानंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. गेल्या सहा दशकांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत सर्वच क्षेत्रात प्रगती करत राज्य आघाडीवर राहिले आहे. देशाच्या राजकारणाला, समाजकारणाला, विकासचक्राला गती देण्याचे काम महाराष्ट्राने केले. दिशा देण्याचे काम केले. राज्याने २०२०-२१ हे वर्ष हीरकमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले. 'लोकराज्य'चा हा 'हीरकमहोत्सवी सांगता वर्ष' विशेष विभाग..

६० चित्र आश्वासक विकासाचे, हीरकमहोत्सवी महाराष्ट्राचे

# महाराष्ट्र देशा




मध्यरात्रीच्या बरोबर बाराच्या ठोक्याला प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महाराष्ट्र राज्याच्या नकाशाचे उद्घाटन केले. त्या प्रकाशित नकाशाच्या दीप्तीने महाराष्ट्राला उज्ज्वल केले. या वेळी राज्यपाल श्रीप्रकाश, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण.

# पुन्हा घेऊ भरारी...




**उद्धव बाळासाहेब ठाकरे,** मुख्यमंत्री

**एखाद्या** विकसित राज्याची किंवा प्रांताची ओळख काय असते? तेथील उद्योग - व्यवसाय - शेतीमधील समृद्धी, पायाभूत सुविधांची भरभराट, गुंतवणूक आणि आर्थिक बाबतीत संपन्नता, असे निकष आपण सर्वसाधारणत: लावतो. हे तर आवश्यक आहेच पण तेवढंच पुरेसं नाही. आज राज्याच्या हीरकमहोत्सवी वर्षाची सांगता आणि एकसष्टी साजरी करताना देशाचे ग्रोथ इंजिन म्हणवणाऱ्या आणि छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा मिळालेल्या महाराष्ट्राची खरी संपत्ती आहे ती कष्टकरी, कामगार, श्रमिक, शेतकरी. मी नेहमी म्हणतो की, आदिवासी समाज जो वर्षानुवर्षे जंगलात आपलं जीवन जगतोय त्याचं जीवनमान बदलून त्याला खऱ्या अर्थानं महाराष्ट्राच्या प्रगतीचा वाटेकरी करणं हेच आपलं उद्दिष्ट असलं पाहिजे आणि या दृष्टीने आपलं नियोजन आखणे गरजेचे आहे.

आम्ही राज्याच्या सत्तेवर आलो आणि संत गाडगेबाबांनी साध्या भाषेत जीवनाचे जे सार सांगितले आहे त्या विचारांना डोळ्यासमोर ठेवून कामाला सुरुवात केली. आव्हाने खूप आली. नैसर्गिक संकटे कोसळली, आता गेल्या सव्वावर्षापासून कोविड-१९ च्या महामारीची आपत्ती आहे. पण महाराष्ट्राची जडणघडण इतकी मजबूत आहे की, यातील कोणतेही संकट राज्याची घडी मोडू शकले नाही.

राज्य मोठे आणि विकसित होत असताना आपल्या देशाला सक्षम, बळकट आणि विकसित झालेले पाहायला कुणाला आवडणार नाही! मी, तुम्ही आपण सारे या महाराष्ट्राच्या पवित्र मातीत जन्माला आलो, याचा आज मनापासून आनंदही आहे आणि अभिमानही. अनेक क्षेत्रात महाराष्ट्राने पथदर्शी काम करून दाखवलं जे पुढे राष्ट्रीय पातळीवर स्वीकारलं गेले. महाराष्ट्राचे अनेक दिशादर्शक कायदे देशभर राबवले गेले, असा हा तुमचा माझा महाराष्ट्र कोरोनाच्या संकटाशी धैर्याने लढत आहे. डॉक्टर, नर्सेस, आरोग्य कर्मचारी, पोलीस, सफाई कर्मचारी यांच्यासारखे सगळे कोविडयोद्धे, प्रशासकीय पातळीवर आणि सामाजिक पातळीवर मदतीचा हात देणारे असंख्य हात आणि सर्वसामान्य नागरिक या युद्धात सहभागी झाले आहेत.

कोविडचे संकट अजून संपलेले नाही, कधी संपणार ते ठाऊक नाही पण एक नवीन जीवनपद्धती आपल्यात रुजवणे हीच काळाची गरज ठरणार आहे, हे नक्की. अगदी तळागाळापर्यंत आपल्याला आरोग्य यंत्रणा अद्ययावत कराव्या लागणार आहेत, तंत्रज्ञानाची मदत घ्यावी लागणार आहे, अधिकचे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार ठेवावे लागणार आहे. या दृष्टीने काही ठोस पावले टाकायला आम्ही सुरुवात केली आहेच. पहिल्या लाटेचा आपण निर्धाराने आणि एकजुटीने मुकाबला केला आणि त्यात यशस्वी झालो. पण दुसऱ्या लाटेत रुग्णसंख्या प्रचंड वेगाने वाढली. दुर्दैवाने मृत्यूही झाले. काही ठिकाणी अपघात घडले, काही ठिकाणी अडचणी आल्या... पण हा महाराष्ट्र खचला नाही. एकमेकांना मदतीचा हात देत अतिशय संयमाने, धीरोदत्तपणे या संकटाला सामोरा गेला आणि जात आहे... हे आहे खऱ्या महाराष्ट्राचं लढवय्या रूप.

आपल्या महाराष्ट्र राज्याचा हीरकमहोत्सव आपल्याला खूप दिमाखदारपणे साजरा करायचा होता. परंतु कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे आजघडीला आपण मोठा कार्यक्रम करू शकलो नाही. म्हणून आपण भविष्यात तो करणार नाही असं अजिबात नाही. आज आपलं प्राधान्य आहे ते नागरिकांच्या आरोग्याला. आपण या संकटकाळातून लवकरात लवकर बाहेर पडू... फिनिक्स पक्षासारखी आकाशात पुन्हा एकदा भरारी घेऊ. तोपर्यंत आपल्याला तोच संयम, तीच जिद्द आणि तीच शिस्त दाखवायची आहे.

अवघा महाराष्ट्र माझे कुटुंब आहे... आणि मला विश्वास आहे, आपण सगळे कुटुंबातील सदस्य आपल्या या महाराष्ट्राला, आपल्या या घराला त्याच एकजुटीने आणि समर्पणाने अधिक बळकट करू... प्रगतीची नवनवीन शिखरे आपण सगळे मिळून पादाक्रांत करू..

आपल्या सर्वांना महाराष्ट्र राज्याच्या हीरकमहोत्सवी सांगता समारंभासाठी आणि भविष्यकालीन वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

# संकट, संघर्षातून नवनिर्मिती



**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

**महाराष्ट्राचा** इतिहास कायमच संघर्षाचा राहिला आहे. महाराष्ट्राची स्थापनाही संघर्षातून आणि १०६ हुतात्म्यांच्या बलिदानातून झाली आहे. महाराष्ट्राला सहजासहजी काहीही मिळाले नाही. महाराष्ट्राने जे मिळवले ते लढून, संघर्ष करून मिळवले. हीरकमहोत्सवी वर्षानंतरही महाराष्ट्राचा अनेक आघाड्यांवर संघर्ष सुरूच आहे.

बेळगाव, कारवार, बिदर, भालकी, निपाणीसह सीमाभागातील मराठी गावे महाराष्ट्रात येण्यासाठीचा संघर्ष कायम आहे. सीमाभागातील शेवटचे मराठी गाव महाराष्ट्रात येईपर्यंत हा संघर्ष थांबणार नाही, याची ग्वाही मी पुन्हा एकदा सीमाभागातील मराठी बांधवांना देतो.

राज्याच्या हीरकमहोत्सवी वर्षाची सांगता होत असताना, संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी लढलेल्या महाराष्ट्र सैनिकांच्या, त्यांच्या कुटुंबीयांच्या त्यागाचे मी कृतज्ञतापूर्वक स्मरण करतो. या लढ्यात हौतात्म्य पत्करलेल्या हुतात्म्यांना, महाराष्ट्राच्या सुपुत्रांना अभिवादन करतो. महाराष्ट्रातील नागरिक बंधुभगिनी, मातांना राज्याच्या हिरकमहोत्सवी वाटचालीबद्दल मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

महाराष्ट्राचा इतिहास धैर्याचा, शौर्याचा, पराक्रमाचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक आव्हानांवर मात करून महाराष्ट्रात रयतेचे राज्य, स्वराज्य निर्माण केले. राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी महाराष्ट्राच्या मातीतून एकता, समता, बंधुतेचा विचार जगाला दिला. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांनी अत्यंत दूरदृष्टीने आधुनिक महाराष्ट्राचा पाया रचला.

राज्य आज कोरोनाच्या संकटाशी सर्वशक्तिनिशी लढत आहे. ही लढाई सोपी नाही, परंतु महाराष्ट्रवासीयांची एकजूट आणि निर्धाराच्या बळावर ही लढाई आपण नक्की जिंकू, असा मला विश्वास आहे. महाराष्ट्र संकटासमोर कधी झुकला नाही आणि यापुढेही झुकणार नाही. शासकीय यंत्रणेतील सर्व घटक व स्वयंसेवक, लोकप्रतिनिधी यांच्यासह प्रत्येक जण जोखीम पत्करून कोरोनाविरुद्धच्या लढाईत आपलं योगदान देत आहे. या सर्व कोरोनायोद्ध्यांच्या त्यागाबद्दल, सेवेबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. कोरोना संकटकाळात आपण दाखवलेली कर्तव्यनिष्ठा महाराष्ट्र कायम स्मरणात ठेवील. सर्वांनी मिळून कोरोनाला हरवू या, महाराष्ट्राला कोरोनामुक्त करू या.

# विकासाची परंपरा कायम



**बाळासाहेब थोरात**
महसूल मंत्री

**महाराष्ट्र** राज्याच्या स्थापनेला यंदा १ मे २०२१ रोजी ६१ वर्षे होत आहेत. १ मे १९६० रोजी तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा मंगलकलश आणला होता. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा इतिहास संघर्षाचा असून, हुतात्म्यांच्या आहुतीने प्रेरणादायी झालेला आहे. हीरकमहोत्सवानिमित्त महाराष्ट्राचा जाज्वल्य इतिहास नव्या पिढीसमोर येईल, हा इतिहास नव्या पिढीला घडवण्यासाठी निश्चितच प्रेरणा देणारा आहे.

महाराष्ट्राच्या सहा दशकांच्या वाटचालीचे सिंहावलोकन केले, तर आपल्याला दिसेल की, सर्व समाजघटकांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत आपले योगदान दिले आहे. देशाच्या प्रगतीत महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा राहिला आहे. महाराष्ट्र हे देशाला सर्वाधिक महसूल मिळवून देणारे प्रगत राज्य आहे. महाराष्ट्रातील अनेक नावीन्यपूर्ण, पथदर्शक व लोकाभिमुख योजना अनेकदा देशपातळीवर स्वीकारल्या गेल्या आहेत. महाराष्ट्रात सुरू झालेली सहकारी चळवळ देशभरात वाढली.

ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करून ग्रामीण भागातील लोकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात सहकारी चळवळीचा सिंहाचा वाटा आहे. त्याचप्रमाणे शहरांचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी १९६६ मध्ये रिजनल टाऊन प्लॅनिंग कायदा करणारे महाराष्ट्र पहिले राज्य होते. आज औद्योगिकीकरण आणि रोजगार निर्मितीमध्येही महाराष्ट्र देशातील इतर राज्यांच्या तुलनेत अग्रस्थानी आहे.

आज राज्य कोरोना महामारीच्या संकटाचा सामना करत आहे. कोरोना रुग्णांवरील उपचार व आरोग्य यंत्रणा उभारणीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला जात आहे. या महाभयंकर संकटकाळात केंद्र सरकारच्या मदतीशिवाय महाराष्ट्र कोरोना विरोधातील लढाई पूर्ण ताकदीनिशी आणि सक्षमपणे लढत आहे. संकटातून संधी निर्माण करत महाराष्ट्र आपली विकासाची परंपरा कायम ठेवेल. आपल्या पूर्वजांनी दिलेल्या योगदानाची जाणीव ठेवत वैभवशाली इतिहास व परंपरा जपत प्रगतीची नवनवी शिखरे पादाक्रांत करण्याचा निर्धार आपण सर्वजण करू या. जय महाराष्ट्र!

**१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचे उद्घाटन तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते झाले. त्या दिवशी राजभवन येथे उद्घाटनप्रसंगी तसेच त्याच दिवशी महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या शपथविधीनंतर त्या वेळचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी केलेले भाषण आम्ही येथे देत आहोत. या भाषणातून यशवंतराव चव्हाण यांच्या स्वप्नातील महाराष्ट्राची कल्पना येईल.**




राज्यपाल श्रीप्रकाश यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेताना यशवंतराव चव्हाण.

# स्वप्नपूर्तीचा ऐतिहासिक क्षण

आजच्या या ऐतिहासिक क्षणी पंडित जवाहरलालजींचे आभार मानण्यासाठी मी उभा राहिलो आहे. अनंत काळापर्यंत चालणाऱ्या महाराष्ट्र राज्याला पहिला आशीर्वाद देण्याकरिता भारताचा आजचा युगपुरुष येथे आला आणि त्याने आम्हाला आशीर्वाद दिले. महाराष्ट्राच्या लाख लाख जनतेतर्फे मी जवाहरलालजींचे लाख लाख आभार मानतो.

महाराष्ट्रातील आम्हा माणसांचे त्यांच्यावर प्रेम आहे, त्यांच्यावर भक्ती आहे आणि आम्ही आज त्यांना परत आश्वासन देऊ इच्छितो की, महाराष्ट्राचे हे जे राज्य निर्माण झाले आहे ते मराठी जनतेच्या कल्याणाचे काम तर करीलच, परंतु मराठी भाषकांच्या जवळ जे देण्यासारखे आहे, त्यांच्या जीवनामध्ये जे चांगले आहे, जे उदात्त आहे, त्याचा त्याग जर करावयाचा असेल तर तो आम्ही भारतासाठी प्रथम करू, कारण आमचा हा पहिल्यापासून विश्वास आहे की, भारत राहिला तर महाराष्ट्र राहील, भारत मोठा झाला तर महाराष्ट्र

मोठा होईल. भारताचे आणि महाराष्ट्राचे हित जेव्हा एकरूप होते तेव्हा भारतही मोठा होतो आणि महाराष्ट्रही मोठा होतो, हा इतिहास महाराष्ट्राच्या रक्तारक्तातून भिनलेला आहे आणि म्हणूनच मी गेल्या चार-आठ दिवसांमध्ये प्रतीकाच्या रूपाने सांगत आलो आहे की, भारताचे प्रतीक हिमालय आहेत तर महाराष्ट्राचे प्रतीक सह्याद्री आहे. ऊंचऊंच शिखरे असलेला बर्फाच्छादित हिमालय हे भारताचे प्रतीक आहे, तर दोनशे-दोनशे, तीनशे-तीनशे इंच पावसाचा मारा आपल्या डोक्यावर घेणारा काळ्या पाषाणाचा सह्याद्री आमचे प्रतिक आहे आणि जर कधी भारताच्या हिमालयावर संकट आलेच तर आपल्या काळ्या पाषाणाची छाती हिमालयाच्या रक्षणाकरता महाराष्ट्राचा सह्याद्री उभी करील, असे मी आपणाला आश्वासन देऊ इच्छितो.

परिश्रम हा आजच्या काळाचा गुणधर्म आहे आणि पंडितजी, आपण आग्रहपूर्वक आम्हाला परिश्रमाने, परिश्रमाच्या घामाने महाराष्ट्र आणि राष्ट्र रचण्याचा आज संदेश दिला आहे. हा मोलाचा संदेश आम्ही आमच्या अंतःकरणावर कोरून ठेवू आणि यापुढे प्रत्येक क्षणी तुम्ही दिलेले आशीर्वाद आणि तुम्ही केलेले मार्गदर्शन हे युगपुरुषाचे आशीर्वाद आणि युगपुरुषाचे मार्गदर्शन आहे ह्या दृष्टीने त्यांच्याकडे पाहण्याचा आम्ही प्रयत्न करू. आता आमच्या जुन्या परंपरांना अनुलक्षून दुरितांचे तिमिर जावो हे वरदान मी मागत आहे. ही आमची प्रार्थना ज्ञानेश्वरांनी आम्हाला शिकवलेली आहे. जे अमंगल असे त्याचा अंधकार दुनियेवरून नाहीसा होवो व सत्याचा विजय होवो, हे तत्त्वज्ञान आणि हे आशीर्वाद आम्हाला आमच्या संताकडून मिळाले आहेत. समानतेचे तत्त्व त्यांनी आम्हाला शिकवले आहे आणि अन्यायाचा प्रतिकार करावयालाही त्यांनीच आम्हाला शिकवले आहे. देशावर प्रेम करावे आणि स्वराज्य आम्ही मंत्र मानावा, हा संदेश आम्हाला आमच्या नेत्यांनी दिलेला आहे आणि या संदेशाच्या पार्श्वभूमीवर, महात्मा गांधी यांचे कर्तृत्व आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व यातून आपणा सर्वांना मिळालेला दिव्य संदेश महाराष्ट्र कधीही विसरणार नाही, याची ग्वाही या परममंगल प्रसंगी मी आपणास देऊ इच्छितो.

महाराष्ट्र राज्यातर्फे मराठी, जनतेतर्फे आणि व्यक्तिशः माझ्यातर्फे मी राज्यपालजींचे आणि पंडिताजींचे आभार मानतो आणि हा नवोदित महाराष्ट्र असाच वाढत राहो, त्याचे तेज सतत वाढते राहो आणि हे तेज भारताच्या आणि मानवाच्या कल्याणसाठी खर्ची पडो अशी मी परमेश्वराकडे प्रार्थना करतो.

## सोनियाचा दिवस

आपल्या प्रधानमंत्र्यांच्या शुभहस्ते आज पहाटे नवराज्याचे उद्घाटन झाले व त्यानंतर आता हा समारंभ नुकताच पार पडला, अशा रीतीने एकभाषी महाराष्ट्र राज्य व त्याचे पहिले सरकार अस्तित्वात आले.

सर्व मराठी बांधव एका राज्यात यावेत अशी मराठी जनतेची फार दिवसांपासूनची इच्छा होती. काही ऐतिहासिक घटनांमुळे मराठी लोक कित्येक शतके निरनिराळ्या राज्यात विभागले गेले होते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीने मराठी लोकांचे एकभाषी राज्याचे स्वप्न आज साकार होत आहे. ज्ञानेश्वरांनी एका वेगळ्या संदर्भात म्हटल्याप्रमाणे हा खरोखरच सोनियाचा दिवस होय. अशा वेळी मराठी लोकांच्या आनंदाला पारावार उरला नाही, यात काहीच आश्चर्य नाही. गेल्या काही वर्षात महाराष्ट्रातील जनतेची जी विचलित अशी अवस्था झाली होती ती आता संपून महाराष्ट्राला यापुढे स्थैर्याचे दिवस येतील, अशी अशा करण्यास मुळीच हरकत नाही.

नव्या महाराष्ट्र राज्याच्या जन्माने आपल्याला भरभराटीचे व सुखाचे दिवस येतील ही सामान्य जनतेची अपेक्षा योग्य अशीची आहे. हा जनतेच्या अपेक्षापूर्तीचा क्षण जवळ आणणे हा महाराष्ट्र राज्याचा मी मानबिंदू मानतो. त्याचबरोबर नव्या राज्यात शासनाच्या द्वारे लोकांची अधिक कार्यक्षम रीतीने सेवा घडेल अशा प्रकारे शासन यंत्रणेची पुनर्घटना व सुधारणा करण्यासही आताच चालना मिळाली पाहिजे.

आपल्यापुढे जे मूलभूत आर्थिक व सामाजिक प्रश्न आहेत त्यांची योग्य ती उकल करावयाची असेल तर त्या प्रश्नांचा अखिल भारतीय संदर्भ आम्हास विसरता येणार नाही आणि म्हणून महाराष्ट्राचे नागरिक हे प्रथम भारताचे नागरिक आहेत व नंतर ते महाराष्ट्रीय आहेत याची जाणीव आम्ही सतत ठेवू.

आता महाराष्ट्र राज्यापुरते बोलावयाचे म्हणजे महाराष्ट्रातील लोकांनी त्यांचा धर्म, जात अगर पक्ष कोणता का असेना, आपण सर्व एकच बांधव आहोत असे मानले पाहिजे. नवा महाराष्ट्रीय हा केवळ मराठी भाषा बोलणारा नव्हे, तर जो महाराष्ट्रात राहतो व आपल्या शक्तीनुसार त्याचे जीवन समृद्ध करतो असा प्रत्येक माणूस हा महाराष्ट्रीय होय.

आपली शासन यंत्रणा ही बदलत्या कालमानास सुसंवादी अशी असली पाहिजे. समाजवादी पद्धतीचे नियोजन करण्यास आज आपण बद्धपरिकर आहोत. आपली शासनयंत्रणा ही अशा प्रकारच्या नियोजनास पूर्णपणे मिळतीजुळती अशीच असली पाहिजे, हे लक्षात घेऊन सचिवालय संघटनेची सुसंबद्ध अशा प्रकारे पुनर्रचना करण्यात आली आहे.

विदर्भ, मराठवाडा, कोकण व दुष्काळी भाग यांच्या विकासाकडे विशेष लक्ष पुरवण्यात येईल व महाराष्ट्र राज्याचे सरकार त्यांचे हितसंबंध डोळ्यात तेल घालून जपेल असे जे आश्वासन मी दिले होते त्याचा मी या ऐतिहासिक प्रसंगी पुनरुच्चार करतो. त्याचप्रमाणे केवळ मुंबईच्या नागरिकांनाच नव्हे तर इतर सर्व संबंधिताना मी असे पुन्हा आश्वासन देतो की, या शहराचे बहुरंगी स्वरूप कायम ठेवण्याचा व त्याच्या विकासाकडे बारकाईने लक्ष पुरवण्याचा नव्या राज्याचे सरकार सतत प्रयत्न करील. तसेच, नागपूर शहराचे महत्त्व टिकवण्याचाच नव्हे, तर ते वाढवण्याचा सरकारचा कटाक्ष राहील.

आपल्या पंचवार्षिक योजनेचा सर्व भर ग्रामीण भागाची सुधारणा करण्यावर देण्यात आलेला आहे. ग्रामीण भागात पुन्हा नवचैतन्य निर्माण करण्याच्या ध्येयास सरकार बांधलेले आहे. या दृष्टीने शेतीच्या उत्पादन पद्धतीचे आधुनिकीकरण करणे, ग्रामीण विभागामध्ये विजेचा प्रसार करणे, छोट्या उद्योगधंद्याच्या वाढीस जोराची चालना देणे या कार्यक्रमांना अग्रहक्क देण्यात येईल. शेतीसंबंधित उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात सहकारी पद्धतीस प्राधान्य देण्याबाबत या




**राज्य स्थापनेनंतर महाराष्ट्रीय जनतेकडून अभिवादन स्वीकारताना तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू व मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण.**

शासनाचा आग्रह राहील.

लोक कोणत्या भागात राहत आहेत, त्यांची भाषा कोणती आहे किंवा त्यांचा धर्म कोणता आहे अशा विचारास यत्किंचितही थारा न देता सर्व वर्गाच्या, सर्व जातीच्या लोकांना समान न्याय व समान संधी प्राप्त करून देणे असेच सरकारचे नेहमी धोरण राहील. केवळ ऐतिहासिक परंपरेमुळे म्हणा, अगर परिस्थितीमुळे म्हणा, सुसंस्कृत जीवन जगणे ज्यांना अशक्य झालेले आहे अशा दलित वर्गाची स्थिती सुधारण्याचा सरकार सातत्याने प्रयत्न करील. नवबौद्धांच्या सवलतींच्या प्रश्नाचा मी येथे खास उल्लेख करू इच्छितो. धर्मांतरामुळे त्यांच्या काही अडचणी वाढलेल्या आहेत, याची मला जाणीव आहे. सामाजिक वा आर्थिकदृष्ट्या जे दुर्बल आहेत त्यांना साहाय्य करण्याच्या आपल्या धोरणानुसार सरकार नवबौद्धांना सर्व बाबतीत हरिजनांच्या बरोबरीचे समजेल. अर्थात येथे असे करणे राज्यघटनेशी विसंगत हाईल, त्या बाबी याला अपवाद असतील.

आपले राज्य हे उद्योगधंद्यांच्या बाबतीत भारतात सर्वांच्या आघाडीवर आहे. यामुळे राज्यातील उद्योगधंद्यांचा केवळ राज्याच्याच नव्हे तर सर्व देशाच्या अर्थव्यवस्थेवर भलाबुरा परिणाम होतो. उद्योगधंद्यांचा पाया बळकट असल्याखेरीज आपल्या पंचवार्षिक योजना पूर्णपणे यशस्वी होऊ शकणार नाहीत. तेव्हा अशा परिस्थतीत औद्योगिकीकरणाची गती ज्यामुळे रोखली जाईल व राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होईल असे काहीही न करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य ठरते. उत्पादन सारखे होत राहण्यासाठी व त्यात वाढ होण्यासाठी उद्योगधंद्यांचा कारभार सुरळीत चालला पाहिजे. मालक व कामगार यांचे संबंध सलोख्याचे राहिले पाहिजेत. थोडक्यात म्हणजे औद्योगिक आघाडीवर शांतता नांदली पाहिजे. उद्योगधंद्यांत जर सतत कलहाचे वातावरण राहिले तर उत्पादन चालू ठेवणेच कठीण होईल, मग वाढवण्याची गोष्ट तर सोडाच. तेव्हा मालक व कामगार या दोघांसही न्याय्य होईल व संबंध समाजाचेही ज्याने हित होईल अशा औद्योगिक संधी निदान पाच ते दहा वर्षे राहणे आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. कारण अशा परिस्थितीतच उत्पादनाची वाढ निर्विघ्नपणे होत राहील. मालक व कामगार हे दोघेही जेव्हा समाजाच्या बाबतीतील आपली जबाबदारी ओळखतील तेव्हाच हे साध्य करता येईल. अशा प्रकारच्या औद्योगिक संधी घडवून आणण्यासाठी मालक व कामगार यांच्या प्रतिनिधींची एक परिषद भरवण्याचा सरकारचा मानस आहे.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्या थोर नेत्यांनी अखंड सायास केले व आपले प्राण खर्ची घातले आणि अशा रीतीने ज्या स्वराज्याची फळे आपण आज मनसोक्तपणे चाखत आहोत त्याचा ज्यांनी पाया घातला, त्यांची स्मृती आज या महान प्रसंगी करून या नेत्यांना व विशेषतः राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आपण श्रद्धांजली वाहू या. कार्यनिष्ठा व जनतेची सेवा ही जी उदात्त ध्येये त्यांनी आपल्यापुढे ठेवली ती गाठण्याचा सतत प्रयत्न करूनच आपण त्यांच्या स्मृतीचा खरा आदर करू.

महाराष्ट्राची ही भूमी अनेक संत, पराक्रमी वीर, त्यागी समाजसुधारक व विद्वान देशभक्त यांच्या वास्तव्याने पुनीत झालेली आहे. संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले व लोकमान्य टिळक ही आमची प्रतिनिधिक प्रतीके आहेत. त्यांनीच महाराष्ट्राच्या संस्कृतीची जोपासना केली व तिचा वारसा आपल्या हाती दिला. हा अमोल ठेवा आपल्या हृदयात जपून ठेवणे व त्याचा विकास करणे हे प्रत्येक मराठी माणसाचे आद्य कर्तव्य ठरते. आज आपले मराठी भाषी राज्य स्थापन होत असताना, आपल्या देशाची भरभराट करण्यास व त्याची कीर्ती दिगंत पसरवण्यास आपली शक्ती सर्वस्व देऊ, अशी आपल्यापैकी प्रत्येकाने प्रतिज्ञा केली पाहिजे. महाराष्ट्राची व भारताची सेवा करण्याचे व्रत आज आपण घेऊया व आपले ध्येय गाठण्याकरिता शक्ती व बुद्धी दे अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करू या.

**(मे १९८५च्या 'लोकराज्य'मधून पुनर्मुद्रित)**

**एकसष्ठी साजरी करणारा महाराष्ट्र आजही अनेक क्षेत्रांमध्ये आपले अग्रस्थान टिकवून आहे. भारतातील एक पुढारलेले राज्य म्हणून महाराष्ट्राने नेहमीच देशाला अभिमानास्पद वाटेल अशी कामगिरी केली आहे. कोणत्याही क्षेत्रामध्ये देशाला जगाच्या पातळीवर कर्तृत्व गाजवायचे असते तेव्हा त्यासाठी महाराष्ट्रच सर्वात पुढे असतो. अशा या महाराष्ट्राची सहा दशकांची वाटचाल नजरेत भरणारी आहे.**

# देश महाराष्ट्र पुण्यशील भारता...

**विजय चोरमारे**

महाराष्ट्राच्या विकास वाटचालीचे मूल्यमापन करताना केवळ सहा दशकांचा कालखंड विचारात घेऊन चालत नाही. आधुनिक काळाच्या पार्श्वभूमीवर विचार करायचा तर पावणेदोनशे वर्षे म्हणजे महात्मा जोतिबा फुले यांच्यापर्यंत मागे जावे लागते. ऐतिहासिक पातळीवर विचार करायचा तर पावणे चारशे वर्षे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्यापर्यंत मागे जावे लागते. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा म्हणजेच शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांचा महाराष्ट्र म्हणूनच महाराष्ट्राचे मूल्यमापन करावे लागते. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्य कसे करायचे याचा वस्तुपाठ घालून दिला. महात्मा फुले यांनी रुढि-परंपरांची जळमटे फेकून देण्याची प्रेरणा दिली आणि शिक्षणाशिवाय तरणोपाय नसल्याचा मंत्र दिला. राज्य कुणासाठी करायचे, हे शाहू महाराजांनी दाखवून दिले आणि या सगळ्यांनी जे सांगितले ते भारतीय राज्यघटनेत आणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सगळ्या माणसांना एका पातळीवर आणले.



१ मे १९६० रोजी स्वतंत्र मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याची स्थापना भारताचे तेव्हाचे प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते झाले. त्याचे प्रतीक म्हणून पंडित नेहरू यांनी मुंबईतील राजभवनाच्या प्रांगणात एक रोपटे लावले. त्या क्षणापासून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे पर्व सुरू झाले. पंडितजींच्या शेजारी उभे आहेत महाराष्ट्राचे शिल्पकार व पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण.

ही वैचारिक परंपरा तेवढ्याच समर्थपणे पुढे नेण्याची कामगिरी महाराष्ट्रातील अनेक नेत्यांनी केली, त्यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो यशवंतराव चव्हाण आणि शरद पवार यांचा. राज्यकर्त्यांकडे समाजाच्या विविध क्षेत्रांबाबतची आस्था आणि त्या संदर्भातील नीट आकलन असावे लागते, ते या दोन नेत्यांकडे तुलनेने अधिक होते. महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेचे डोळस भान आणि ती पुढे नेण्यासाठीची राजकीय इच्छाशक्ती या दोन नेत्यांनी वेळोवेळी दाखवली. यातून आजचा महाराष्ट्र उभा राहिला आहे. या महाराष्ट्राचा गौरव करताना कवी, गीतकार, शाहिरांच्या शब्दांमधून जे चैतन्य झरते त्याने मराठी माणसांच्या अंगावर रोमांच उभे राहतात.

***काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी***
***पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी***
***दारिद्र्याच्या उन्हात शिजला***
***निढळाच्या घामाने भिजला***
***देशगौरवासाठी झिजला***
***दिल्लीचेही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा ।।***

राजा बढे यांचे हे महाराष्ट्र गौरवगीत जेव्हा शाहीर साबळे यांच्या आवाजात कानावर पडते, तेव्हा कुणाही मराठी माणसाचा ऊर भरून आल्याशिवाय राहात नाही. कवी गोविंदाग्रज यांनीही-

***राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा***
***नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा***
***अंजन कांचन करवंदीच्या काटेरी देशा***
***बकुळफुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा***

अशा शब्दांत महाराष्ट्राचे वर्णन केले आहे. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने किंवा महाराष्ट्राच्या एकसष्ठीच्या निमित्ताने महाराष्ट्राकडे बघताना काय वाटते? या प्रवासाकडे बघताना केवळ आकडेमोड करून भागणार नाही. त्याहीपलीकडे जाऊन आशयदृष्ट्या मूल्यमापन करावे लागेल. महाराष्ट्राचे वेगळेपण सांगताना इथल्या समाजसुधारकांचा आणि सामाजिक सुधारणा चळवळीचा आवर्जून उल्लेख केला जातो. सुधारकांचा महाराष्ट्र आज २१व्या शतकातल्या तिसऱ्या दशकात कोणत्या टप्प्यावर आहे, हे पाहणे महत्त्वाचे ठरू शकेल. सामाजिक

### औद्योगिक विकास

महाराष्ट्रामध्ये उद्योगांची गतीने आणि नियोजनबद्ध रितीने वाढ व्हावी, या हेतूंनी महाराष्ट्र सरकारने १९६२मध्ये महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाची (एमआयडीसी) स्थापना केली. राज्याच्या सर्व भागांचे सारख्या प्रमाणात औद्योगिकीकरण व्हावे आणि मुंबई-पुणे या औद्योगिक पट्ट्याच्या पलीकडे उद्योगांचा विस्तार व्हावा असा या महामंडळाच्या स्थापनेमागील हेतू होता. ही कल्पना भाऊसाहेब नेवाळकर यांनी यशवंतरावांना सुचवली आणि यशवंतरावांनी त्यांच्यामार्फतच तिची अंमलबजावणी करून घेतली. एमआयडीसीच्या याच मॉडेलच्या आधारे पुढे केंद्रीय नियोजन आयोगाच्या माध्यमातून औद्योगिक विकेंद्रीकरणासंदर्भात समित्या नेमल्या होत्या.

नंतरच्या काळात एमआयडीसीने औद्योगिक क्षेत्रे, विशेष आर्थिक क्षेत्रे, सिल्व्हर झोन आणि माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, वाईन (द्राक्ष प्रक्रिया व रत्ने अशी विशेष संकुले विकसित केली आहेत. २०२० अखेरपर्यंत २८९ औद्योगिक क्षेत्रे निर्माण केली आहेत. त्यामध्ये २५३ मोठी औद्योगिक क्षेत्रे, २५ लघु औद्योगिक क्षेत्रे आणि ११ विकास केंद्रे आहेत. एमआयडीसीच्या अंतर्गत ५१ हजार ६१३ कारखाने असून त्या ठिकाणी १५.४३ लाख रोजगार उपलब्ध आहेत.

औद्योगिकीकरण झालेल्या राज्यांपैकी महाराष्ट्र हे आजघडीला अग्रगण्य राज्य असून उद्योगाच्या सर्व क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राचे प्राबल्य आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीत महाराष्ट्राचे मोठे योगदान आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेला प्रामख्याने वस्तुनिर्माण, वित्तीय सेवा, आंतरराष्ट्रीय व्यापार, जनसंपर्क माध्यमे, तंत्रज्ञान, पेट्रोलियम, फॅशन, प्रावणे, रत्ने व आभूषणे, माहिती तंत्रज्ञान सेवा आणि पर्यटन या क्षेत्रांद्वारे चालना मिळते. देशातील मोठ्या व विशाल प्रकल्पांपैकी सर्वाधिक प्रकल्प राज्यात आहेत. आर्थिक उदारीकरणाच्या धोरणापासून म्हणजे ऑगस्ट १९९१ पासून ऑक्टोबर २०२० पर्यंतच्या कालावधीत १४,२९,१४२ कोटी गुंतवणूकीसह २० हजार ९०९ प्रकल्प मंजूर करण्यात आले. ऑक्टोबर २०२० पर्यंत ३७,८८७ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीच्या २४७ प्रकल्पांची नोंदणी झाली आहे. मंजूर झालेल्या एकूण औद्योगिक प्रकल्प आणि त्यातील गुंतवणुकीमध्ये राज्याचा हिस्सा अनुक्रमे १८ टक्के आणि १०.७ टक्के आहे.



**कोराडी येथे १९६८ मध्ये तत्कालीन पाटबंधारे व वीज मंत्री शंकरराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली कोराडी औष्णिक वीज केंद्राच्या कोनशिलेचे अनावरण करताना तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक.**

सुधारणांच्या चळवळींनी घडवलेली स्थित्यंतरे आणि आजच्या काळातला त्यांचा रिलेव्हन्सही तपासावा लागेल. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी केलेल्या भाषणात यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या 'भंगलेल्या मनाचा' उल्लेख केला होता. ते म्हणाले होते, 'महाराष्ट्राच्या जीवनातील जे सामाजिक प्रश्न आहेत. त्यात सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे महाराष्ट्राचे भंगलेले मन सांधायचे आहे. ब्राह्मण ब्राह्मणांकरिता विचार करतो. मराठा मराठ्यांपुरता विचार करतो. माळी माळ्यांकरिता विचार करतो. हे मासले मी केवळ नमुन्यादाखल सांगितले. जातीयवादाच्या या विषारी विचारापासून आपण महाराष्ट्राला मुक्त केले पाहिजे. जातीयवादाचा हा विचारच समूळ नष्ट केला पाहिजे. तेव्हाच महाराष्ट्राचे सामाजिक मन एकजिनसी होईल. परंतु हे कार्य आपण एका दिवसात, एका रात्रीत करू शकणार नाही. त्यासाठी विचारी माणसांनी विचारपूर्वक प्रयत्न केल्याशिवाय हे घडून येणार नाही.'

यशवंतरावांनी जो विचार मांडला होता. त्यानंतर ६० वर्षांनी काय परिस्थिती आहे, याचा विचार करतो तेव्हा महाराष्ट्रासारखे पुरोगामी राज्य जातीयवादाच्या चिखलात अधिकाधिक रुतत चाललेले दिसते. हे चित्र बदलण्यासाठी बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली 'एक गाव एक पाणवठा' चळवळीने विशेष प्रयत्न केले. जुन्या रूढींना मूठमाती देण्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या नेतृत्वाखालील अंधश्रद्धा निर्मूलन समितीने महत्त्वाचे कार्य केले, ते आजही सुरू आहे. मेधा पाटकर, प्रतिभा शिंदे, पारोमिता गोस्वामी यांच्यासारख्या महिला विविध सामाजिक चळवळींमध्ये अग्रेसर दिसतात. महाराष्ट्राचे सामाजिक चित्र बदलेल तेव्हा खऱ्या अर्थाने 'महा-राष्ट्र' हे नाव अधिक सार्थ ठरेल, याची जाणीव मराठी माणसाने ठेवली पाहिजे.

बाकी विकासाचा लेखाजोखा मांडताना महाराष्ट्राच्या खात्यावर अनेक अभिमानास्पद बाबींची नोंद आहे. संख्यात्मक विस्ताराबरोबरच गुणात्मक विकासाचा आलेखही चढता आहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, तेव्हा राज्याची लोकसंख्या चार कोटींच्या आसपास होती. २००७ मध्ये ती साडेदहा कोटींपर्यंत होती आणि आज ती १२ कोटींच्या जवळपास आहे. केवळ मुंबईच नव्हे, तर महाराष्ट्राच्या विविध भागांत उद्योगविस्तार होतोय. स्थानिकांबरोबरच स्थलांतरित मजुरांनाही मोठ्या संख्येने रोजगार उपलब्ध होतोय. देशाच्या कानाकोपऱ्यांतून रोजगारासाठी येणाऱ्या लोकांना सामावून घेणारे विशाल हृदय महाराष्ट्रापाशी आहे.

## शैक्षणिक प्रगती

शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्राने साधलेली प्रगती विशेष उल्लेखनीय आहे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी जो शिक्षणप्रवाह सुरू केला त्याचाच विस्तार पुढे कर्मवीर भाऊराव पाटील, बापूजी साळुंखे, पंजाबराव देशमुख आदींनी केला. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर शिक्षणाच्या क्षेत्रात सरकारने दिलेले योगदान विशेष उल्लेखनीय आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण यांच्या सरकारने घेतलेला सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे आर्थिकदृष्ट्या मागास पालकांच्या मुलांना (ई.बी.सी.) मोफत शिक्षण देण्याचा निर्णय. शिक्षण घेताना गरिबी आड येऊ नये, हा या योजनेचा हेतू होता. महाराष्ट्राची आजची शिक्षणक्षेत्रातील प्रगती दिसते, ती राज्याचे पहिले शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई यांनी घेतलेल्या या ईबीसीच्या निर्णयामुळे. ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १२०० रुपयांच्या आत आहे, अशा पालकांच्या मुलांना सर्व शिक्षण मोफत देण्याची योजना (ई.बी.सी.) त्यांनी १३ जून १९६० रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडली. या निर्णयामुळे सरकारचा शिक्षणावरचा खर्च एकदम ७० टक्क्यांनी वाढला. या निर्णयावर तेव्हा काही विद्वानांनी टीका केली. परंतु आजच्या काळात तसा छोटा वाटणाऱ्या या निर्णयाने महाराष्ट्राचे भवितव्यच बदलून टाकले. खेड्यापाड्यांतील शेतकरी, शेतमजूर, कष्टकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाची वाट सोपी केली. या क्रांतिकारक निर्णयाची मुळेही शेवटी शाहू महाराजांपर्यंत जातात. तळागाळातल्या घटकांप्रति शाहू महाराजांना जी आत्मीयता आणि जिव्हाळा होता, तेवढीच आत्मीयता यशवंतरावांकडे आणि बाळासाहेब देसाई यांच्याकडेही होती.

नंतरच्या काळात प्राथमिक शाळांचा संख्यात्मक विस्तार झाला, पटनोंदणी वाढली. मुलींच्या शिक्षणाची स्थितीही सुधारली. १ मे १९६२ पासून प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित झाले. त्याशिवाय ज्या नगरपरिषदा आपल्या हद्दीतील प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी घेऊ इच्छित होत्या, त्यांच्याकडे ती देण्यात आली. राजाराम बापू पाटील सांगली लोकल बोर्डाचे अध्यक्ष असताना १९५२ ते १९६२ या काळात त्यांनी सांगली जिल्ह्यात गाव तिथे शाळा आणि शाळेची इमारत ही मोहीम राबवून ५०० शाळांचे बांधकाम केले.

१९६०-६१ मध्ये राज्यात ३४ हजार ५९४ प्राथमिक शाळा होत्या आणि ४१.७८ लाख विद्यार्थी होते. त्यानंतर २५ वर्षांनी म्हणजे १९८५-८६ सालच्या उपलब्ध आकडेवारीनुसार ५४ हजार १७१ शाळा आणि ९३.३२ लाख विद्यार्थी होते. २०१९-२० च्या आकडेवारीनुसार राज्यात एक लाख सहा हजार ४९१ प्राथमिक शाळा आहेत. पटसंख्या १५६.९ लाख असून मुलींची टक्केवारी ४७ टक्के आहे. २८ हजार ९३ माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शाळा आहेत. त्यांची पटसंख्या ६४.०८ लाख असून मुलींची टक्केवारी ४६.५ टक्के आहे. राज्यात विद्यापीठे ६२, महाविद्यालये ४३४०, स्वायत्त संस्था २२६० आहेत. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची पटसंख्या ४२.३० लाख असून पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची पटसंख्या ९.४३ लाख आहे.

## आर्थिक आणि सांस्कृतिक राजधानी

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि अनेक कारणांनी आंतरराष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचे शहर आहे. भारतीय चित्रपटनिर्मितीचे प्रमुख केंद्र म्हणून आजही मुंबईचे अग्रस्थान टिकून राहिले आहे. केवळ निर्मिती केंद्र म्हणूनच नव्हे, तर भारतीय चित्रपटसृष्टीच्या आशयात्मक विकासातही महाराष्ट्राचे मोठे योगदान आहे. भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया घालणारे दादासाहेब फाळके असोत किंवा भारतीय चित्रपटसृष्टीच्या विकासात योगदान देणारे कलामहर्षी बाबूराव पेंटर असोत, ही परंपरा महाराष्ट्राने आजही टिकवली आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ आदी संतांनी आपल्या साहित्यातून समतेचा विचार दिला. संतांच्या संस्कारातून मराठीतली काव्य परंपरा विकसित झाली. साहित्याच्या क्षेत्रात वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर आणि भालचंद्र नेमाडे या चार मराठी लेखकांनी ज्ञानपीठसारख्या सर्वोच्च पुरस्कारावर आपली मोहोर उमटवली आहे. विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार यांच्यासारख्या नाटककारांनी देशपातळीवर नाट्यक्षेत्रात नावलौकिक मिळवला आहे.

सहकार क्षेत्र हे महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाचा कणा म्हणून ओळखले जाते. त्यातही साखर कारखाने महत्त्वाचे. धनंजयराव गाडगीळ यांनी तयार केलेल्या मॉडेलच्या आधारे विठ्ठलराव विखे-पाटील यांनी १९४९ मध्ये लोणी-प्रवरानगर येथे पहिला सहकारी साखर कारखाना सुरू केला. देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील हा पहिला सहकारी सहकारी साखर कारखाना होय. सहकारी चळवळीने ग्रामीण भागाच्या आर्थिक सामाजिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. महाराष्ट्राचे सहकारी साखर कारखानदारीचे मॉडेलही देशपाळीवर स्वीकारले गेले. सहकार चळवळीतील दोषांची चर्चा मोठ्या प्रमाणावर केली जाते, हे खरे असले तरीसुद्धा सहकार क्षेत्र हे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणारे क्षेत्र तर आहेच. परंतु महाराष्ट्रातील सर्वाधिक रोजगार देणारे क्षेत्र आहे, हेही लक्षात घ्यावे लागते.

## 'महाराष्ट्र' आधार हा भारताचा

हिमालयाला नेहमीच सह्याद्रीचा आधार राहिला आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्राने अनेक आघाड्यांवर देशाला दिशादर्शन केल्याचे गेल्या अनेक दशकांतील उदाहरणांवरून दिसून येईल. अनेक बाबींमध्ये महाराष्ट्र पुढे आणि देश मागे असे चित्र पाहायला मिळते. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळातही महाराष्ट्राने आपले पुढारपण टिकवून ठेवले. त्यामुळेच सेनापती बापट यांच्या '**महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले । महाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चाले । खरा वीर वैरी पराधीनतेचा । महाराष्ट्र आधार हा भारताचा ।**' या ओळी आत्मगौरवपर न वाटता वस्तुस्थिती निदर्शक वाटतात.

सामाजिकदृष्ट्या मागास घटकांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेमध्ये आरक्षणाची तरतूद केली. परंतु अशी तरतूद त्याच्याही चार तपे आधी राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये केली होती. मागास घटकांसाठी नोकऱ्यांमधील ५० टक्के जागा आरक्षित ठेवण्याचा निर्णय शाहू महाराजांनी १९०२मध्ये घेतला होता, यावरून शाहू महाराजांची दूरदृष्टी दिसून येते. शाहूराजांच्या या निर्णयाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनात्मक आधार दिला आणि स्वतंत्र भारतात आरक्षणाचे धोरण लागू झाले.

देशपातळीवर स्वीकारलेली महाराष्ट्राची महत्त्वाची योजना म्हणजे रोजगार हमी योजना. १९७२च्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखालील वि. स. पागे यांच्या पुढाकारातून महाराष्ट्र

सरकारने आणलेल्या रोजगार हमी योजनेचा स्वीकार डॉ. मनमोहन सिंग यांच्या प्रधानमंत्रीपदाच्या काळात देशपातळीवर केला गेला. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) म्हणून ती राबवण्यात येऊ लागली. ही योजना आजही देशभरातील लाखो लोकांना रोजगार उपलब्ध करून देत आहे. महाराष्ट्र सरकारची मूळची रोजगार हमी योजनासुद्धा राजर्षी शाहू महाराजांनी १८९६-९७ आणि १८९९-१९०० मधील दुष्काळात आपल्या संस्थानामध्ये राबवलेल्या उपाययोजनांवर आधारलेली आहे. रोजगार हमी योजनेचे किंवा मनरेगाचे गुणगान गाताना तिचे श्रेय शाहूराजांना द्यायला हवे.

महाराष्ट्राच्या ईबीसीसंदर्भातील या निर्णयाच्या संदर्भाने नंतर केंद्र सरकारने सर्व राज्यसरकारना एक मार्गदर्शक सूचना पाठवली. त्यानुसार अनेक राज्यांनी ई.बी.सी. सवलत योजनेचे अनुकरण केले.

कापूस एकाधिकार योजनेसंदर्भातही असेच सांगता येऊ शकते. १९६८च्या सुमारास जागतिक कापूस बाजारात मंदीची लाट आली. त्याचा परिणाम भारतातील कापूस भावावर झाला. मंदीमुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढला. त्यामुळे महाराष्ट्र सरकारला १९७२मध्ये कापूस एकाधिकार खरेदी' योजनेचा प्रारंभ करावा लागला. कापूस ते कापड' असा विचार कापूस एकाधिकार योजना प्रारंभ करताना मांडण्यात आला होता. तो प्रत्यक्षात आला नाही आणि कापूस



**शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवण्यासाठी राज्य शासनाने कापूस एकाधिकार योजनेचे क्रांतिकारी पाऊल उचलले व त्याला शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.**

बाजारातील अनिश्चिततेवरही नियंत्रण ठेवण्यात अपयश आले. राज्याबाहेर कापसाला जास्त भाव आणि महाराष्ट्रात कमी, असाही पेच उभा झाला. यातून बाहेर निघण्यासाठी १९७८ मध्ये पुलोदचे सरकार सत्तेवर असताना त्या वेळचे सहकारमंत्री प्रा. एन. डी. पाटील यांनी कापूस एकाधिकार खरेदी योजनेत क्रांतिकारक बदल घडवून आणले. या योजनेचेही काही राज्यांनी अनुकरण केले.

७३व्या आणि ७४व्या घटना दुरुस्तीने महिलांना स्थानिक सत्तेमध्ये ३३ टक्के आरक्षण दिले. परंतु घटना दुरुस्तीचा चेंडू अनेक वर्षे संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये टोलवला जात होता. त्या वेळी महाराष्ट्रात मुख्यमंत्री असलेल्या शरद पवार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३० टक्के आरक्षण लागू केले आणि त्यानुसार महाराष्ट्रात निवडणुकाही पार पडल्या. त्यानंतर दोन वर्षांनी घटनादुरुस्ती होऊन ३३ टक्के आरक्षण धोरण देशपातळीवर लागू झाले. नंतर स्थानिक सत्तेमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्यामध्येही महाराष्ट्र आघाडीवर राहिला. देशातील पहिले महिला धोरण महाराष्ट्रानेच शरद पवार यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात आणले.

स्वच्छता अभियानाचा देशपातळीवर खूप गाजावाजा केला जातो. परंतु महाराष्ट्र सरकारने संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि संत तुकडोजी महाराज स्वच्छग्राम स्पर्धेच्या माध्यमातून महाराष्ट्रात लोकसहभागातून स्वच्छता अभियान राबवले. विलासराव देशमुख यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात ग्रामविकास मंत्री आर. आर. पाटील यांच्या पुढाकाराने ही मोहीम राबवण्यात आली. त्यांनी ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलून टाकला. जयंत पाटील यांच्या ग्रामविकास मंत्रिपदाच्या कारकिर्दीत एकूण ग्रामविकास मोहिमेबरोबरच शौचालय बांधणीची मोहीमही गतिमान बनली. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस सरकारच्या नंतरच्या कारकिर्दीत तंटामुक्त गाव अभियान राबवण्यात आले. त्यासाठीही तत्कालीन गृहमंत्री असलेल्या आर. आर. पाटील यांचा पुढाकार होता. महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद भूषवलेले विलासराव देशमुख केंद्रात मंत्री म्हणून गेले. ग्रामीण विकास मंत्रालयाची जबाबदारी त्यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी ग्रामस्वच्छता अभियान आणि तंटामुक्ती अभियान या महाराष्ट्राच्या दोन्ही मोहिमा देशपातळीवर राबवण्यासंदर्भात घोषणा केली होती. त्यासाठी पुढाकारही घेतला होता.

बहुजन समाजातील मुलामुलींना उच्च-तांत्रिक-वैद्यकीय शिक्षण घेणे सुलभ व्हावे म्हणून विनाअनुदानित शिक्षणाचे धोरण महाराष्ट्रात ८०च्या दशकात सुरू झाले. महाराष्ट्रात या धोरणाची सुरुवात केली ती सातवी उत्तीर्ण असलेल्या वसंतदादा पाटील यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात. शिक्षणाच्या खासगीकरणाबद्दल त्या वेळी खूप ओरड झाली, आजही होत आहे. परंतु खासगीकरणातूनच आज राज्यात अनेक उत्तम दर्जाच्या संस्था उभ्या राहिल्या आहेत. डॉ. डी. वाय. पाटील, पतंगराव कदम, कमलकिशोर कदम यांच्यासह वारणा नगर, प्रवरा नगर, साखराळे, अकलूज आदी ठिकाणी सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमांतून वैद्यकीय, अभियांत्रिकीचे दर्जेदार शिक्षण देणाऱ्या संस्था उभ्या केल्या आहेत. महाराष्ट्रासह देशभर अशा संस्थांचे जाळे विस्तारले आहे.

देशाच्या विकासामध्ये महाराष्ट्राने दिलेले हे योगदान कुणालाही नाकारता येणार नाही किंवा त्यांचा ठसा पुसताही येणार नाही. अशा वेळी शाहीर कुंतीनाथ करके यांच्या ओळी समोर येतात :-

***या भारतात भाग्यवंत देश कोणता***
***देश महाराष्ट्र पुण्यशील भारता***

महाराष्ट्राची ही विकासपथावरील वाटचाल दमदारपणे सुरू असली तरी एक सल मराठी माणसाच्या मनात कायम आहे, तो म्हणजे सीमाभागातील मराठी भाषकांना अजून महाराष्ट्रात सामावून घेता आलेले नाही. सीमाभागातील मराठी बांधव महाराष्ट्रात येण्यासाठी सहा दशकांहून अधिक काळ संघर्ष करत आहेत. ते महाराष्ट्रात येत नाहीत, तोपर्यंत महाराष्ट्राला परिपूर्णता येणार नाही. सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात आहे, आणि तिथे महाराष्ट्राच्या बाजूने निकाल लागून सीमावासीयांचा महाराष्ट्रात समावेश होईल, असा आशावाद व्यक्त करून लेख थांबवतो!

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

संयुक्त महाराष्ट्राचा लढा हे मराठी समाजाच्या आठवणीतील एक महत्त्वाचे पान आहे. प्रत्यक्षात संयुक्त महाराष्ट्राचा लढा १९५५ ते १९६० याकाळात लढला गेला असला तरी या लढ्याचा इतिहास त्यापेक्षा खूप मोठा आहे. गेली जवळपास ६५ वर्षे बेळगावपासून कारवारपर्यंतचा सीमाप्रदेश महाराष्ट्रात यावा म्हणून तिथल्या मराठी जनतेचा अविरत संघर्ष चालू आहे. एका अर्थाने संयुक्त महाराष्ट्राचा लढा अद्याप संपलेला नाही. जोवर सीमाभाग महाराष्ट्रात येत नाही, तोवर या लढ्याला पूर्णत्व येणार नाही.

# संयुक्त महाराष्ट्र लढा : एकजुटीचा सुवर्णअध्याय



संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील हुतात्म्यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेले हुतात्मा स्मारक.

**डॉ. दीपक पवार**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्यापासून ते पेशवाईतल्या मराठी साम्राज्यापर्यंत मराठी समाजाच्या अस्मितेचा मोठा इतिहास आहे. प्रत्येक समाजाच्या इतिहासात खाचखळगे येतातच. तसे ते मराठी समाजातही आलेले आहेत. टिळकांच्या निधनानंतर देशाचे नेतृत्व करणारी व्यक्ती म्हणून गांधींचा उदय झाला. एका अर्थाने तोपर्यंत महाराष्ट्राकडे असलेले देशाचे नेतृत्व महाराष्ट्राबाहेर गेले. सदानंद मोरे यांच्यासारख्या अभ्यासकांनी या सर्व बदलाचा आणि त्याचा महाराष्ट्राच्या मानसिकतेवर झालेल्या परिणामांचा सखोल मागोवा घेतला आहे.

मोठेपणा या प्रदेशाशी अभिन्नपणाने जोडलेला आहे. त्यामुळेच सेनापती बापट यांनी महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले, मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले अशा प्रकारचे मतप्रदर्शन केलेले आहे. आपली अस्मिता अतिशय टोकदार आहे, आपले इतिहासाचे भान किंबहुना इतिहासात गुंतून राहण्याची आपली वृत्ती कधी अनुकरणीय तर कधी चिंताजनक वाटावी अशी आहे. अशा या समाजाला स्वत:चा भाषिक प्रदेश हवा होता आणि त्यासाठी सभोवतीची भांडवलशाही आणि दिल्लीतली राजकीय ताकद यांचा सामना करण्याची धमक महाराष्ट्राने दाखवली. ही धमक हाच महाराष्ट्राचा सगळ्यात मोठा गुणविशेष आहे. आजच्या घडीला या गुणविशेष अशी आपण किती प्रामाणिक राहतो, यावर महाराष्ट्राचा उद्या अवलंबून आहे.

## लढा अद्याप संपलेला नाही

लालजी पेंडसे यांनी महाराष्ट्राचे महामंथन या नावाचा बृहत्ग्रंथ



एस. एम. जोशी



आचार्य अत्रे



प्रबोधनकार ठाकरे



महर्षी धोंडो केशव कर्वे

लिहिला आहे. त्यात त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा इतिहास सविस्तरपणे मांडला आहे. महाराष्ट्राची सर्वप्रथम मागणी कधी झाली, देशपातळीवर या मागणीला काय प्रतिसाद मिळाला, स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्र प्रथम असा विचार करणाऱ्या मराठी लोकांनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या भाषेत प्रदेशासाठी संघर्ष आणि संघटन कसे करायचे ठरवले, अगदी महर्षी धोंडो केशव कर्वे यांसारख्या शंभरी उलटलेल्या मान्यवरांनी प्रधानमंत्री नेहरुंना महाराष्ट्राची मागणी का मान्य होत नाही असा रोखठोक प्रश्न विचारला. हा सर्व इतिहास पेंडसे यांनी अतिशय सविस्तर मांडला आहे. या पुस्तकाच्या २०१० साली प्रसिद्ध झालेल्या आवृत्तीला एन. डी. पाटील यांची प्रस्तावना आहे. म्हणजे संयुक्त महाराष्ट्राचा लढा लढणारे लालजी पेंडसे आणि या लढ्याच्या एका अपुऱ्या संघर्षाचे प्रतिनिधी असलेले एन. डी. पाटील यांचे लेखन एकत्र पाहायला मिळते.

एन. डी. पाटील हे सीमा लढ्याचे नेते. गेली जवळपास ६५ वर्षे बेळगावपासून कारवारपर्यंतचा सीमा प्रदेश महाराष्ट्रात यावा म्हणून तिथल्या मराठी जनतेचा अविरत संघर्ष चालू आहे. एका अर्थाने संयुक्त महाराष्ट्राचा लढा अद्याप संपलेला नाही. जोवर सीमाभाग महाराष्ट्रात येत नाही तोवर या लढ्याला पूर्णत्व येणार नाही. हाती आलेला महाराष्ट्र आणि हाती न आलेला महाराष्ट्र याच्या सांध्यावर उभे राहून आपण विचार करत आहोत.

## लढ्याची पार्श्वभूमी

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याबद्दल डॉक्टर य. दि. फडके यांनी २०व्या शतकातील महाराष्ट्राचे ६,७ आणि ८ हे तीन खंड लिहिले आहेत. तत्कालीन काँग्रेस श्रेष्ठींची मुंबईसह महाराष्ट्राबद्दलची भावना, नेहरूंचा एकूणच भाषावार प्रांतरचनेबद्दलचा दृष्टिकोन, राज्य पुनर्रचना आयोगाच्या अहवालातील विसंगती आणि त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला दिल्लीश्वरांच्या मनात आपल्याबद्दल विद्वेष आहे, अशी निर्माण झालेली भावना याचा सखोल मागोवा घेतला आहे. संयुक्त महाराष्ट्राचा लढा एस. एम. जोशी, श्रीपाद अमृत डांगे, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, वा. रा. कोठारी, माधवराव बागल, सेनापती बापट अशा अनेकांच्या मेहनतीवर उभा राहिलेला लढा आहे. शंकरराव देवांच्या नेतृत्वाखाली संयुक्त महाराष्ट्र परिषद कुचकामी ठरल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली आणि शनिवारवाड्यासमोर झालेल्या सभेनंतर ऐतिहासिक लढ्याचे रणशिंग फुंकले गेले. राज्यशास्त्राचे बरेचसे अभ्यासक महाराष्ट्राबद्दल एकूण व्यापक अज्ञानामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीचा राजकीय पक्ष किंवा आघाडी म्हणून फार खोलात जाऊन विचार करताना दिसत नाहीत. पण उत्तरेतल्या राज्यांमध्ये १९६७ च्या निवडणुकांनंतर संयुक्त आघाड्यांची सरकारं आली, त्या प्रकारच्या संयुक्त आघाडीची सुरुवात महाराष्ट्रात पन्नासच्या दशकात झालेली होती. महाराष्ट्राच्या राजकीय अवकाशातल्या अनेकांना संयुक्त महाराष्ट्र समिती ही दीर्घकालीन समविचारी पक्षांची आघाडी होईल, अशी आशा होती.



माधवराव बागल



वा. रा. कोठारी



श्रीपाद अमृत डांगे



सेनापती बापट

## चिंतन करण्याची गरज

महाराष्ट्राच्या आणि मराठी समाजाच्या दुर्दैवाने आपण संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि त्याचा उपघटक असलेला महाराष्ट्र कर्नाटक सीमा वादाचा लढा देशाच्या सर्व भागात, सर्व भाषांमध्ये पोहोचवू शकलो नाही. त्यामुळे मराठी माणसांबद्दल आधीच देशात जे गैरसमज असतात त्याला खतपाणी मिळाले. दार कमिशनने मराठी माणसांच्या राष्ट्रीयत्वाच्या जाणिवेवर शंका घेतली होती. आजही संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा दाखला देऊन मराठी माणूस स्वतःची भाषा आणि संस्कृतीबद्दल आग्रहाने बोलायला लागला की, अनेकांना ते खटकते. हे संकुचित आहे, प्रतिगामी आहे, राष्ट्रविरोधी आहे अशा प्रकारचे शिक्के मारायला लोक लगेच तयार होतात. जागतिकीकरणाने सांस्कृतिक जागतिकीकरणाच्या गर्तेत आपल्याला ढकलून दिले आहे. संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा मराठी भाषेच्या जतन संवर्धनाचा लढाही होता. त्यामुळे आज सगळे जग एकभाषिक झाले आहे अशा समजात गुरफटलेल्या भारतीय समाजाला जागे करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या स्मरणाचा उतारा देण्याची गरज आहे. श्रमिकांची भाषा भांडवलाच्या भाषेपेक्षा प्रभावी ठरू शकते हा संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा धडा होता. मुंबईतल्या अत्र्यांपासून नागपूरच्या माडखोलकरांपर्यंत सगळ्यांना या एकाच ध्येयाने बांधून ठेवले होते. आज या राज्याला ६० वर्षे पूर्ण झाली. आपल्याला सगळ्यांना बांधून ठेवणारा समान विषय काय आहे यावर चिंतन करण्याची गरज आहे.

परंतु तसे होऊ शकले नाही. अशा प्रकारची घटना घडण्यासाठी जी राजकीय जागृती आवश्यक असते ती कदाचित महाराष्ट्रात पुरेशी झालेली नसेल किंवा राज्य निर्माण करण्यापुरतंच एकत्र यायचे आणि मग वेगळे व्हायचे असा तात्कालिक विचारही केला गेला असेल.

एस. एम. जोशी आणि आचार्य अत्रे यांच्या प्रसिद्ध वादाचे मूळ या द्वैतामध्ये आहे. मुंबई मिळाल्यानंतर लढा चालू ठेवायचा की नाही यावरून समितीमध्ये मतभेद झाले. त्यानंतर दाजीबा देसाईंनी संपूर्ण महाराष्ट्र समितीचे नेतृत्व केले आणि सीमाभाग महाराष्ट्रात येण्यासाठी आंदोलन चालू ठेवले. यशवंतराव चव्हाणांच्या बेरजेच्या राजकारणामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीत फटी पाडणे तत्कालीन काँग्रेसला फारसे कठीण गेले नाही. समाजवादी, डावे, काँग्रेसमधला एक गट, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन आणि काही काळापुरता असलेला भारतीय जनसंघ अशा विविध राजकीय पक्षांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात भाग घेतला. अत्र्यांनी त्यांच्या शैलीत नेहरू आणि यशवंतराव चव्हाण यांच्यावर खरपूस टीका केली असली तरी इंदिरा गांधी आणि काँग्रेस पक्षश्रेष्ठींचे मन वळवण्याच्या प्रक्रियेत यशवंतराव चव्हाणांनी भूमिका बजावली. समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र या भूमिकेतून सर्वांसाठीचा महाराष्ट्र असा विचार करणार चळवळीचे नेतृत्व होते. भाषावार प्रांतरचनेनंतर बलिष्ठ जातींचे त्या त्या प्रदेशांवर वर्चस्व निर्माण होईल आणि त्याचा दलितांवर प्रतिकूल परिणाम होईल म्हणून भाषावार प्रांतरचनेबद्दल साशंक असलेले बाबासाहेब मुंबईचा समावेश महाराष्ट्रामध्ये करण्याबद्दल मात्र अत्यंत आग्रही होते.

## लढ्याचा अन्वयार्थ

या राज्याला ५० वर्षे झाली तेव्हा शासनाच्या मराठी भाषा विभागाची स्थापना झाली. महत्त्वाचे पाऊल पडले. एका अर्थाने संयुक्त महाराष्ट्राचा लढा जे लढले आणि मराठीला गौरवाचे स्थान देण्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले त्या सर्वांच्या श्रमाची पूर्तता होण्याचा तो प्रसंग होता. आता राज्याला ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर आपण संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या देदीप्यमान वारशाशी जोडून घेण्यासाठी एक छोटी गोष्ट करू शकतो - ती म्हणजे महाराष्ट्राचा सांगोपांग अभ्यास करणाऱ्या महाराष्ट्र अध्ययन केंद्राच्या स्थापनेची.

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याने आपल्याला काय शिकवले? तर संघटन ही मोलाची गोष्ट आहे, लोकांचा उत्स्फूर्त राग आणि एखाद्या ध्येयाबद्दलची आच यांना रचनात्मक रूप देता येणे शक्य आहे. त्यातून सामूहिक लढा उभारता येणे शक्य आहे. जवळपास पाच वर्षे व्यवस्थेला धारेवर धरू शकेल आणि सर्वच राजकीय सत्तेचे मन बदलू शकेल अशा पद्धतीचा लोकलढा उभारला जाऊ शकतो. अशा लढ्यामध्ये भाषण करणाऱ्या माणसांच्या बरोबरीने अण्णा भाऊ साठे, अमर शेख यांचेही मोल असते हा महत्त्वाचा धडा संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याने दिला. 'मराठा'सारखे वर्तमानपत्र केवळ या लढ्याच्या ताकदीवर जिवंत राहिले आणि प्रस्थापित राजकारण्यांवर प्रखर टीका होऊनही टीका करणाऱ्या अत्र्यांना कोणी देशद्रोही म्हणून तुरुंगात टाकले नाही, हा धडा लक्षात घेण्याची गरज आहे.

आज हुतात्मा चौकात जे शेतकरी आणि कामगारांचे स्मारक दिसते ते अनेकांच्या नजरेतून येताजाताना सुटत असेल. महाराष्ट्रातला सगळा राजकीय वर्ग एकत्र येऊन हे स्मारक उभे राहिले आहे हे लक्षात घेतले पाहिजे. या स्मारकातला शेतकरी आणि कामगार आजच्या मराठी समाजजीवनाच्या केंद्रस्थानी आहे की परिघावर, की परिघाबाहेर याचा नितांत प्रामाणिकपणे विचार करण्याची गरज आहे. तो विचार आपण जितक्या लवकर करू इतक्या लवकर नव्या मराठीकारणाची-मराठीकरणाची नव्हे,- म्हणजे मराठी भाषा समाज आणि संस्कृतीच्या नव्या अर्थकारणाची, राजकारणाची आणि संस्कृतीकारणाची दिशा सापडू शकेल. ती दिशा सापडण्यासाठी आपण सगळेजण एकमेकांना शुभेच्छा देऊ या.

***जय मराठी! जय महाराष्ट्र!***

लेखक : विशेष कार्य अधिकारी,
महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न, महाराष्ट्र राज्य

**महाराष्ट्र राज्य आपल्या स्थापनेचा हीरकमहोत्सव साजरा करत असताना माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राच्यावतीने राज्यातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या तज्ज्ञांच्या व्याख्यानांचे आयोजन केले. या व्याख्यानमालेत महाराष्ट्रातील दिग्गज संपादकांनी राज्याच्या एकूण प्रगती आणि भविष्यातील वाटचालीबाबत आपली मते मांडली. दैनिक सामनाचे कार्यकारी संपादक व राज्यसभा सदस्य संजय राऊत, सकाळ माध्यम समूहाचे संचालक संपादक श्रीराम पवार आणि लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांनी दिलेल्या व्याख्यानाचा संपादित अंश....**

# महाराष्ट्र धर्म

## प्रगतीत सहप्रवासी व्हावे - संजय राऊत

महाराष्ट्र आपल्या स्थापनेचे ६०वे वर्ष साजरे करत आहे. या काळात महाराष्ट्राने अनेक क्षेत्रात यश मिळवले आहे. महाराष्ट्राला केवळ भूगोल नाही तर इतिहास आहे. महाराष्ट्राच्या मातीतून निर्माण झालेल्या अनेकांनी जागतिक परिप्रेक्ष्यात आपला प्रभाव पाडला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्ध कौशल्याला जागतिक इतिहासात फार मानाचे स्थान मिळाले आहे. जगभरात पसरलेला मराठी माणूस मराठी भाषेपासून थोडा लांब जाईल, पण तो महाराजांचा वंशज असल्याचे अभिमानाने सांगेल. जगभरातील मराठी माणसांकडे महाराष्ट्र अभिमानाने आणि अपेक्षेने बघतो आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीत त्याने सहप्रवासी व्हायला हवे. आज महाराष्ट्र अनेक आघाड्यांवर पुढे आहे. मराठी माणूस केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशातील इतर राज्यातही राजकीयदृष्ट्या अधिक प्रभावशाली आहे. विशेषतः गुजरात आणि मध्य प्रदेशमध्ये अनेक जिल्ह्यांचे राजकारकण मराठी माणसे चालवत आहेत, ही अभिमानाची बाब आहे. मॉरिशिससारख्या देशात अनेक मराठी राजकारणी आहेत. आयर्लंडच्या प्रधानमंत्रीपदावर वराडकर नावाचा मराठी माणूस विराजमान झाल्याचे बघून छाती फुलून येते. रामदास स्वामींनी दिलेला महाराष्ट्र धर्म वाढवावा या मंत्राचा आजच्या काळातील अर्थ वेगळा घेतला पाहिजे. कमरेला तलवार बांधून आज लढाया करण्याची गरज नाही, तर जगभरातील राजकारण, समाजकारण आणि अर्थकारणावर मराठी माणसाचा प्रभाव दिसला पाहिजे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे नेहमी म्हणायचे मराठी माणसाने केवळ कारकुनी करू नये, तर या देशाच्या आणि जगाच्या राजकारणावर प्रभाव टाकणारे कर्तृत्व करावे, मग ते प्रशासन सेवेतील असो, उद्योगनिर्मिती करून असो वा सामाजिक राजकीय क्षेत्रात असो. मराठी माणसांना जागतिक परिप्रेक्ष्य माहीत नाही, असे नाही, स्वातंत्र्यपूर्व काळापासून मराठी माणसांना लंडन हे जागतिक राजकीय घडामोडींचे केंद्र आहे हे माहीत होते. लंडनला जाऊन रंगोजी बापू, लोकमान्य टिळक, भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर, वीर सावरकर, साहित्यसम्राट न. चिं. केळकर आदींनी आपल्या राजकीय भूमिका जगाच्या व्यासपीठावर अगदी ठामपणे मांडल्या. मराठी माणूस जगभरत पसरला असला तरी तो प्रामुख्याने नोकरदारवर्ग म्हणूनच आहे. जीवनाच्या इतर क्षेत्रात तो नाही असे नाही पण ते प्रमाण खूपच कमी आहे. महाराष्ट्राला जगाच्या परिप्रेक्ष्यात मोठे व्हायचे असेल, महाराष्ट्राची प्रगती अधिक वेगात व्हायची असेल तर या मराठी लोकांनी महाराष्ट्राच्या विकासात सहप्रवासी व्हायला हवे. उद्योगधद्यांतून अर्थनाड्या आपल्या हातात घेतल्या पाहिजे. महाराष्ट्र धर्म वाढवला पाहिजे.



## प्रगल्भ राजकारण - श्रीराम पवार

महाराष्ट्राला समृद्ध अशी राजकीय, सांस्कृतिक परंपरा आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्राची स्थापना झाली आणि त्या वेळीही महाराष्ट्र

## संयुक्त महाराष्ट्र

स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचनेची मांडणी स्वीकारली परंतु ती मांडणी महाराष्ट्राच्या वाट्याला आली नाही आणि मग संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभी राहिली. परंतु या आंदोलनातून राष्ट्रीय पक्षाचे महत्त्व कमी होऊ नये याची काळजी यशवंतराव चव्हाण यांनी घेतली आणि त्यातूनच आजचा महाराष्ट्र घडताना दिसत आहे. महाराष्ट्र कोणाचा तर तो मराठी बोलणाऱ्यांचा हे यशवंतरावांनी दृढ केले. 'जो मराठी बोलतो तो महाराष्ट्र धर्माचा पाईक' ही रचना त्यांनी अधिक ठळक केली. त्यामुळे प्रादेशिक अस्मिता टोकाला जाण्याचा धोका संपला. त्यामुळे महाराष्ट्र राष्ट्रीय धोरणांशी जोडला गेला. हे करत असताना महाराष्ट्र आर्थिक आघाडीवर कायम राहील, यासाठी ते कायम प्रयत्नशील राहिले. त्यांनी महाराष्ट्राच्या तळागाळातून नेतृत्वाची एक फळी निर्माण केली आणि ती करत असताना सर्व बाजूचा समतोल राखला जाईल, याची दक्षता घेतली. यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राच्या कृषिधोरणाला एक चेहरा दिला. त्यांनी स्थापलेल्या कृषिविद्यापीठांमुळे महाराष्ट्राच्या कृषी विकासाला चालना मिळाली. यशवंतराव चव्हाण ते शरद पवार यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात सहकारी चळवळीने वेग घेऊन महाराष्ट्राच्या अर्थ आणि राजकारणाला दिशा देण्यास सुरुवात केली होती. त्यातून विविध शैक्षणिक संस्था निर्माण झाल्या त्यातून तळागाळांत शिक्षण पोहोचले. विशेषतः याच काळात देश एका आर्थिक संकटातून जात होता, त्याच वेळी शरद पवार यांच्यासारखे दूरदृष्टीचे नेते सर्व काही सरकारने केले पाहिजे हा दृष्टिकोन बदलला पाहिजे, ही वेगळी मांडणी करत होते. उदारीकरणानंतर त्याचा लाभ महाराष्ट्र आणि मुंबईला झाला. उदारीकरणानंतर महाराष्ट्रात खासगी भागभांडवल मोठ्या प्रमाणात आले आणि महाराष्ट्राच्या आर्थिक विकासावर परिणाम झाला. महाराष्ट्र निर्यातीत आघाडीचे राज्य झाले. त्याचसोबत खासगीकरणावर भर दिला गेला.

'मुंबई-पुणे एक्सप्रेस वे'ने विकासाचे नवे मॉडेल देशासमोर मांडले गेले आणि ते पुढे देशाने स्वीकारले. १९९५ पासून सेवाक्षेत्राच्या विकासामुळे आणि औद्योगिक वाढीमुळे शेतीवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला. शेतीवरील अवलंबित्व कमी झाले असले तरी प्रयोग वाढले त्याचा महाराष्ट्राच्या संपूर्ण विकासावर परिणाम दिसून येतो. याबरोबरच विकासाच्या निर्देशांकात महाराष्ट्र इतर राज्यांच्या पुढे असला तरी देशातील अनेक राज्ये महाराष्ट्राशी स्पर्धा करू लागली आहेत हे निश्चित. लॉकडाऊनच्या काळात महाराष्ट्रात एक लाखावर गुंतवणूक होते हे महाराष्ट्राचे सामर्थ्य आहे.

विकासाच्या अनेक निर्देशांकानुसार देशातील एक आघाडीचे राज्य होते आणि आज ६० वर्षानंतरही महाराष्ट्र देशातील प्रगत राज्य आहे. ही आघाडी ६० वर्षे टिकवण्यामागे येथील राजकीय नेतृत्वाचे मोठे योगदान आहे. सत्तेवर कोणीही असो. महाराष्ट्राच्या या प्रगतीचा वा राजकीय प्रक्रिया समजून घ्यायची असेल तर आपल्याला संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा किंवा त्यापूर्वी स्वातंत्र्यपूर्व काळात राज्यात झालेली राजकीय, वैचारिक, आर्थिक, सामाजिक घुसळणीचा धांडोळा घ्यावा लागतो. त्याचा परिणाम आजच्या महाराष्ट्रावर दिसतो. १८५७ मध्ये इंग्रजांची सत्ता देशात प्रस्थापित झाली असली तरी इंग्रजांनी ही सत्ता मिळविली ती मराठ्यांकडून. इंग्रजी सत्ताकाळात येथील धार्मिक, औद्योगिक, सामाजिक स्तरावर जी अस्वस्थता निर्माण झाली त्यातून ज्या चळवळी निर्माण झाल्या त्यात काँग्रेस चळवळ महत्त्वाची आहे. त्यात महाराष्ट्राचा वाटा मोठा होता. सुरुवातीच्या काळात या चळवळीचे वैचारिक नेतृत्व बंगाल आणि महाराष्ट्राने केले. लोकमान्य टिळकांनी घेतलेल्या भूमिकांचा परिणाम आजच्या महाराष्ट्राच्या जडणघडणीवरही झाल्याचे दिसून येते. लोकमान्य टिळकांना राजकीय स्वातंत्र्य हवे होते त्याच वेळी महाराष्ट्रात गोखले, आगरकर यांच्यासारखी मंडळी सामाजिक सुधारणा आधी झाली पाहिजे, असा आग्रह धरत होती. त्यातून जहाल आणि नेमस्त अशा दोन गटांचे राजकारण सुरू झाले. या दोन्ही गटात कमालीचा विरोध झाला. परंतु त्याकडे बघितले की हेही लक्षात येते की, या दोन्ही गटाचे नेतृत्व हे उच्चवर्गीय आणि उच्चवर्णीय लोकांच्या हातात होते.

## राजकारणाला नवे वळण

त्याच वेळी महात्मा जोतिराव फुले आणि राजर्षी शाहू महाराज हे या उच्चवर्गीय आणि उच्चवर्णीयांच्या राजकारणाला छेद देणारा प्रतिसिद्धान्त मांडत होते. ती परंपरा पुढे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद म्हटले तरी ती एका विशिष्ट वर्णगंडातून मांडलेल्या व्यवस्थेला एक जहाल अशी प्रतिक्रिया होती. पण या घुसळणीतून सर्व जात-वर्गातून नेतृत्व सगळ्या क्षेत्रात पुढे आले. बहुजनांतील नवे लोक लिहू लागले, सांस्कृतिक क्षेत्रात त्याचे प्रतिबिंब पडू लागले आणि राजकारणात तर उघडपणे नवे नेतृत्व पुढे आले. याचे नायक केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, प्रबोधनकार ठाकरे, माधवराव बागल, श्रीपतराव शिंदे, भास्करराव जाधव होते. त्यातून जे नवे नेतृत्व पुढे आले ते आपल्या जगण्याविषयी बोलत होते, शेती, कामगारांचे प्रश्न समोर यायला लागले होते. याच काळात टिळकांच्या निधनानंतर काँग्रेसचे नेतृत्व महात्मा गांधींकडे आले. महात्मा गांधी यांनी ही चळवळ अभिजनवर्गाकडून खेड्यापाड्यापर्यंत नेली. गांधीजींच्या या कार्याचा प्रभाव महाराष्ट्रात पडला.

आजच्या महाराष्ट्रावर प्रभाव टाकणारी घटना १९३० च्या दशकात घडली आणि ती म्हणजे ब्राह्मणेतर चळवळ काँग्रेसमध्ये विलीन झाली. केशवराव जेधे, काकासाहेब गाडगीळ यांचा हा निर्णय महाराष्ट्राच्या संपूर्ण राजकीय वाटचालीसाठी महत्त्वाचा ठरला. त्यामुळे काँग्रेसच्या कार्यक्रमावर त्याचा परिणाम झाला. पुढे जेव्हा यशवंतराव चव्हाण यांच्याकडे नेतृत्व आले त्या वेळी त्यांनी हा विचार अधिक स्पष्ट केला.

राजकीय आकांक्षा आणि सांस्कृतिक वादात जात महत्त्वाचा घटक ठरू नये, नवे नेतृत्व पुढे यावे आणि मराठी भाषकांचे हे राज्य राहावे, यासाठी त्यांनी खास प्रयत्न केले, त्याची बीजे ३० च्या दशकात सापडतात. हा ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद संपुष्टात आल्याचा एक फायदा असा झाला की, महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीत संपूर्ण महाराष्ट्र एकवटला. १९४२ च्या लढ्यात महाराष्ट्रातील अपवादात्मक नेते सोडले तर बहुतेक सर्व सहभागी झाले होते. त्यापुर्वी १९४० मध्ये मराठी भाषकांचे राज्य ही संकल्पना मांडली होती. 'चले जाव' आंदोलनावेळी हा विचार मागे पडला, त्याच वेळी प्रतिसरकारच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीला बळ देणारेही नेतृत्व पुढे आले. त्याचाही परिणाम महाराष्ट्राच्या राजकीय वाटचालीवर दिसून येतो.

## महाराष्ट्राचा तर्कवाद – गिरीश कुबेर

महाराष्ट्राची ओळख अनेक अंगाने करून देता येते. मात्र महाराष्ट्राच्या एका वैशिष्ट्याची फारशी चर्चा अलीकडच्या काळात होताना दिसत नाही तो म्हणजे महाराष्ट्राचा तर्कवाद. देशाला तर्काच्या पातळीवर नेऊन ठेवणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. महाराष्ट्र हे तर्कवादाचा उदय झालेले पहिले राज्य आहे. अलीकडच्या काळात हा मुद्दा दुर्लक्षित होतो आहे. या तर्कवादाची सुरुवात ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीलाच झाली. राजाराममोहन राय यांच्या धर्मसुधारणेचा पहिला आध्याय देशपातळीवर मानला जातो. मात्र त्यानंतर अवघ्या दोनच वर्षात या सुधारणेचा एक मोठा प्रवाह महाराष्ट्रात निर्माण झाला आणि त्याचे प्रणेते होते बाळशास्त्री जांभेकर. जवळपास १२-१३ भाषांचे ज्ञान असलेल्या या विद्वानाने आपले प्रबोधनपर्व सुरू केले. 'दर्पण' या वृत्तपत्राबद्दल त्यांना ओळखले जात असले तरी त्यांचे कार्य त्यापेक्षा कितीतरी मोठे होते. त्यांनी व्याख्याने, प्रबोधन आणि लिखानांतून समाजसुधारणेचे केलेले कार्य निश्चितच मोठे होते. बंगाल हा समाजसुधारकांसाठी ओळखला जातो, पण धर्म, संस्कृती, अध्यात्म या वाटेने ती सुधारणा जाते मात्र महाराष्ट्र केवळ आणि केवळ तर्काच्या वाटेनेच पुढे गेल्याचे दिसून येते. बुद्धिवाद हा महाराष्ट्राच्या समाजसुधारणेचे महत्त्वाचे अंग राहिले आहे. जांभेकर यांनी इंग्रजी भाषेचे महत्त्व ओळखले होते. जगाचा वेगवेगळ्या पद्धतीने अभ्यास करायला हवा आणि आधुनिकतेची कास धरायची असेल तर इंग्रजी भाषा येणे महत्त्वाचे असल्याची पहिली मांडणी त्यांनी केली. पण त्याचबरोबर इंग्रज आपल्याला कसे लुटतात हे सांगणारा पहिला द्रष्टाही जांभेकरच होते.

पांडुरंग तर्खडकर, दादोबा तर्खडकर, आत्माराम पांडुरंग यांनी महाराष्ट्राचा तर्कवाद पुढे नेला. याच काळात प्रार्थना समाज ही वास्तू जन्माला आली. याच काळात भाऊ दाजी लाड यांच्यासारख्यांनी प्रबोधनाचे जे बीज रोवले त्यातून महाराष्ट्र घडत गेला. याच काळातील लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख हे जे काही त्या काळात लिहीत होते ते इतके तेजस्वी होते की, आजही त्या प्रागतिक विचारांना पचवणे अवघड आहे. याच काळात महात्मा जोतिराव फुले यांच्यासारखे तेजस्वी व्यक्तिमत्त्व निर्माण झाले. त्यांनी आणि त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले यांनी केलेले कार्य अद्वितीय आहे. ही सुधारक मंडळी पारतंत्र्यात देश असताना कार्यरत होती.

## मुंबई विद्यापीठाचा मोठा वाटा

१८५७ या वर्षी मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली आणि या विद्यापीठातून अनेक तेज:पुंज व्यक्तिमत्त्वे निर्माण झाली. पं. विष्णू परशुराम शास्त्री, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, पंडिता रमाबाबाई, नारायण महादेव परमानंद, न्या. महादेव गोविंद रानडे, विष्णुशास्त्री चिपळुणकर, काशिनाथ त्र्यंबक तेलंग, गणेश वासुदेव जोशी, नारायण गणेश चंदावरकर, गोपाळ गणेश आगरकर यांच्यापासून ते धोंडो केशव कर्वे यांच्यासारखे अनेक विद्वान मुंबई विद्यापीठातून निर्माण झाले.

भारतीय पारंपरिक ज्ञानाची आणि आधुनिक ज्ञानाची सांगड कशी घालता येईल, असा या सर्वांचा प्रयत्न होता. देशाला प्रगत व्हायचे असेल तर आधुनिक विज्ञानाची कास धरली पाहिजे आणि हा एकमेव मार्ग आहे, हे या सुधारकांनी मांडलेले विचार महत्त्वपूर्ण आहेत. त्यांनी धर्मातील सुधारणांसाठी केलेले प्रयत्न अभूतपूर्व आहेत. माणसाच्या नीतिमत्तेसाठी धर्माची गरज नाही, हा मुद्दा परखडपणे देशात पहिल्यांदा मांडला तो गोपाळ गणेश आगरकर यांनी. याच काळात मुंबईत एक अभूतपूर्व लढाई एका रत्नाबाई नावाच्या मुलीने दिली. खरे तर त्या काळात तो विचार मांडणे आणि त्यासाठी आग्रही राहणे हे कल्पनेच्या पलीकडचे. आपल्या शरीरावर आपल्या पतीचा नव्हे तर आपलाच हक्क असल्याचे तिने जाहीर केले. आणि त्यासाठी इंग्लडच्या राणीलाही पत्र लिहिले. त्यामुळे संमतिवयाचा कायदा झाला. महाराष्ट्र बुद्धिवादी का आहे हे अशा उदाहणावरून दिसून येते. महात्मा गांधीजींच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असणारे गोपाळ कृष्ण गोखले आणि न्या. महादेव गोविंद रानडे यांनी महाराष्ट्राच्या तर्कवादाला अधिष्ठान मिळवून दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रानडे यांच्याविषयी बोलताना म्हणतात की, रानडे यांच्यासारखा विद्वान महाराष्ट्रात निपजला नाही आणि भविष्यात निपजणार नाही. यावरून न्या. रानडे यांचे महत्त्व लक्षात येऊ शकते. याच कालखंडात शाहू महाराजांनी राखीव जागांचा नियम केला.त्यामुळे बुद्धीच्या आधारे विचार करणे हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य राहिले आहे. याच महाराष्ट्रात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी गणेशोत्सव आणि शिवजयंती हे लोकोत्सव केले आणि त्यातून समाज संघटन केले. पण हे करत असताना हे पुढे जाऊन त्यातून अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे धर्म रस्त्यावर आणण्याची चूक टिळकांनी केली असा दूरदृष्टीचा विचार प्रबोधनकार ठाकरे यांनी मांडला. महाराष्ट्राने विज्ञान, समाजकारणात तर्काची कास धरल्यानेच महाराष्ट्र हा नेहमी देशात अग्रेसर राहिला.

१९२० पर्यंत देशाच्या राजकारणाचे केंद्रबिंदू पुणे होते, यावरून महाराष्ट्राची महती लक्षात येते. पुढे शिक्षण, अर्थकारण, समाजकारण, सहकार अशा अनेक क्षेत्रात महाराष्ट्राने दिशा दिली आहे. हीरकमहोत्सवी वर्षात हा विचार आपण पुढे कसा घेऊन जाणार आहोत, याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

**टीम लोकराज्य**

मीनल जोगळेकर

**सन २०20 साठी महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च असा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार, अष्टपैलू चिरतरुण स्वर लाभलेल्या ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना जाहीर करण्यात आला आहे. पार्श्वगायन क्षेत्रातील त्यांच्या ७८ वर्षांच्या प्रदीर्घ योगदानाचा आणि त्यांच्या प्रेरक जीवनचरित्राचा हा धावता आढावा...**



# अष्टपैलू चिरतरुण स्वराशा

'आशा भोसले हे नाव, जणू आनंदाचा गाव, मर्मबंधातली ठेव, रसिकांची...' ज्येष्ठ गीतकार, संगीतकार दिवंगत यशवंत देव यांचे हे शब्द, भारतातीलच नव्हे, तर जगभरातील कानसेनांच्या अत्यंत आवडत्या गायिकेच्या प्रदीर्घ कारकिर्दीचं सारच जणू एका ओळीत सांगतात. १९४३ मध्ये, वयाच्या दहाव्या वर्षापासून सुरू झालेला त्यांचा गायनप्रवास, आज २०२१ मध्ये, वयाच्या ८८व्या वर्षी सुद्धा अव्याहत सुरू आहे. इतका प्रदीर्घ काळ आपल्या सुरांच्या साथीने थकल्या-भागल्या मनांना उभारी देणाऱ्या या आशदायी स्वराचा, स्वतःचा जीवनप्रवास मात्र एखाद्या चित्रपटाच्या कथेइतकाच चढ-उतारांचा, पण शेवट गोड, अशा स्वरूपाचा आहे.

## सूरमयी बालपण

मराठी नाट्यसंगीत क्षेत्रातील अत्यंत लोकप्रिय गायक-अभिनेते मास्टर दीनानाथ मंगेशकर आणि माई मंगेशकर या दाम्पत्याच्या पोटी १९३३ मध्ये सांगली इथं आशाताईंचा जन्म झाला. लता आणि मीना या दोन बहिणींच्या पाठीवर जन्मलेली, गोबऱ्या गालांवर सुंदर खळ्या लाभलेली आशा, लहानपणापासूनच अवखळ होती. मास्टर दीनानाथ हे त्या वेळी मराठी नाट्यसृष्टीतील मोठे नाव होते आणि ते वैभवाच्या, कीर्तीच्या शिखरावर होते. त्यांचे उदंड प्रतिसादात सुरू असलेले संगीत नाटकाचे प्रयोग बघताना त्यांची गायकी आणि अभिनय यांचे संस्कार, मंगेशकर बहिणींवर आपसूक होत होते. त्यांच्याकडून गाण्याची फार थोडा काळ प्रत्यक्ष तालीम मिळाली तरी त्यांचा गाण्याचा रियाज, शिष्यांना ते गाणे शिकवत असताना, अप्रत्यक्षपणे त्यांचे सूर लहानग्या आशाच्या मनात झिरपत होते. आशाताईंची बालपणाची पहिली चार-पाच वर्ष अतिशय ऐश्वर्यसंपन्न लाडाकोडात गेली. त्या आठ वर्षांच्या असताना मास्टर दीनानाथांचे अकाली निधन झाले आणि आशा, मोठ्या दोन बहिणी, धाकटी बहीण उषा आणि भाऊ हृदयनाथ, आई अशा साऱ्याच मंगेशकर कुटुंबीयांचा जगण्यासाठी संघर्ष सुरू झाला.

## मुंबापुरीत स्थिरावताना

वडिलांच्या आकस्मिक निधनानंतर भावंडांमधील थोरल्या लताने कुटुंबाची जबाबदारी स्वतःच्या कोवळ्या खांद्यावर घेतली. चित्रपटसृष्टीत पार्श्वगायन क्षेत्रात नशीब आजमावण्यासाठी लतासह सारेच कुटुंब मुंबईत येऊन स्थिरावले. या धामधुमीत त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण करण्याचे राहूनच गेले.

१९४३ मध्ये वयाच्या दहाव्या वर्षी 'माझं बाळ' या चित्रपटासाठी आशाताईंनी पहिले स्वतंत्र गीत गायले. त्यानंतर १९४६ मध्ये 'चुनरिया' या चित्रपटासाठी पहिले हिंदी गाणे रेकॉर्ड केले. तोवर

षोडश वर्षात पदार्पण केलेल्या या जिद्दी नवतरुणीने स्वतःपेक्षा वयाने जवळपास दुप्पट वयाच्या गणपतराव भोसले यांच्याशी घरच्यांचा विरोध पत्करून संसार थाटला आणि मुंबईच्या महासागरात जरा कुठे स्थिरावू बघणारी त्यांची जीवननौका जणू मोठ्या वादळाच्या तावडीत सापडली. एकीकडे आई आणि सख्ख्या भावंडांशी दुरावलेले संबंध, संसाराचे चटके, लहान वयातील बाळंतपणे, मुलांचे संगोपन आणि दुसरीकडे पार्श्वगायन क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी सुरू झालेली धडपड, अशा अत्यंत कष्टप्रद काळातही एक गोष्ट स्थिर होती, तो म्हणजे त्यांचा बावन्नकशी, लखलखणारा सूर.

## पदार्पणातील संघर्ष

त्या वेळी हिंदी पार्श्वगायन क्षेत्रात आमीरबाई कर्नाटकी, नूरजहाँ, जोहराबाई अंबालेवाली, लता मंगेशकर अशी एकापेक्षा एक रत्न तळपत असताना या क्षेत्रात प्रवेश करून स्वतः स्वतंत्र स्थान निर्माण करण्यासाठी आशाताईंनी केलेला प्रयास आणि प्रवास हा त्यांच्यातील जिद्द, चिकाटी, परिस्थितीशी जुळवून घेण्याची वृत्ती, त्यांचे सूरांवरील निस्सीम प्रेम, वडिलांवरील श्रद्धा आणि त्यांचे गाणे आणि नाव राखण्यासाठीची धडपड, हे सर्वच अतिशय अद्‌भुत आणि प्रेरक आहे. नवीन असताना या मराठी भाषक मुलीच्या हिंदी, उर्दू उच्चारांबद्दल संगीतकारांना तितकासा विश्वास वाटत नव्हता. पण निराश न होता त्यांनी मुनीमजींकडून शिकवणी घेऊन उच्चारांवर आणि भाषेवर मेहनत घेतली. मराठीतीलही ह. ना. आपटे, वि. स. खांडेकर, ना. सी. फडके यांच्या कादंबऱ्या, शरदचंद्र चॅटर्जी, रवींद्रनाथ टागोर इ. बंगाली लेखकांचे उत्तमोत्तम भाषांतरित मराठी साहित्य, ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ असे भरपूर वाचन केले. नवरंग नागपूरकर, शंकरराव व्यास यांच्याकडून त्यांनी गायकीचे धडे घेतले. अत्यंत परिश्रमपूर्वक त्यांनी संगीतकारांचा विश्वास मिळवला.

### पुरस्काराबद्दल आनंद



आज वयाच्या ८८व्या वर्षीही ८ वर्षांच्या मुलीइतका उत्साह आणि भवतालाबद्दलचे कुतूहल जोपासणाऱ्या आशाताईंनी 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार घोषित झाल्याबद्दल आनंद व्यक्त करतानाच, शासनाचे आणि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य रसिकजनांचे आभार मानले आहेत.

## स्वतंत्र शैली

सुरुवातीच्या काळात त्यांचा आवाज नायिकेसाठी वापरला जात नसे, तर सहनायिका, खलनायिका यांच्यासाठी वापरला जायचा. पण ही इष्टापत्ती मानत आशाताईंनी स्वतःची अशी खास स्टाइल निर्माण करत, स्वतःची दखल घ्यायला संगीतकारांना भाग पाडले. त्यांच्या गळ्याला कुठलाही गीतप्रकार वर्ज्य नव्हताच जणू.

१९५० ते ६० च्या दशकात प्रामुख्याने सचिन देव बर्मन यांच्याकडे हिंदी चित्रपटांसाठी पार्श्वगायन करताकरताच मराठीत सुधीर फडके, दत्ता डावजेकर यांच्याकडे मराठी चित्रपटांसाठी एकाहून एक सरस गाणी त्यांनी गायली. १९६० च्या दशकात संगीतकार ओ. पी. नय्यर यांच्या संगीत दिग्दर्शनात अतिशय खट्याळ, खनकदार अशी गाणी त्यांनी दिली, तर १९७० च्या दशकात राहुल देव बर्मन उर्फ पंचम यांच्या साथीने चिरतरुण, प्रयोगशील संगीताचे एक नवे युग त्यांनी आणले. १९८० चे दशक आशाताईंना पार्श्वगायनाचे दोन राष्ट्रीय पुरस्कार देऊन गेले. उमराव जान (१९८१) आणि इजाजत (१९८६) या दोन चित्रपटातील गाण्यांसाठी ते पुरस्कार होते आणि योगायोगाने दोन्ही चित्रपटातील गाणी अधिक परिपक्व, गझलच्या अंगाने जाणारी, उत्तम काव्यरचना असलेली अशी होती.

१९९० च्या दशकातही काजोल, उर्मिला मातोंडकरपासून ते २१व्या शतकातील ग्रेसी सिंग, करीना कपूरपर्यंत वेगवेगळ्या अभिनेत्रींसाठी त्यांचा अष्टपैलू स्वर खळाळत राहिला. मराठीत सुलोचना, सीमा देव, जयश्री गडकर, उमा, आशा काळे या सोज्ज्वळ सौंदर्यवतींपासून उषा चव्हाण, लीला गांधी, मधू कांबीकर अशी लावणीची वळण घेत तब्बल सतरा वेळा मराठी चित्रपटांसाठी उत्कृष्ट पार्श्वगायिकेचा राज्य पुरस्कार मिळवून एक नवा उच्चांक आशाताईंनी स्थापन केला.

## आशाताईंचे अष्टपैलूत्व

पाच दशकांच्या या अखंड तळपत्या कारकिर्दीत आशाताईंचा खणखणीत सूर लहान मुलापासून ते नायिका, सहनायिका, खलनायिका, चरित्रनायिका, कॅबेरे डान्सर, लावणी नर्तिका अशा हरतऱ्हेच्या भूमिकांचा आवाज होऊन गेला. अभिनेत्रींच्या बदलणाऱ्या पिढ्यांना त्यांचा स्वर शोभून दिसला. भारतीय शास्त्रीय संगीतावर आधारित गाण्यांपासून ते नाट्यसंगीत, भक्तिगीत, भावगीत, प्रेमगीत, विरहगीत, कॅबरे, युगलगीत, गझल, रवींद्र संगीत, लोकगीते, उडत्या चालीची गाणी, पाश्चिमात्य पद्धतीची पॉप ते रॉक ॲण्ड रोल अशी हरतऱ्हेची गाणी त्यांनी त्या-त्या ढंगात अगदी सहज गायली आणि आपले अष्टपैलुत्व सिद्ध केले. असंख्य कवी, गीतकार, संगीतकार, अभिनेत्री, सहगायक यांच्या साथीने त्यांची ही प्रदीर्घ कारकिर्द फुलत गेली.

ग्रामोफोनच्या तबकड्या ते आकाशवाणी ते कॅसेट, सीडी ते अगदी यू-ट्युब तसेच वन ट्रॅक ते मल्टिट्रॅक रेकॉर्डिंग, शंभरावर वादक ते चार-पाच वादक अशा सगळ्या तंत्रज्ञानाच्या स्थित्यंतरांमध्येही आशाताईंचा स्वर हे बदल स्वीकारून तसाच खणखणीत वाजत राहिला.

## प्रयोगशीलता

आशाताई गाण्याच्या बाबतीत कायम प्रयोगशील राहिल्या आहेत. देश-विदेशातील संगीतकारांबरोबर केलेले काम, 'राहुल ॲण्ड आय' सारखा खास तरुणाईला आवडेल असा अल्बम, लेस्ली लुईबरोबरचे

## विक्रमी कारकिर्द

आशाताईंनी २० भारतीय आणि १२ विदेशी भाषांमध्ये १२,००० पेक्षा जास्त गाणी गायली आहेत. त्यासाठी त्यांचे नाव 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्येही समाविष्ट झाले आहे. आशाताईंचा एका दिवसात सात गाणी रेकॉर्ड करण्याचा रेकॉर्ड आहे. पुण्यातल्या प्रभात स्टुडिओमध्ये वसंत पवारांच्या संगीत दिग्दर्शनाखाली दुपारी दोन वाजल्यापासून पहाटे ५ वाजेपर्यंत त्यांचे ध्वनिमुद्रण चालू होते. 'बुगडी माझी सांडली गं' ही प्रसिद्ध लावणीही त्या सात गाण्यांपैकी एक होती.

## निवडक पुरस्कार आणि मानसन्मान

- भारत सरकारचा पद्मविभूषण पुरस्कार - २००८
- चित्रपट क्षेत्रातील सर्वोच्च 'दादासाहेब फाळके' सन्मान- २०००-२००१
- लता मंगेशकर पुरस्कार - (महाराष्ट्र शासन -१९९९) (मध्य प्रदेश सरकार -१९८९)
- फिल्म फेयर पुरस्कार - ७ प्राप्त, १८ नामांकन (१९६७-१९७९)
- लाइफटाइम अचिव्हमेंट अवॉर्ड- २००१



तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचे हस्ते पद्मविभूषण पुरस्कार स्वीकारताना ज्येष्ठ गायिका आशा भोसले.

- भारत-पाकिस्तान असोसिएशनचा 'नाईटिंगेल ऑफ एशिया' पुरस्कार - १९८७
- IIFA बेस्ट फिमेल लाईफ टाईम अचिव्हमेंट अवॉर्ड - २००२
- सिंगर ऑफ दी मिलेनियम अवॉर्ड (दुबई)- २०००
- बी.बी.सी. लाइफटाईम अचिव्हमेंट अवॉर्ड (इंग्लंडच्या प्रधानमंत्र्यांद्वारे सन्मानित) - २००२
- उस्ताद अली अकबर खान यांच्यासह 'लिगसी' अल्बमसाठी 'ग्रॅमी' अवॉर्ड करता नामांकन मिळालेल्या पहिल्या भारतीय गायिका - १९९७
- ब्रिटनच्या अल्टरनेटिक रॉक बॅण्ड कडून 'ब्रिमफुल ऑफ आशा' हे गाणे समर्पित - १९९७
- अमरावती व जळगाव विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट.

काम, वयाच्या ७४व्या वर्षी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू ब्रेट ली, अभिनेता संजय दत्त यांच्याबरोबर 'आशा ॲण्ड फ्रेन्ड्स' हा अल्बम, वयाच्या ८२ व्या वर्षी मंदार आगाशे या तरुण संगीतकार सोबत सुरेश भट यांच्या गझलांना आधुनिक संगीताचा साज देऊन नवीन पिढी समोर सादर केले, पाकिस्तानचे लोकप्रिय गायक गुलाम अली यांच्यासह 'मिराझ ए गजल' हा उत्तमोत्तम गझलांचा अल्बम, नंतर सुमारे तीसएक वर्षांनी २००८ मध्ये त्यांच्याचसोबत 'जनरेशन्सस' हा अल्बम, गुलजार- आर . डी. बर्मन यांच्यासोबत 'दिल पडोसी है' हा एकापेक्षा एक श्रवणीय गाण्यांचा अल्बम, उस्ताद अली अकबर खाँ यांच्यासह तानसेन यांच्या पारंपरिक बंदिशी सरोदवादनासह गाणे, असे अनेक नवनवे प्रयोग आशाताईंनी केले आणि त्यांना जगभरातील संगीत रसिकांकडून भरभरून दाद मिळाली.

२०१३ मध्ये 'माई' या मराठी चित्रपटामध्ये प्रथमच त्यांनी अभिनय केला.

## सुरेल वर्तुळ पूर्ण

वयाची साठी, पंच्याहत्तरी, सहस्त्रचंद्रदर्शन हे टप्पे पार करत, वैयक्तिक आयुष्यात पोटच्या दोघा मुलांचे अकाली मृत्यू असे सर्व चढउतार पार करत आज वयाच्या ८८व्या वर्षी आशाताई तितक्याच उत्साहाने जीवनाला सामोऱ्या जात आहेत. अगदी कोरोनापूर्वीपर्यंत देश-विदेशात त्या कार्यक्रम करत होत्या. अमेरिकेत गुगलच्या मुख्यालयातही त्यांची मुलाखत आयोजित करण्यात आली होती. तिथे त्यांना सांगण्यात आले की, तंत्रज्ञानाच्या मदतीने त्यांच्यासारखा आवाज तयार करण्यात येत आहे. त्यावर त्या अगदी हजरजबाबीपणे म्हणाल्या, की आवाज तर तुम्ही तयार कराल, पण त्यात भावना कुठून आणणार? त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीचे मर्मच जणू त्यांनी यातून सांगितले. आजही त्या सकाळी सात वाजता उठतात. जमेल तसा थोडा रियाज करतात आणि मुख्य म्हणजे फेसबुक, यु-ट्यूब, इंस्टाग्राम या आधुनिक समाजमाध्यमांच्याद्वारे जगभरातील त्यांच्या चाहत्यांशी संपर्कात राहतात. सुरांची दैवी देणगी, वडिलांकडून मिळालेला संगीताचा वारसा, प्रतिभावंत भावंडांची तोलामोलाची साथ, स्वतः घेतलेले अपार कष्ट, रसिकांचे उदंड प्रेम, असंख्य मानसन्मान आणि आता जीवनात आलेली शांतता, तृप्तता असे आशाताईंच्या जीवनाचे एक सुरेल वर्तुळ पूर्ण झाले आहे.

## नावाप्रमाणेच आशावादी

'इथे तिथे संगीत अनामिक, एकच घुमते आहे.. हे जीवन सुंदर आहे', हे सुधीर मोघे यांचे आशाताईंनी गायलेले शब्दच जणू त्यांच्या

जगण्याचे सूत्र आहे. त्या म्हणतात, प्रत्येकाच्या जीवनात दुःखे आहेतच. पण आपण नेहमी सकारात्मक राहिले पाहिजे, सगळ्याला हसतमुखाने सामोरे गेले पाहिजे. आपण कितीही दुःखात असलो, तरी गाण्याच्या रेकॉर्डिंगसाठी स्टुडिओच्या आत प्रवेश करण्यापूर्वी दुःख, वैयक्तिक अडचणी बाहेर सोडून द्यायच्या आणि मगच माईक पुढे जायचे, हे मी पाळत आले. पुनर्जन्म मिळाला तर पुढच्या जन्मातही मला गायिकाच व्हायला आवडेल. या जन्मी ज्या चुका झाल्या, त्या सुधारण्याचा मी प्रयत्न करेन. शिक्षण घेऊन जगाच्या खिडक्या स्वतःसाठी खुल्या करेन. माईक हाच माझा परमेश्वर आहे. अखेरच्या श्वासापर्यंत मी गात राहावे, हीच इच्छा आहे.

### तंत्रज्ञान आणि नवी पिढी

आशाताईंची गाणी प्रत्येक नव्या पिढीला भावतात आणि त्यांचे युवा चाहतेही जगभर आहेत. अनेक तरुण, नवीन संगीतकारांसोबत त्यांनी काम केले आहे. नवीन पिढीचे संगीत तंत्रज्ञानाच्या अतिआहारी गेल्याबद्दल त्या नाराजी व्यक्त करतात. तंत्रज्ञान बेसूर व्यक्तीला सूरात आणेल, बेताल माणसाला तालात आणेल, पण भावना आणि योग्य शब्दोच्चार कुठून आणणार, असा रोकडा सवाल त्या करतात. नवीन संगीतकार, गायकांना दर्जेदार काव्यच मिळत नसल्याने जुन्या लोकप्रिय गाण्यांचे रिमिक्स करून पुढे मांडण्याची वेळ त्यांच्यावर येते, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. आजकाल व्हॉट्सअप, फेसबुकवरून आपण एकमेकांना सणांच्या शुभेच्छा देतो. परंतु स्वतः केलेल्या फराळाचे ताट शेजाऱ्यांना, नातेवाइकांना देण्यातली गंमत किंवा तिळगूळ स्वतः देऊन मोठ्यांच्या पाया पडण्यातील आदर मोबाईलवर आलेल्या फराळाच्या ताटात किंवा तिळगुळाच्या लाडवात नाही, असेही त्या मिश्कीलपणे नमूद करतात.

### कुटुंबवत्सल गृहिणी

आशाताई जितक्या उत्तम गायिका आहेत, तितक्याच उत्तम सुगरणही आहेत. त्यांना नवनवे पदार्थ करण्यात आणि ते इतरांना खाऊ घालण्यात विशेष आनंद होतो. आशाजींनी केलेल्या अनेक पदार्थांची चव चित्रपटसृष्टीतील अनेकांच्या जिभेवर आजही रेंगाळते. आशाजींची दुबई, सिंगापूर, कुवैत अशा अनेक ठिकाणी आशाज या नावाने रेस्टॉरंटची साखळी आहे. तिथल्या शेफ्सना त्या स्वतः वेगवेगळे पदार्थ शिकवतात आणि पदार्थांच्या दर्जाबाबत स्वतः लक्ष ठेवून असतात. त्यांना नीटनेटके राहण्याची, उत्तम साड्या आणि दागिन्यांचीही स्त्रीसुलभ आवड आहे. म्हणूच त्यांच्या रंगमंचावरील कार्यक्रमांमध्ये आणि एरवीही त्या अगदी टापटीप आणि प्रसन्न अशाच दिसतात. मंचावरून एक उत्कृष्ट परफॉर्मर म्हणून रसिकांसमोर येणाऱ्या आशाताई वैयक्तिक जीवनात स्वयंपाकाची आवड असलेल्या, मुलं-नातवंडांमध्ये रमणाऱ्या एक कुटुंबवत्सल गृहिणी आहेत; सर्वसामान्य भारतीयांप्रमाणेच क्रिकेटच्या दर्दी आहेत.

### कोरोनावर मात करू...

कोरोनाच्या या चिंतेच्या आणि निराशेच्या काळातही त्यांनी आपला आशावाद कायम ठेवला आहे. त्या म्हणतात, मी आपल्या जीवनात अनेक रोगांच्या साथी पाहिल्या, दुसरे महायुद्ध, पाकिस्तान, चीन विरुद्धची युद्धे अनुभवली आहेत. कोरोनाचे हे संकटही लवकरच दूर होईल. फक्त आपण सगळ्यांनी सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनात शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे कटाक्षाने पालन केले पाहिजे. शासनाला सहकार्य करून स्वतःची आणि कुटुंबाची काळजी घेतली पाहिजे.

महाराष्ट्र भूषण पुरस्काराच्या निमित्ताने आशाताईंना कविश्रेष्ठ सुरेश भट यांच्या शब्दांत शुभेच्छा:

***'तारुण्य तुझ्या हृदयाचे हे, असेच बहरत राहो***
***वार्धक्य तुझ्या जगण्याला, हे असेच विसरत राहो'***

सहसंचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय

### लॉकडाऊनमधील सकारात्मकता

मार्च २०२० मध्ये लॉकडाऊन लागण्यापूर्वी आशाताई त्यांच्या लोणावळा इथल्या बंगल्यात कुटुंबीयांसह एकत्र वेळ घालवण्यासाठी गेल्या होत्या. लॉकडाऊनमुळे त्या तिथेच अडकून पडल्या. पण सामाजमाध्यमांतून त्या त्यांच्या चाहत्यांच्या संपर्कात होत्या. कोविड योद्ध्यांसाठी तसेच प्रधानमंत्री सहायता



निधीसाठी निधी गोळा करण्याच्या ऑनलाइन उपक्रमांमध्ये त्या सहभागी झाल्या. 'जयतु जयतु भारतम्' हे १४ भाषांमध्ये प्रसून जोशी यांनी लिहिलेले आणि शंकर महादेवन यांनी संगीतबद्ध केलेले स्फूर्तिगीत २११ गायकांबरोबर गाऊन निधी गोळा केला. तीन खासगी एफएम वाहिन्यांनी ऑनलाइन आयोजित केलेल्या निधी गोळा करण्याच्या कार्यक्रमात सहभागी झाल्या आणि स्वतःही निधी दिला. 'आशा की आशा' नावाचा नवीन गुणवत्ता शोध उपक्रम त्यांनी हाती घेतला आणि २५०० मुलांमधून पाच मुले निवडून त्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या यु-ट्यूब चॅनेलवर १२ भागांच्या मालिकेतून त्यांनी त्यांच्या गाण्यांबद्दलच्या खास आठवणी रसिकांना सांगितल्या. नुकतीच त्यांनी ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली काही गाणी ध्वनिमुद्रित केली असून लवकरच ती रसिकांना ऐकायला मिळतील.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

## राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण



श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे
मा. मुख्यमंत्री




"महाराष्ट्र शासनाचा
एकच ध्यास,
२०२२ पर्यंत
सर्वांसाठी आवास"

# महा आवास अभियान-ग्रामीण

**प्रत्येकाच्या घराचे स्वप्नपूर्तीसाठी दि. २० नोव्हेंबर २०२० पासून अभियानाची अंमलबजावणी**

- ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे.
- शासकीय यंत्रणेबरोबरच समाजातील सर्व घटकाचा सहभाग वाढविणे.
- ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून गुणवत्ता वाढविणे.
- लाभार्थ्यांसाठी शासनाच्या विविध योजनांचा कृतिसंगम (Convergence) घडवून आणणे.
- सर्व संबंधितांची प्रशिक्षणे, कार्यशाळा, क्षेत्रिय भेटी, बँक मेळावे याव्दारे क्षमता बांधणी करणे.
- जनजागृतीसाठी माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम राबवणे.
- अभियानात उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांचा पुरस्कार देऊन गौरव करणे.



श्री. अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री



श्री. बाळासाहेब थोरात
मा. मंत्री, महसूल



श्री. हसन मुश्रीफ
मा. मंत्री, ग्राम विकास



श्री. अब्दुल सत्तार
मा. राज्यमंत्री, ग्राम विकास
व महसूल

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., बिल्डिंग ई–१, जय जलाराम इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपळस, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१ ३११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे